अमृत मंथन

लेखक–संपादक
विजयकुमार मोरे

विश्लेषा पब्लिकेशन, मावळ, पुणे

- **लेखक/संपादक**

  विजयकुमार मोरे
  आय/४४/९ इलाईट ग्रीन एकर्स
  जांभूळ, ता.मावळ, जि.पुणे
  मो. ८८०६३३०१११

- **मुद्रक/प्रकाशक**


  विजयकुमार मोरे
  विश्लेषा प्रिंटर्स ॲन्ड पब्लिशर्स
  गट.न.४४५, टाकवे रोड कान्हे,
  ता.मावळ, जि.पुणे
  मो. ८८०६३३०१११

- **मुखपृष्ठ/सजावट**

  सचिन ताकतोडे

- **किंमत ३५० रु.**

अर्पण पत्रिका



मान्यवर स्नेही



धडाडीचे अभियंता

इंजि.श्री. व्ही.व्ही गायकवाड
मा.सचिव : जलसंपदा विभाग
श्री. व्ही.व्ही गायकवाड हे कुकडी प्रकल्प सर्कलमध्ये अधीक्षक अभियंता असताना इंजि. राजेंद्र पवार हे नारायणगाव येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते.ते त्यांचे वरिष्ठ अधिकारी होते.

मी तसा मूळचा रहाणारा उस्मानाबाद जिल्ह्यातील असल्यामुळे आणि इंजि.राजेंद्र पवार हे देखील उस्मानाबाद जिल्ह्यातील असल्यामुळे आणि एकाच खात्यात अभियंता म्हणून सेवेत असल्यामुळे मनात एक प्रकारची आपुलकी होती. परंतु माझी सुरुवातीची बहूतांशी सेवा मराठवाड्यात झाली आहे तर राजेंद्र पवार यांची सेवा मुख्यत्वे करुन पश्चिम महाराष्ट्रात झाली आहे. त्यामुळे सुरुवातीला एकत्र काम केले नव्हते. परंतु एक धडाडीचा अभियंता म्हणून ते परिचित होते. तात्कालिन पाटबंधारे खात्यात अशा धडाडीने काम करणाऱ्या अधिकाऱ्याची चर्चा होत असे. तशी चर्चा श्री पवार यांच्या संदर्भात ऐकायला मिळायची. तोपर्यंत सोबत कामही केले नव्हते. परंतु १९९५

साली राजकारणात मोठी उलथा पालथ झाली. कॉंग्रेसचे सरकार जाऊन शिवसेना - भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी मी उस्मानाबाद येथे अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत होतो. सत्ताबदल झाल्यानंतर माझी बदली पुणे येथे कुकडी पाटबंधारे प्रकल्प मंडळात अधीक्षक अभियंता म्हणून झाली. याच मंडळांतर्गत श्री राजेंद्र पवार हे कार्यकारी अभियंता म्हणून नारयणगाव येथे कार्यरत होते. त्यावेळी कामाच्या निमित्ताने प्रथम भेट झाली. प्रत्यक्ष एकत्र काम करण्याचीही ही पहिलीच वेळ होती. असे असले तरी ते महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग १ चे अधिकारी असल्यामुळे संघटनेच्या बैठकीच्या निमित्ताने एकत्र यायचो. परंतु फारसे बोलणे किंवा चर्चा होत नसे. परंतु निकटचा संबंध आला तो कुकडी मंडळात अधीक्षक अभियंता म्हणून आल्यानंतरच.

आधीपासून माहित होते की श्री राजेंद्र पवार हे मुळचे उस्मानाबाद जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे विशेष स्नेह लाभला. त्यांचे मूळ गाव तळेगाव हे आता लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील असले तरी हा तालुका पूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यातच होता. त्यांचे वडील रा.ज. पवार हे उस्मानाबाद शहराजवळ असणाऱ्या येडशी येथे असणाऱ्या मामासाहेब जगदाळे यांच्या जनता विद्यालयात शिक्षक होते आणि तेथेच शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सुरु करण्यात आलेल्या बोर्डिंगचे रेक्टर होते. त्यामुळे त्यांचा परिचय जिल्ह्यातील ग्रामिण भागाबरोबरच उस्मानाबाद शहरातही चांगला होता. त्या विषयावरुन अनेकदा त्यांच्या वडीलांचे नाव लोकांच्या तोंडून ऐकले होते.

श्री राजेंद्र पवार हे एक हुशार, धडाडीचे आणि तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असलेले अभियंता आहेत. त्यांची शैक्षणिक कारकिर्द देखील उज्ज्वल अशीच आहे. कराड येथे इंजिनियरींगचे शिक्षण घेत असताना

ते शिवाजी विद्यापीठातून सर्वप्रथम आले होते. त्याच्या बातम्या सोलापूर आणि मराठवाड्यातील वर्तमानपत्रात छापून आल्या होत्या. त्यांची बुध्दीमत्ता त्यांच्यासोबत कुकडी प्रकल्प मंडळात काम करत असताना दिसून आली. त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग त्यांनी अतिशय कौशल्याने केला असल्याचे दिसून आले. वास्तविक पहाता कुकडी प्रकल्प हा अतिशय गुंतागुंतीचा प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत पाच धरणे आणि अनेक किलोमिटर लांबीचे कालवे आहेत. या कालव्याचा उपयोग दुष्काळी भागाला पाणी देण्यासाठी केला जात होता. या प्रकल्पात सुरुवातीच्या काळात एकच कालवा होता. या प्रकल्पातील सर्व धरणाचे पाणी एकत्र आणून ते शेतीला पुरविले जात होते. या प्रकल्पातील मुख्य आणि मोठे धरण म्हणजे डिंभे धरण आहे. कालांतराने या मोठ्या धरणाचे पाणी नारायणगावजवळील येडगाव धरणात आणून सोडायचे आणि तेथून ते कुकडी डावा कालव्याद्वारे २५६ किमी अंतरापर्यंत पोहचवायचे असे नियोजन होते. या येडगावच्या धरणात माणिकडोह आणि वडज या दोन धरणाचेही पाणी सोडण्यात येते. त्याच्याच बाजूला पिंपळगाव जोगा हे पण धरण आहे. या धरणातील पाणी येडगाव धरणात जमा करुन ते कुकडी डावा कालव्याद्वारे पुणे, अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील जुन्नर, श्रीगोंदा, पारनेर आणि करमाळा या तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाला देण्याचे नियोजन होते. यामध्ये पाण्याचा मुख्य स्त्रोत हा डिंभे धरणच होता. या डिंभे धरणापासून येडगाव धरणापर्यंत सुमारे ६० किमी पर्यंत लांबीचा कालवा तयार करुन ते पाणी आणले जाणार होते आणि हे काम अत्यंत जिकिरीचे आणि अवघड होते. कारण हा कालवा डोंगराळ भागातून जाणार होता. भूभाग उंच सखल आणि कठिण खडकाळ होता. उंच भागाच्या ठिकाणी खोदाईचे फार काम होते. मातीकामदेखील मोठ्या

प्रमाणावर होते. वेगवेगळ्या प्रकारची बांधकामेही अवघड होती. डोंगराच्या कडेने जाणारा हा कालवा तयार करणे म्हणजे फार जिकिरीचे काम होते. या महत्वाच्या कालव्याचे काम अभियंता राजेंद्र पवार यांच्याकडे होते.

डिंभे धरणाचे काम आम्ही तेथे जाण्यापूर्वी बऱ्याचअंशी पूर्ण झाले होते. मात्र डाव्या आणि उजव्या कालव्यांची कामे अपूर्ण अवस्थेत होती. अनेक वर्षे कालव्याची कामे अर्धवट अवस्थेत असल्यामुळे पावसाळ्यात पाणी नदीत सोडून द्यावे लागत होते. ते पाणी घोड नदीत सोडून दिले जात होते. त्याचवेळी घोडनदीवर श्रीगोंदा तालुक्यात घोड प्रकल्प पूर्ण झाला होता. त्यामुळे तेथील लोक या प्रकल्पाचे पाणी पावसाळ्यात वापरायचे आणि उन्हाळ्यात डिंभे धरणाचे पाणी साठवून ठेवून ते वापरायचे. अशा परिस्थितीमुळे या भागातील लाभधारकांचा कल हा कालवा न होण्याकडे अधिक होता. या ना त्या कारणाने कालव्याला कायम विरोध केला जायचा. एकीकडे लोकांचा विरोध आणि दुसरीकडे कठीण खडकातून कालव्याचे नियोजन अशा कात्रीत हा कालवा अनेक वर्षे रखडला होता. या कालव्यामध्ये ३०० ते ४०० मीटर लांबीत अतिशय कठीण खडक होता. ते काम श्री राजेंद्र पवार यांच्याकडे होते. कठीण खडक असल्यामुळे सुरुंग लावून खडक फोडण्याशिवाय पर्याय नव्हता. परंतु सुरुंग घेतला तर त्या सुरुंगाचे दगड पायथ्याशी असलेल्या गावापर्यंत जायचे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांनी या कामाला जोरदार विरोध केला होता. याचाच फायदा घेत घोड प्रकल्प भागातील लाभधारक त्यांना फूस लावत असत. कारण त्यांना हा कालवा होऊ नये असेच वाटायचे. त्यामुळे या कालव्याचे काम अनेक वर्षे रखडले होते.

याच कालखंडात राज्यात सत्तांतर झाले. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना होऊन त्याअंतर्गत असणारी कामे सन

२००० पर्यंत पूर्ण करण्याचा निर्णय घेतला गेला आणि सगळ्याच कामांना गती प्राप्त झाली. त्याचवेळी कुकडी डाव्या कालव्याचे काम सन २००० पर्यंत पूर्ण करुन डिंभे धरणाचे पाणी येडगाव धरणात सोडण्याचा निर्णय झाला. यावेळी श्री राजेंद्र पवार यांच्या कामाची कसोटी लागली. त्यांनी आपले सर्व कौशल्य पणाला लावून काम सुरु केले. ग्रामस्थांचा तीव्र विरोध होता. काम सुरु झाले की लोक पोलीसांना घेऊन यायचे आणि काम बंद पाडायचे. त्यामुळे कंत्राटदार वैतागला होता. लोकांच्या विरोधामुळे कोणी कंत्राटदार काम करायला धजावतही नव्हते. अशावेळी काम तर वेळेत पूर्ण करायचे होते. त्यामुळे राजेंद्र पवार यांनी नवीन कंत्राटदार नेमला आणि ब्लास्टींग करुन खडक फोडण्याऐवजी चिझलिंग तंत्राचा वापर करुन खडक फोडण्याचा प्रस्ताव माझ्याकडे दिला. या तंत्राचा वापर करणे खर्चिक असले तरी लोकांचा होणारा विरोध लक्षात घेता ते अपरिहार्य होते. कारण यामुळे सुरुंगासारखे दगड उडून पायथ्याशी पडणार नव्हते. त्यामुळे मी त्या प्रस्तावाला त्वरीत मंजूरी दिली आणि श्री पवार यांनी मोठ्या धूमधडाक्यात काम सुरु केले.

हा कार्यकाल म्हणजे अगदी झपाटल्यासारखे काम करण्याचा होता. रात्रंदिवस काम चालू होते. ते रात्रंदिवस साईटवर थांबत असत. डोंगराळ भाग असल्याने आजूबाजूला हिंस्त्र पशुंचा वावर होता. एके दिवशी तर अक्षरश: वाघच त्यांच्यासमोर अवतरला. प्रसंगावधान राखून त्यांनी आपला बचाव केला. लोकविरोध कमी करण्याकामी त्यांचे कौशल्य पणाला लागले. हळूहळू लोकांचा विरोध कमी झाला आणि तब्बल ६० कि.मी. लांबीचा अत्यंत कठीण असा कालवा त्यांनी पूर्ण केला. खरोखरच डिंभे धरण ते येडगाव धरण हा कालवा तयार करण्याचे काम एक दिव्यच होते. ते श्री राजेंद्र पवार यांनी धडाडीने पूर्ण केले. डिंभे

धरणाचे पाणी त्यांनी येडगाव धरणात नेऊन सोडले आणि तेथून पुढे २६० किमी लांबीचा डावा कालवादेखील त्यांनीच पूर्ण केला. त्या कालव्याद्वारे पुणे, अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त लोकांपर्यत पाणी पोहचविले. हे एक ऐतिहासिक स्वरुपाचे काम झाले आहे.

त्यानंतर माझी मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. त्याचवेळी राजेंद्र पवार यांचे नारायणगावचे डिव्हिजन बंद करुन ते सातारा येथे हलविण्यात आले. श्री राजेंद्र पवार हे सातारा येथे गेले. त्यावेळी त्यांच्याकडे जिहे काठापूर उपसा सिंचन योजनेचे काम देण्यात आले. ही योजना म्हणजे सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागासाठी नवसंजीवनी योजना होती. या उपसा सिंचन योजनेमुळे सातारा जिल्ह्यातील खंडाळा आणि खटावसारख्या दुष्काळी भागाला पाणीपुरवठा केला जाणार होता. या भागातील शेतीला पाणी देण्यासाठी ही एक अभिनव योजना तयार करण्यात आली होती. श्री राजेंद्र पवार यांनी अतिशय चांगल्या पध्दतीनं नियोजन करुन आराखडा तयार केला. अनेक ठिकाणी कोल्हापुरी बंधारे आणि तलाव यांची निर्मिती करुन ते पाणी आसपासच्या शेतकऱ्यांना पुरविण्याची ती योजना त्यांनी कल्पकतेने पूर्ण केली. ही योजना त्यांनी अगदी जलद गतीने मार्गी लावली आणि पुर्णत्वासही नेली. त्यानंतर त्यांची पदोन्नतीवर बुलडाणा येथे बदली झाली.


बुलडाणा येथे त्यांनी अधीक्षक अभियंता म्हणून उत्तम कामगिरी पार पाडली. पुढे ते मुख्य अभियंता म्हणूनदेखील अमरावती येथे कार्यरत होते. या कार्यकालात देखील त्यांनी चांगली कामे केली आहेत. या काळात विदर्भाचा अनुशेष निर्मुलनाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणापर कामे हाती घेण्यात आली होती. अनेक प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे काम होते.

त्यातील बरीचशी कामे राजेंद्र पवार यांच्या कार्यकालात पुर्णत्वास गेलेली आहेत. चांगले काम करण्याची संधी त्यांना विदर्भात मिळाली. तेथेही त्यांनी आपल्या धडाडीच्या कामाची छाप सोडली आहे. पुढे त्यांनी मुख्य अभियंता जलविज्ञान नाशिक या पदावरही काम केले. या ठिकाणी कार्यरत असताना त्यांनी जागतिक बँकेमार्फत जलविज्ञान संबंधित नवीन प्रकल्प मंजूर करुन घेऊन तो पूर्ण केला. पुढे सचिव लाभक्षेत्र विकास झाल्यानंतरही अनेक महत्वाचे निर्णय घेतले. त्यापैकी एक म्हणजे ड्रोनच्या सहाय्याने प्रत्यक्ष सिंचनक्षेत्र किती आहे याची मोजणी करण्याचा अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प होय. हा एक प्रायोगिक स्वरुपाचा प्रकल्प असला तरी सिंचन क्षेत्र मोजण्याची हीच योग्य पध्दती असल्याचा निर्णय शासन घेत असल्याची माहिती मिळते आहे. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी काम केले त्या त्या ठिकाणी आपल्या वेगळेपणाची आणि बुध्दीमतेची छाप त्यांनी सोडलेली दिसून येते.

श्री राजेंद्र पवार हे जलसंपदा खात्यात विविध पदावर कार्यरत असताना जाणवलेली आणखी एक महत्वाची बाब म्हणजे त्यांचा असलेला प्रचंड जनसंपर्क ! ते जलसंपदा खात्यात सेवेत आहेत म्हणून केवळ याच खात्यातील लोकांशी त्यांचा संपर्क आहे असे नव्हे तर महसूल, बांधकाम, वने, पोलीस, शिक्षण, पाणीपुरवठा आणि जलसंधारण अशा सर्वच खात्यातील अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांशीही त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. त्या जनसंपर्काचा त्यांना आपल्या कारकिर्दीत चांगले काम करण्यासाठी खूप उपयोग झाला आहे. विविध क्षेत्रात वावरणाऱ्या विद्वानांशी, राजकीय व्यक्तिमत्वांशी आणि साहित्यिकांशीदेखील त्यांचा चांगला संपर्क आहे. त्यांचे वाचनही दांडगे असून त्यांच्या बोलण्यातून त्याची झलक जाणवते. बुध्दीमता, कष्ट करण्याची तयारी, जनसंपर्क,

तांत्रिक कौशल्य याच्या जोरावर त्यांनी आपली शासकीय सेवेतील कारकिर्द चांगल्या प्रकारे गाजविली आहे. एक माणूस म्हणूनदेखील त्यांनी मोठा गोतावळा जमा केला आहे. संयमी, मितभाषी आणि विचार करुन बोलणारे अधिकारी अशी वेगळी ओळख त्यांनी आपल्याबाबतीत निर्माण केली आहे. संकटे ही प्रत्येकाच्या आयुष्यात क्रमप्राप्त असतात पण त्यातून धीराने सामना करत पुढचे मार्गक्रमण करणे गरजेचे असते. आयुष्यातील संकटांना न डगमगता त्यांनी धीराने तोंड देऊन त्यावरही मात केली आहे. त्यामुळे ते एक धीरोदत्त व्यक्तिमत्वदेखील आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर आता सेवानिवृत्त होत आहेत. सेवा निवृत्ती ही एक नवी आवृती असते. त्यामुळे या पुढील आयुष्यासाठी त्यांना खूप शुभेच्छा!



तळमळीचा अधिकारी

इंजि.श्री. बी.एन.कंदरफळे
मा.कार्यकारी संचालक
गो.म.पा.वि.महामंडळ

इंजि. राजेंद्र पवार आणि इंजि. बी.एन.कंदरफळे हे जलसंपदा खात्यात समकालिन अधिकारी असल्याने मैत्रीचे संबंध आहेत. दोघांचे मूळ गाव लातूर जिल्ह्यात अहमदपूर तालुक्यात आहे

महाराष्ट्र राज्याच्या तात्कालिन पाटबंधारे व नंतर जलसंपदा असे नामकरण झालेल्या खात्यात अनेक नामवंत अधिकाऱ्यांनी आपल्या कामांचा ठसा उमटविलेला आहे. त्या अधिकाऱ्यांमध्ये सोलापूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांचा मोठा वाटा आहे. याचे कारणही तसेच आहे. हे दोन्ही जिल्हे कायम दुष्काळी जिल्हे म्हणून प्रसिध्द आहेत. पावसाचे प्रमाण अतिशय कमी आहेत. त्यामुळे पावसाळ्यातही नद्या – नाल्यांना पाणी येत नाही. अशा परिस्थितीत दरवर्षी टँकरने पाणी पुरवठा ठरलेला असायचा. अशा वेळी या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची मुले शिकायला लागली. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या दुष्काळग्रस्त मायबापांचे हाल

कमी करण्यासाठी व्हावा यासाठी ८० च्या दशकातील तरुणांची आख्खी पिढीच्या पिढी इंजिनियरींगकडे वळाली. त्यातील बहुतांश मुलांनी सिव्हील इंजिनियरींग करून काहीनी बांधकाम खात्याचा तर काहीनी तात्कालिन पाटबंधारे खात्याचा रस्ता धरला! जेणे करून आपल्या दुष्काळग्रस्त भागात पाणी कसं आणता येईल आणि शेती करताना मेटाकुटीस आलेले आपले शेतकरी मायबाप कसे सुखी होतील! यासाठी पोरांची ही सारी धडपड होती. त्यातून कष्टाळू आणि सामाजिक बांधिलकीने कट्टीबध्द अशी मोठी अभियंत्यांची फळी तयार झाली आणि उस्मानाबाद आणि सोलापूर जिल्ह्यांत सिंचनाची मोठी कामे झाली आहेत.

बारमाही दुष्काळग्रस्त म्हटल्या गेलेल्या या दोन्ही जिल्ह्यातील माळरानावर अलिकडे द्राक्षे आणि ऊसाची लागवड झाली असल्याचे दिसून येत आहे. ही सारी किमया केवळ या भागातील दुष्काळाची झळ पोहचलेल्या शेतकऱ्यांची मुले या पाटबंधारे खात्यात आल्यामुळे तितक्या तीव्रतेने झाली आहेत. आपल्या मातृभूमिसाठी काहीतरी केले पाहिजे या जाणिवेने हे नवे अभियंते काम करीत होते.

जलसंपदा खात्यात सचिव, कार्यकारी संचालक, महासंचालक या समकक्ष पदावर काम करून गेलेले जेवढे अधिकारी आहेत त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक अधिकारी आहेत आणि त्यानंतर उस्मानाबादचे! उस्मानाबाद जिल्ह्यामधील अधिकाऱ्यांपैकी एक म्हणजे इंजि. राजेंद्र पवार हे आहेत. त्यांचे वडील नोकरी निमित्त रहात असलेले गाव हे सोलापूर आणि उस्मानाबादच्या सीमेवरील येडशी हे आहे. परंतु त्यांचे मुळ गाव हे आमच्याच अहमदपूर तालुक्यातील तळेगाव हे आहे. असे असले तरी त्यांचा सेवा काळ हा पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या राज्याच्या सर्व विभागामध्ये गेला आहे. जलसंपदा

खात्यात वेगवेगळ्या पदांवर काम करताना त्यांनी शेतकऱ्यांप्रति असणारी तळमळ आणि कामावरील निष्ठा या बाबींचा विचार केला. त्यामुळे राजेंद्र पवार हे एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून खात्यात कार्यरत आहेत. मी जेव्हा मंत्रालयात मुख्य अभियंता तथा सहसचिव म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी ते शासकीय बैठकांच्या निमित्ताने मंत्रालयात येत असत. त्यावेळी आमचा जवळून परिचय झाला. कामाच्या व्यतिरिक्त त्यांच्या आग्रहाखातर आम्ही एकदा खात्याच्या दौंडजवळील पेरूच्या बागेला भेट दिली होती. त्यावेळी त्यांचा स्वभाव आणि पाहूणचार जवळून पहाता आला होता. कमी बोलून जास्तीत जास्त काम करण्याची त्यांची पध्दत आहे. खात्यात वेगवेगळ्या पदांवर काम करताना ते वेळोवेळी दिसून आले आहे. लाभक्षेत्र विकास (कडा) सचिव पदी येण्यापूर्वी त्यांनी मेरी (नाशिक) येथेही महासंचालक म्हणून काम पाहिले आहे. प्रत्येक ठिकाणी सचोटीने त्यांनी काम केले आहे.

श्री. राजेंद्र पवार हे अधिकारी म्हणून चांगले काम करणारे आहेतच. त्याचबरोबर एक चांगला माणूस म्हणून ते सर्वांशी परिचित आहेत. खूप मोठा असा मित्र परिवार त्यांच्याकडे आहे. त्यामध्ये केवळ शासकीयच नव्हे तर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गजांचा त्यात समावेश आहे. विशेष म्हणजे सामान्य लोकांशी त्यांची नाळ जोडली गेली आहे. त्यामुळे त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीवर लोक खूश असतात. आपल्या शासकीय सेवेच्या उत्तरार्धात महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. त्याचे त्यांनी सोने केले. यापुढील आयुष्यातही त्यांनी असेच कार्यरत रहावे आणि लोकसेवा करीत रहावे या शुभेच्छा! पुढील आयुष्य त्यांना उत्तम आरोग्यदायी आणि सुखसमृध्दीचे जावो या शुभेच्छा!



डायनॅमिक ऑफिसर

इंजि.श्री. अ.अ.कपोले
मुख्य अभियंता तथा
सहसचिव जलसंपदा मंत्रालय
मुंबई
इंजि.राजेंद्र पवार मंत्रालयात सचिव असताना त्यांचे सहकारी सहसचिव म्हणून श्री कपोले कार्यरत आहेत.

तात्कालिन पाटबंधारे आणि आताच्या जलसंपदा खात्यात जेव्हा मी दाखल झालो. त्यावेळी खात्यात डॅशिंगपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे संपुर्ण खात्यात चर्चिली जायची. नवीन येणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी केलेल्या कामांची ओळख करून दिली जायची. त्यातून त्या अधिकाऱ्यांची भेट देखील व्हायची आणि मग मार्गदर्शन मिळत जायचे. मी या खात्यात दाखल झालो तेव्हा अशा काही मोजक्या अधिकाऱ्यांची नांवे चर्चेत होती. त्यात कुकडी प्रकल्पावरील नारायणगाव येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असलेले इंजि. राजेंद्र पवार साहेब यांचे नांवही चर्चेत होते. पाटबंधारे खात्यातील एक डायनॅमिक ऑफिसर अशी त्यांची संपूर्ण खात्यात चर्चा व्हायची. त्यावेळी त्यांची माझी पहिली भेट कुकडी प्रकल्पावर झाली.

परंतु ती भेट खात्यात नवीन दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना ओळख करुन द्यायची म्हणून फक्त औपचारिक होती. त्यावेळी फारसे बोलणे झाले नाही. पहिल्या भेटीतच त्यांची तरूण, हसरे आणि चेहऱ्यावरील तेज कायम असलेले अधिकारी म्हणून आमच्यावर छाप पडली ती आजतागायत कायम आहे. याशिवाय कुकडी प्रकल्पाचे बांधकाम त्यांच्याच कारकिर्दीत पूर्ण झाले होते. त्यावेळी त्यांच्या कामाच्या धडाक्याची चर्चा खात्यातील अधिकाऱ्यांमध्ये व्हायची. पुढे ते कुकडी प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता देखील झाले. त्यामुळे या कुकडी प्रकल्पाशी त्यांचे नाव जोडले गेले आहे.

श्री. पवार साहेब यांच्या स्वभावा विषयी सांगायचे तर त्यांचा स्वभाव गोड आणि मनमिळावू आहे. कुठल्याही कर्मचाऱ्याला कधीही रागाने बोलताना मी तरी पाहिले नाही. राग आला तर तेवढ्या पुरते समजावण्याच्या सुरात बोलतील. पण विषय संपला की ते सर्व विसरून जातील. असे असले तरी कामातील शिस्त आणि टापटीपपणा मात्र त्यांना खूप आवडतो. बेशिस्तपणा त्यांना अजिबात चालत नाही. बेशिस्त वागणारांना मात्र ते शिस्तीत आणून बसवतात. त्यांची बुध्दीमता अलौकिक आहे. त्यांच्या बुध्दीमतेची झलक त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते. आपल्या खात्याच्या विषयात तर त्यांचे भरपूर ज्ञान आहेच, याशिवाय इतर विषयातीलही त्यांचे ज्ञान प्रगाढ आहे. ते त्यांच्या बोलण्यातून वारंवार दिसून येत असते. प्रथम दर्शनी एकाद्याला वाटते की साहेब वेगळ्या विषयावर बोलतात की काय? परंतु त्यांचे बोलणे विचारपूर्वक ऐकल्यानंतर लक्षात येते की ते जे बोलतात ते चालू विषयावरच आहे. परंतु पुढचे दोन टप्पे लक्षात घेऊन मांडलेले ते विचार असतात हे नंतर लक्षात येते.

श्री. पवार साहेबांनी कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता म्हणून ज्या ज्या ठिकाणी काम केले त्या त्या ठिकाणी त्यांनी

आपल्या बुध्दीमतेची झलक दाखवून दिली आहे. पुढे ते लाभक्षेत्र विकास विभाग अर्थात कडा सचिव म्हणून मंत्रालयात आल्यानंतर त्यांच्यासोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. यावेळी अगदी जवळून त्यांचे व्यक्तिमत्व अनुभवता आले. तसे आम्ही पुणे येथे एकत्र होतो. परंतु त्यावेळी ते कुकडी मंडळाचे अधीक्षक अभियंता होते तर मी पुणे मंडळाचा अधीक्षक अभियंता होतो. त्यामुळे फक्त बैठकीच्या वेळी गाठभेटी व्हायच्या. परंतु मंत्रालयात आल्यानंतर आम्ही एकत्र काम करायला सुरूवात केली आणि त्यांच्या स्वभावातील एकेक थर उलगडत गेले आणि त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व जाणवत गेले.

श्री पवार साहेब हे एक बहूआयामी व्यक्तिमत्व आहेत. तसेच ते सर्वगुण संपन्नही आहेत. त्यांचा मला सर्वात जास्त आवडलेला गुण म्हणजे जे आपल्याला माहित नाही ते प्रांजळपणे कबूल करून ते जाणून घेण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करतात. मग ती माहिती एकाद्या कनिष्ठांकडून मिळवायची असेल तरी त्यात ते कमीपणा मानत नाहीत. इगो नावाची गोष्ट त्यांच्याकडे अजिबात नाही. म्हणून ते मनाने मोठे आहेत. जिथे इगो आड येत नाही ती माणसं पदाने आणि मानानेही खूप मोठी होतात. त्यामुळेच साहेब एक मोठ्या मनाचा, दिलदार आणि प्रसन्न व्यक्तिमत्वाचा अधिकारी म्हणून खात्यात प्रसिध्द आहेत. त्यांची समजावून सांगण्याची पध्दत अतिशय सोपी अणि चांगली असते. त्यांनी सांगितलेला विषय कधी समजला नाही असे कदापि होत नाही. त्यासाठी ते स्वत: एकाद्या विषयाबद्दलचे संपूर्ण ज्ञान आत्मसात करतात आणि मग ते अगदी अधिकार वाणीने त्या विषयावर बोलतात. त्यांचे मार्गदर्शन अतिशय सुरेख असते. त्यांचे मार्गदर्शन म्हणजे एक पर्वणी असते.

लाभ क्षेत्र विकास विभागाचे सचिव म्हणून ते मंत्रालयात आल्यानंतर

सिंचन व्यवस्थापनात त्यांनी अनेक महत्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. काही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. या अगोदर सिंचन व्यवस्थापनाचा खर्च शंभर टक्के होता. तो त्यांनी २५ टक्के कमी केला. त्यामुळे उरलेली रक्कम दुरूस्तीच्या कामासाठी उपयोगात आणता आली. हा एक महत्वाचा निर्णय आहे. याशिवाय राज्यपालांकडून निर्देशित बजेटच्या केवळ दोन टक्के रक्कम दुरूस्तीच्या कामासाठी वापरली जायची. परंतु साहेबांनी प्रयत्न करून ती १० टक्केपर्यंत वाढवून घेतली. त्यामुळे आता दुरूस्तीच्या कामासाठी अधिक प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे केंद्र सरकारची जी ड्रीप धरण सुरक्षा योजना आहे. त्यात महाराष्ट्राचा सहभाग करून घेतला. त्यामुळे केंद्र सरकारच्या माध्यमातून जागतिक बँकेच्या माध्यमातून निधीची उपलब्धता होणार असून त्यामुळे आपल्या महाराष्ट्र राज्यातील १४० धरणांची सुरक्षितता पक्की झाली आहे. असे काही अतिशय महत्वाचे निर्णय त्यांनी घेतले आहेत.

साहेबांचा स्वभाव शांत, सरळ आणि मनमिळावू असल्यामुळे कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना समजावून घेऊन त्यांच्याशी सौहार्दाचे वर्तन करतात. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात त्यांच्या विषयी नितांत आदर आणि प्रेम आहे. त्यामुळे सहाजिकच ऑफिसमधील वातावरण हेल्दी असते. याचा सकारात्मक परिणाम कार्यालयातील कामकाजावर होतो आणि कुठल्याही प्रकारचा कंटाळा किंवा आळस न करता सर्वजन आनंदाने काम करत असल्याचे दिसून आले आहे. त्यांचा हा स्वभाव फक्त ऑफिसपुरताच मर्यादित नाही तर बाहेरदेखील त्यांचे असेच वागणे असते. कार्यालयातील सहकारी असोत, कर्मचारी असोत किंवा मित्र असोत त्यांच्या कुटुंबांची चौकशी आस्थेने करतात. प्रसंगी मार्गदर्शन करतात. त्यामुळे कौटुंबिक जिव्हाळा निर्माण होतो आणि आपुलकी निर्माण करतात.

अशी शेकडो कुटुंबे त्यांच्याशी जोडली गेली आहेत. संपुर्ण जलसंपदा खाते म्हणजे एक कुटुंबच आहे असे समजून ते प्रत्येक घटकाशी वागत असतात.

साहेबांचा जनसंपर्क खूप मोठा आहे. राजकीय नेते, सामाजिक नेते अशा सर्व क्षेत्रातील लोकांशी त्यांचे चांगले संबंध आहेत. या ओळखीचा ते शासकीय कामात कधी अडथळा आला तर मोठ्या खुबीने उपयोग करुन घेतात. विशेषत: कालव्यांच्या कामाबाबत जेव्हा शेतकरी अडचणी निर्माण करीत त्यावेळी ते आपले कौशल्श पणाला लावून ते काम पूर्णत्वास नेत असत. अशा पध्दतीने काम केल्यामुळे जिथे जातील तेथे त्यांनी चांगल्या पध्दतीने काम केले असल्याचे दिसून येते. प्रदीर्घ सेवेनंतर आता ते सेवानिवृत्त होत आहेत. साहेबांना पुढील आयुष्य सुखसमृध्दीचे आणि आरोग्यदायी जावो या शुभेच्छा! साहेबांचे मार्गदर्शन आजपर्यंत मिळालेच आहे. यापुढेही ते मिळत राहील अशी अपेक्षा ठेवून थांबतो!



जगन्मित्र राजेंद्र

इंजि.श्री. चंद्रशेखर हंगेकर

मा.अधीक्षक अभियंता जलसंपदा इंजि.राजेंद्र पवार यांच्यासोबत अमरावती येथे कार्यरत असताना सहकारी म्हणून कार्यरत होते. खात्यातील जुने व जवळचे सहकारी मित्र आहेत.

१९८७ साल. जून महिना.

नारायणगाव, ता जुन्नर येथील पाटबंधारे खात्याचे विश्रामगृह. मी नुकताच सहाय्यक अभियंता वर्ग २, डिंभे कालवा उपविभाग, नारायणगाव या पदावर बदलीने स्थानापन्न. वरिष्ठांच्या भेटीसंदर्भाने सकाळी सकाळी लवकर आवरुन सर्व खाशा स्वाऱ्या विश्रामगृहावर डेरेदाखल. मी पोहचलो तेव्हा व्हरांड्यातच एक प्रसन्न व्यक्तिमत्व हसतमुखाने एकाचवेळी अनेकांशी बोलताना उभे असलेले. त्यांच्या भोवतालच्या कोंडाळ्यातून मार्ग काढून त्यांच्या जवळ जाऊन पाहिले की हे कोण? औपचारिक ओळख कुणीतरी करुन देण्याची गरज पडली नाही. खूप जुना स्नेह असल्याप्रमाणे राजेंद्र व मी, आम्ही दोघे मित्र झालो. आमचा एक लगेच कंपू तयार झाला.

आमच्या कंपूत वयोगट, अधिकारी- कर्मचारी, श्रमिक, कामगार, वाहन चालक असा कोणताही भेदभाव न होता सगळे आरामात सामावले गेले. कारण राजेंद्र या नावाचे एक असे व्यक्तिमत्व की ज्याच्याशी आपलं मैत्र कधी कसं जुळतं ते कळतच नाही. कळलंच तर नंतर लक्षातही रहात नाही. त्या काळात आम्ही अनेक डोंगरदऱ्या पालथ्या घातल्या. शिवनेरीस वळसा घालून नाणेघाटातून पायी खाली उतरुन वैशाखरेमार्गे परत येणे, हडसर, चावंड सर करणे, असे आमचे भरगच्च कार्यक्रम रविवारच्या सुट्टीत चालत. शिवनेरी लेण्याद्री अनेकदा झाले. खिरेश्वरमार्गे हरिश्चंद्र गडावर दोन तीनदा गेलो. त्यावेळची माझ्या संग्रहातील काही छायाचित्रे आहेत ती मुद्दाम देत आहे.

एक अभियंता या नात्याने आसपासचा परिसर न्याहाळता यावा, त्याचा भविष्यात उपयोग व्हावा यासाठी नारायणगाव उपविभागीय कार्यालयातील एकमेव उपलब्ध दुर्बिण आवर्जून सोबत घेण्यातील समयसुचकता आपल्या लक्षात येईल. हरिश्चंद्र गडावर गेल्यानंतर मला अचानक दोन्ही गुडघ्यांना प्रचंड त्रास होऊ लागला. ते असे दुखत होते की मला माझे पाय बाहेरच्या बाजूने धनुष्याकृती वाकल्यासारखे वाटत होते. त्यावेळी भराभर राजेंद्रने माझ्या पायाना बाम लावून दिले. घट्ट रुमालाने बांधून अक्षरशः मला माझ्या पायावर उभे केले. साठी उलटल्यावर दोन वर्षापूर्वी मी गिरनार पर्वत चढून गेलो. काही त्रास झाला नाही. थँक्स टू डॉक्टर राजेंद्र! पादस्पर्शम क्षमस्व मे..!

आम्ही दोघे संगणकात विशेष रुची असणारे व त्याचा उपयोग कार्यालयात दैनंदिन कामात करण्यात पुढाकार घेणारे होतो. फॉट्रॉन फोरमध्ये कालव्याचे प्राक्कलन करण्यासाठी आज्ञावली तयार करणे हा त्या काळात आमच्यासाठी आवडीचा उद्योग होता. पुढे या उद्यमशिलतेने अमरावतीत आम्हा दोघांना २०११ ते २०१५ या कालावधीत खूप यश मिळवून दिले.

जसे की डिजिटल सिग्नेचरचा प्रथम वापर, डेडिकेटेड डाटा लाइन वापरुन व्हिडिओ कॉंफरन्सची सोय, बँकासंदर्भातील पैशाचे देण्या घेण्याचे सर्व व्यवहार ऑनलाइन करुन कार्यालय पुर्णत: कॅशलेस बनविणे, इमेल व चॅटिंगद्वारे बैठकातील माहिती विनाविलंब सर्व संबंधिताना मिळेल याची खबरदारी घेणे इ.

संगणकावरुन आठवले. नारायणगावहून निघून पुण्यात संभाजी उद्यानासमोर कोलंबस नावाच्या एका वधूवर संशोधन केंद्रात मी व राजेंद्र गेलो होतो. साधारण१९९२ संपता संपता किंवा १९९३ च्या सुरुवातीच्या आसपासची गोष्ट. आम्ही दोघे तसे नूतन विवाहितच होतो. परंतु राजेंद्रच्या धाकट्या बंधुसाठी ही मोहीम होती. बाजारात पीसी या प्राण्याचा नुकताच सुळसुळाट झालेला होता. मला चांगले आठवते. त्या संशोधन केंद्रात त्यावेळेस त्या मुलीने संगणकावर सादरीकरण करुन अनुरुप स्थळांची फोटोसहितची माहिती, वर्णन, प्रशंसा, (एक प्रकारचे मार्केटिंगच म्हणा ना!) आमच्यासमोर असे काही कार्यक्षमतेने केले की तेव्हा आम्ही दोघेही आम्ही आधीच विवाहित असल्याचे विसरुनच गेलो होतो. संगणकाच्या पडद्यावरुन आम्हाला कष्टपूर्वक नजर हटवावी लागली होती. संगणकातील विशेष रुची म्हणा किंवा वय वेडं होतं म्हणा. असो.

आम्ही दोघे कधी एकाच मुख्यालयात, कधी एकाच मंडळात, तर कधी सहकारी म्हणून तर कधी राजेंद्र माझे वरिष्ठ अधिकारी म्हणून असे अनेक वेगवेगळ्या भूमिकातून एकमेकांच्या संपर्कात आलो. पण मैत्रीचा धागा अतूट राहिला. माझे माहेर संगमनेर तर माझ्या सौ.चे पुणे. नारायणगावात असताना त्यावेळी आम्हा पतीपत्नीत एक सामंजस्य असे. सासर माहेरची लुडबूड होऊ न देण्याचे. दोन माहेरांच्या मध्ये अशी आमची पंढरी तब्बल सात वर्षापेक्षाही अधिक काळ होती ना! नंतर नारयणगावहून माझी बदली पदोन्नतीवर नाशिक येथे झाली. एकदा माझे वडील अनेकवेळा

ये-जा करीत तसे संगमनेरहून पुण्यास काही कामानिमित्त गेले होते. वाटेत सवयीने नारायणगावला वसाहतीत गेले. माझा कुटुंब कबिला नाशिकला गेल्याचे त्यांच्या लक्षातच नव्हते. सुदैवाने राजेंद्र आणि त्यांची गाठभेट झाली. त्यावेळेस राजेंद्रने त्यांना दिलेला मानसिक आधार माझ्या आजही लक्षात आहे. शेखर इथे नसला म्हणून काय झाले? मी आहे ना! हे त्याचे शब्द आजही माझ्या हृदयात आहेत.

गुरुवर्य व राजेंद्र याचे पदव्युत्तर अभ्यासाचे मार्गदर्शक, अभियंता श्री एन. आर.पटवर्धन यांना अनेक महत्वाच्या कार्यक्रमांना अगत्याने बोलावणे, त्यांना सपत्निक डिंभे धरण, भीमा सीना जोडकालवा व बोगदा दाखवणे, अनेक सभामध्ये अध्यक्षपद देणे व गुरुऋण फेडण्याचा प्रामाणिक अट्टाहास धरणे हे सर्व राजेंद्रकडून शिकण्यासारखे आहे. केवळ त्याच्यामुळेच हे शक्य झाले आहे. आपण कधीही कोठेही गेलो की कोठे असता ? काय करता? असे औपचारिक विषय बोलण्यात निघाले की समोरचा लगेच विचारायचा, पाटबंधारे? अहो, मग राजेंद्र पवार यांना ओळखता का? यावर मी म्हणत असे की, अहो, त्यांना कोण नाही ओळखत! ते जगन्मित्र आहेत! जगन्मित्र!! मला तर हा अनुभव इतक्या वेळेस आलाय की आता त्याचे नवल वाटेनासे झाले आहे. कारण तशी गुणोपासनाच केलीय राजेंद्रने! एकदा मी त्याना विचारले होते की कसे काय जमते हो इतक्या सर्वांशी संपर्कात रहायला? त्यावर त्यांचे उत्तर खूप विचार करायला लावणारे होते. काँटॅक्टस आवर्जून मेंटेंन करायचे असतात. संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तिशी मन:पूर्वक प्रेमाने आणि जिव्हाळ्याने वागणारा असा एक मित्र मला मिळाला हे माझे सौभाग्य आहे.

राजेंद्रने कळंब वसाहतीत गणेशोत्सवात बसवलेले नाटक व त्याचे प्रयोग त्यासाठी ध्वनी संयोजन, खात्याच्या बाहेरील अन्य अधिकाऱ्यांशी वेळोवेळी घेतलेल्या बैठका व त्यात आपली बाजू प्रभावीपणे मांडणे, भूसंपादनासारख्या पदोपदी मानवी संबंध येणाऱ्या कामात सर्व संबंधिताना

प्रेमाने जिंकून घेऊन त्यांचे सहकार्य मिळवून धरण कालवे इ. कामांसाठी चांगला उपयोग करुन घेणे अशा अनेक गुणांबाबत खूप काही लिहिता येईल.

फेब्रुवारी २०१८ मध्ये मी डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी बडोद्यास गेलो होतो. जाण्यापूर्वी राजेंद्रची आठवण आली. फोन केला. कारण त्याची साहित्याची जाण व आवड मला अनेकदा जाणवली होती. प्रसंगोचित शाब्दिक कोटी असो वा रटाळ शासकीय भाषेतील पत्रात किंवा टिपणीत त्यांनी पेरलेले एकादे खुमासदार साहित्यिक वाक्य असो. असा असा निघालोय, येताय का? त्यावेळी त्यांना कार्यबाहुल्याने शक्य झाले नाही. पण एका क्षणात त्यांनी मला सांगितले की १९८० साली ५४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बार्शीला झाले होते. त्यावेळी मी विद्यार्थी होतो, परंतु उपस्थित होतो. अशा साहित्याचीच काय पण इतरही अनेक विविध व विशिष्ट आवडी निवडी जपणारा असा हा हरहुन्नरी अवलिया मला खूप जवळून बघायला मिळाला.

अशा या जगन्मित्रास शासकीय सेवेत सर्वोच्च मानाचे स्थान मिळाले आहे नव्हे ते त्याने भूषविले आहे असे म्हणणे अधिक योग्य ठरावे. त्यांना आणखीही पुढे जाऊन मानाची पदे मिळावीत व त्यांच्या ज्ञानाचा, कार्यकौशल्याचा शासनास, समाजास उपयोग व्हावा या शुभेच्छासह संगणकाच्या कुंजीफलकास विराम.



एक निखळ मैत्रीचा मोती

इंजि.श्री. उल्हास देबडवार
मुख्य अभियंता सा.बां.प्रा.वि. नागपूर

इंजि. उल्हास देबडवार आणि इंजि. राजेंद्र पवार हे बॅचमेट आहेत. अद्यापही त्यांची मैत्री कायम असून वेगळ्या खात्यात असूनही मैत्री जपली आहे

राजेंद्रची आणि माझी पहिली ओळख आणि मैत्री एकदाच झाली. मला वाटतं की, बहुतेक १९९५ किंवा १९८६ मध्ये राजा आमच्याकडे पाटबंधारे विभागाच्या वर्ग-१ अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी नांदेडला आला होता आणि त्या प्रशिक्षणाच्या काही कालावधीपैकीच थोडे दिवस मी आणि आम्हा दोघांचा एक कॉमन मित्र आहे श्री. नंदू नारलावार व राजा आम्ही एकत्र राहिलो. राजेंद्र हा अतिशय मोकळ्या स्वभावाचा मित्र आहे. आमची मैत्री झाल्यापासून आतापर्यंत मी जेव्हाही राजाशी बोललो तेव्हा मला तो नेहमीच फक्त हसत मुख दिसला.

मागील ३०-३५ वर्षामध्ये राजाच्या जीवनामध्येही अनेक चढ-उतार आले असतील, सेवा कालावधीमध्ये देखील चढ-उतार आले असतील,

तथापि जेव्हाही मी राजेंद्रला फोन केला तेव्हा तो माझ्याशी हसत मुखाने बोलला आणि तो खूप मोठ्या तणावात आहे, असे मला कधीही जाणवले नाही. त्याचा हा गुण मला अगदी १९८५-८६ पासून आठवतो व त्याच्यात कधीही बदल झाला नाही. Hats off to you राजेंद्र!

राजेंद्र पाटबंधारे विभागामध्ये आहे व मी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये आहे, त्यामुळे तसे कधी प्रत्यक्ष आम्ही सोबत म्हणा किंवा एका ठिकाणी, एकाच गावामध्ये आमची एकत्र सर्व्हिस झालेली नाही. परंतु मला अंदाज व खात्री आहे की, त्याने जेथे कुठे शासनाची सेवा केली असेल तेथील त्याचे subordinates व boss मंडळी त्याचे सोबत सेवा करतांना निश्चितच खूष, आनंदी असतील. कारण तो नेहमी अगदी low profile असतो. त्याच्या सेवाजेष्ठ अधिकाऱ्यांना त्याच्यापासून कधीच त्रास झाला नसावा, असा माझा अंदाज आहे.

नांदेडच्या आमच्या आठवणी खूपच छान आहेत. तो नंदू आणि मी सकाळी महानगरपालिकेच्या swimming tank मध्ये पोहायला जायचो आणि भरपूर पोहून झाल्यानंतर थकल्यासारखं व्हायचं म्हणून swimming tank मधून बाहेर आलो की, आम्ही भजी खायचो. ते मला आताही आठवतं. खूपच मजेशीर असे ते दिवस होते, अगदी महाविद्यालयीन जीवनापेक्षाही अधिक चांगली enjoyment आम्ही तेव्हा करायचो. कारण त्यावेळी सर्व्हीस पण असल्यामुळे थोडे फार पैसे जवळ राहायचे. राजेंद्रसोबतचे ते सोनेरी दिवस आम्ही कधीच विसरणार नाही. जरी तो कालावधी अल्प असला तरी तो काळ नेहमीसाठीच माझ्या सदैव स्मरणात राहिलेला आहे. राजेंद्र, वहिनी आणि त्यांचे सर्व कुटुंबियांना आमच्या सर्व कुटुंबियांतर्फे खूप खूप हार्दिक शुभेच्छा!



मी अनुभवलेले राजेंद्र पवार साहेब

इंजि. चं.आ.देशमुख
से.नि.सहाय्यक मुख्य अभियंता अमरावती
इंजि. राजेंद्र पवार अमरावतीला मुख्य अभियंता असताना श्री. देशमुख त्यांचे सहाय्यक मुख्य अभियंता होते.व मित्र देखील आहेत.

राजेंद्र पवार साहेब मुख्य अभियंता म्हणून जलसंपदा विभाग. विशेष प्रकल्प अमरावती येथे रूजू झाले. त्यावेळी मी सहाय्यक मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होतो. पवार साहेबांचे मार्गदर्शनामध्ये काम करतांना जे अनुभव मला आलेत. त्याबद्दल इतरांना सुध्दा माहिती व्हावी त्यासाठीच हा शब्दप्रपंच.

नावामध्ये काय असते याची प्रचिती साहेबांना आली असावी म्हणूनच ओळख करून देतांना किंवा शासकीय पत्रव्यवहारामध्ये साहेब नेहमीच आपल्या नावाचा राजेंद्र पवार असाच वापर करीत. इतर अधिकारी आडनाव आणि नावाचे अद्याक्षरे याचाच वापर करीत असत. राजेंद्र पवार नावाचा वापर करणे हे साहेबांचे गुण विशेष होते. स्वभावाबद्दल बोलायचे

झाले तर साहेब शांत, मनमिळावू, प्रेमळ आणि मितभाषी आहेत. रागावणे हे साहेबांना माहितच नव्हते. प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वत:चे ब्लड प्रेशर न वाढवता काम करण्यात त्यांचा हातखंडा होता. कामकाजाबद्दल बोलायचे झाले तर साहेब प्रत्येक प्रकरणाचा सखोल अभ्यासाअंतीच निर्णय घेत होते. तांत्रिक बाबीमध्ये प्रकल्पाचे कामात निरनिराळे पर्यायाचा अभ्यास करून तांत्रिकदृष्ट्या सफल व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पर्याय निवडण्याचा साहेबांचा आग्रह असायचा. या वृत्तीमुळे निम्नस्तरावरील अधिकाऱ्यांना सुरूवातीला कंटाळा यायचा. परंतु योग्य पर्यायाची निवड झाल्यानंतर आपल्या परिश्रमाचे मोल झाल्यामुळे निम्नस्तरावरील अधिकारी देखील आनंदी व्हायचे.

अमरावती प्रदेश म्हटला की, सिंचन क्षमता निर्मितीमध्ये अनुशेष असलेला प्रदेश. सिंचन अनुशेष निर्मुलन करण्यासाठीच मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, अमरावती कार्यालयाची स्थापना झाली होती. शासनाचे या कार्याक्रमामध्ये राजेंद्र पवार साहेबांनी हिरिरीने भाग घेतला. सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमामुळेच माझे आणि राजेंद्र पवार साहेबांचे घनिष्ट संबंध आलेत. दर तीन महिन्यांनी उपरोक्त कार्यक्रमाचा आढावा मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे होत होता. उपरोक्त कार्यक्रमाअंतर्गत विविध मंडळ कार्यालय तसेच सर्व अधिकाऱ्यांसमवेत योग्य समन्वय साधून माहिती घेणे व त्यांचे संकलन करून मा. राज्यपाल महोदयांकडे प्रेझेंटेशन करण्याचे जिकीरीचे काम राजेंद्र पवार साहेबांनी यशस्वीपणे पार पाडले आहे. विदर्भ पुत्र नसतांना विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळावा या प्रामाणिक हेतूने राजेंद्र पवार साहेब मुख्य अभियंता म्हणून कार्यरत राहिले.

कालांतराने साहेबांना कार्यकारी संचालक, सचिव म्हणून पदोन्नती मिळाली. उपरोक्त दोन्ही पदावर सुध्दा त्यांनी निष्ठापूर्वक काम केले आहे.

या ठिकाणी कार्यरत असताना त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. त्यांच्या कामाची पध्दत ही शिस्त आणि टापटीपपणा याला धरुन असते. कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकारी यांच्याकडून अतिशय कुशलतेने काम करुन घेण्याची त्यांची एक वेगळी हातोटी आहे.

राजेंद्र पवार साहेब, यांच्या सहवासात केलेल्या कामाची आठवण माझे स्मरणात नेहमीच राहील. साहेब आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. पुढील वाटचालीमध्ये मी त्यांना सुयश चिंतितो. त्यांना निरोगी आरोग्य लाभो व यशाचे शिखर साहेबांनी गाठण्याकरीता ईश्वर त्यांना शक्ती प्रदान करो ही ईश्वर चरणी प्रार्थना!



पाठीराखा मित्र

श्री.शिवचलप्पा न्यामणप्पा मुन्नोळी
उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे संशोधन व जलनि:सारण उपविभाग, स्वारगेट, पुणे-३७

सन १९७७ या वर्षात शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर (GPS) या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी न भुतो न भविष्यती असे स्थापत्य अभियांत्रिकीसाठी एकदम ६०-६० असे दोन तुकडीमध्ये एकूण १२० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचे शासनाने निश्चित केले होते. कदाचित त्यावेळचे स्थापत्य अभियांत्रिकीचे, सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे खात्यातील (आताचे जलसंपदा विभाग) स्थापत्य अभियंत्यांचे कामाचा आवाका, व भविष्यातील या दोन्ही विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्प आराखड्याचा विचार करुन, भविष्यातील स्थापत्य अभियंत्यांची आवश्यकता विचारात घेवून शासनाने GPS अंतर्गत एकदम एकाच वेळी २ तुकडी करीता मान्यता दिलेली असावी. D.C.E साठी इ.१० वी चे

विद्यार्थी पात्र असल्याने निवड झालेल्या एकूण १२० विद्यार्थी पैकी ९०% सुमारे १५ ते १६ वयोगटाचे होते. मी सुद्धा या १२० विद्यार्थी पैकी एक होतो. फरक एवढाच कि मी कन्नड भाषिक. मराठी भाषेचा गंध नसलेला विद्यार्थी होतो. मी आयुष्यात सोलापूर शहरात सुध्दा पहिल्यांदाच आलेलो पण सोलापूर शहरात बरेच कन्नड भाषिक असल्याने दैनंदिन जीवनात एवढा त्रास होत नव्हता. त्यात मी वास्तव्यास सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर देवालयांतर्गत चालविले जात असलेले, तुळजापूर वेस जवळील श्री. सिध्दरामेश्वर वस्तीगृहात होतो. तेथे लिंगायत समाजातील आसपासच्या गावातील विद्यार्थी कन्नड भाषा येणारे असल्याने मला मराठी भाषेचा त्रास होत नव्हता. परंतू GPS मध्ये वर्गात ९५% मराठी भाषिक विद्यार्थी असल्याने त्यांच्या ग्रुपमध्ये मी Join होवूच शकलो नाही. मी अ तुकडीमध्ये होतो. आमच्या वर्गात एकूण ६० विद्यार्थी होते. नेहमी सर्वात पुढच्या बाकावर अगदी प्राध्यापकांच्या नाकासमोर बसणारा, शरीराने सर्वात लहान दिसणारा एक विद्यार्थी बसलेला असे. First Semester मधील पहिल्या चाचणी परीक्षेचा निकाल आल्यावर, वर्गात प्रथम क्रमांक, अगदी अ व ब या दोन्ही तुकड्यामधील १२० विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आलेला विद्यार्थी तोच होता. त्या विद्यार्थ्याचे नाव राजेंद्र रामचंद्र पवार! कन्नड भाषेमध्ये एक म्हण प्रचलित आहे. बेळेयुव सिरी मोळकेयल्ली नोडू (एखादे रोपटे भविष्यात किती मोठा वृक्ष होणार ते लहाणपणी वाढत असतानाच कळते. असे याचा अर्थ) GPS मधील प्रथम सत्र ते ६ वे सत्र, या सहाही सत्रांमध्ये एखाद दुसरा सत्राचा अपवाद वगळता नेहमी श्री. राजेंद्र रामचंद्र पवार हे सर्वात पुढे असायचे. या १२० विद्यार्थ्यांमध्ये १२ वी सायन्स करुन (Mathemitics 'Yrb Limits, derivative, Integration, Physics, Chemistry) मध्ये प्राविण्य मिळविलेले विद्यार्थीही १०% होते. परंतू त्यांच्या पेक्षाही

वयाने लहान असलेले श्री. राजेंद्र रामचंद्र पवार अभ्यासामध्ये उठून दिसत होते. वर्गात Lecture ऐकत असतानाची त्यांची एकाग्रता, न समजलेल्या भागाचे प्राध्यापकांसोबत Discussion करुन समजून घेणे इ. मुळे ते सर्व प्राध्यापकांनाही प्रिय विद्यार्थी होते.lecture मधील त्यांना असलेले शंका मलाही येत होते परंतू ते मराठी भाषेत विचारायचे कसे म्हणून मी गप्प बसायचो. इंग्रजी भाषेचे ज्ञान सुध्दा मराठी सारखेच! मराठी भाषा बोलता येत नाही. याची खंत GPS मधील या तीन वर्षात व नोकरीच्या पहिल्या वर्षात मला प्रकर्षाने जाणवली. मराठी भाषा अवगत करण्यासाठी मी केलेले प्रयत्न, मला आलेल्या अडचणी येथे मी नमूद करावयाचे झाल्यास ते विषयांतर होईल. GPS मधील एकूण ३ वर्षात भाषेच्या अडचणीमुळे, मी श्री.रा. रा.पवार यांचे Group मध्ये असणे शक्य झाले नाही, म्हणून माझी व त्यांची तसे फक्त तोंडओळखच! वर्गातील श्री.पवार हे नेहमी पुढे असणारे, हुषार विद्यार्थी असल्याने मी त्यांना वर्गातील सर्व विद्यार्थ्यांप्रमाणेच ओळखत होतो. ते त्यावेळी मला ओळखत होते की नाही ते मला अगदी १९९० पर्यंत माहीत नव्हते. GPS मधून बाहेर पडल्याबरोबर सर्वांप्रमाणे मलाही नौकरी लागली, मी पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालयांतर्गत कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झालो. माझ्या बरोबरच या संचालनालयांतर्गत कार्यरत असलेले श्री.चंद्रशेखर मुरारी म्हमाणे यांचे कडून मला त्यावेळी समजले की, श्री.रा. रा.पवार, श्री.कुलकर्णी, श्री.पी.व्ही.देशपांडे हे GPS नंतर बी.ई करुन पुढे MPSC देवून वर्ग-१ चे अधिकारी झालेले आहेत. GPS पास झाल्यानंतर हे असे सगळे करुन वर्ग-१ अधिकारी होता येते हे मला त्यावेळी माहित नव्हतं हे माझे अज्ञानच! असो ! मी नंतर I.R.D. मधील नाशिक विभागातून I.R.D., पुणे विभागात सन १९८४ या वर्षी बदलून आलो. माळेगाव वसाहत उपविभागांतर्गत उजनी कालवा लाभक्षेत्रासाठी भीमानगर येथे (Ujjani Dam)

I.R.D. Section उघडून कार्यरत झालो. १९८८ पासून १९९४ पर्यंत ६ वर्षात उजनी डावा कालवा लाभक्षेत्रातील पाणथळ व क्षारमय क्षेत्र निर्मूलनासाठी १८ चर योजना कार्यान्वित केल्या. (सन १९८८ पर्यंत I.R.D. कडे फक्त सर्वेक्षण व संशोधन कामे एवढीच मर्यादित कामे होती.) सन १९९४ पासून २००४ पर्यंत मी उजनी डावा कालवा लाभक्षेत्रासाठी नव्याने स्थापन झालेल्या करकंब ता- पंढरपूर येथील I.R.D. Section ला कार्यरत होतो. सन १९९९-२००० या वर्षात I.R.D., पुणे या विभागाचे नवीन कार्यकारी अभियंता श्री.आर.आर.पवार हे रुजू झाल्याचे समजले. मी खरोखरच आनंदित झालो की, माझे Diploma चे वर्गमित्र माझे कार्यकारी अभियंता म्हणून रुजू झालेत. मी त्यांना ओळखत होतो परंतू ते मला ओळखतील का? मला त्यांचे Division मधील एक J.E. म्हणून ओळखतील परंतू मी त्यांचे Diploma चे वर्गात होतो हे ओळखतील का? या बाबत मी शासंक होतो. कारण , सन १९८० पासून (Diploma Passout) ते सन १९९९ या १९ वर्षाच्या दीर्घ कालावधीत आमची कोठेही भेट झालेली नव्हती. म्हणून मी, आमचे दोघांचे वर्गमित्र व त्यावेळी B.I.D. पंढरपूर मध्ये J.E. म्हणून कार्यरत असलेले श्री.डी. टी.मोरे यांना घेवून श्री.पवार सो. यांना भेटायला I.R.D., पुणे येथे गेलो. Cabin बाहेरील शिपायाकडे visiting slip वर आमची दोघांची नावे लिहून slip आत श्री.पवार साहेबांकडे पाठविली. पवार साहेबांनी आम्हा दोघांना ५ मिनिटेही वाट पहायला न लावता लगेच आत बोलविले. तेथेच आम्हाला कळून चुकले की, साहेबांनी आम्हाला त्यांचे Diploma चे वर्गमित्र या नात्याने मान दिला. त्या दिवशी त्या वेळी आम्ही दोघे त्यांच्या समोर बसलो, Diploma वेळचे श्री. पवार विद्यार्थी व आता कार्यकारी अभियंता झालेले श्री.रा.रा.पवार साहेब या दोन व्यक्तीरेखांमध्ये

शारीरीक बदल सोडले तर इतर त्यांच्यातील प्रगल्भता, नेमके व ठराविक तेवढेच महत्वाचे बोलण्याचे त्यांचे वाक्चातुर्यपणा, अधिकाऱ्याला शोभेल तेवढीच चर्चा करण्याची त्यांच्यातील उच्च स्तरावरील बुध्दिमत्ता व वेळेचे भान हे गुण जे आमच्या दोघांतही त्यावेळी नव्हते हे प्रकर्षाने जाणवले! बाहेर आल्यावर आम्ही दोघेही श्री.पवार साहेब यांचे बदललेले व्यक्तिमत्व पाहून भारावून गेलो. श्री.मोरे तर मला म्हणाले की, मुन्नोळी तू नशिबवान आहेस, की तुला श्री.पवार साहेबांच्या विभागात त्यांच्या हाताखाली काम करायला मिळतंय! मी आनंदाने मोरेला म्हणालो Yes!

सन १९९९-२००० या कालावधीत चार नवीन चर योजनांचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार करुन शासनाकडून प्रशासकीय मान्यता घेवून, निविदा प्रकीया पुर्ण करुन कार्यान्वित करण्यात आले. या दरम्यान माझे Deputy Engineer होते आताचे निवृत्त कार्यकारी अभियंता श्री.यु.डी.मोरे साहेब व श्री.यु.जी.जाधव साहेब दरम्यान आमचे सोलापूरचे सुपुत्र श्री.एस.व्ही.सोडल साहेब हे पाटबंधारे विभागाचे सचिव झाले. श्री.सोडल साहेबांचे त्यांच्या स्वग्राम पुळुज, शंकरगावचे ग्रामवासी यांनी, ते पाटबंधारे विभागाचे सर्वोच्च सचिव पदी नियुक्ती झाल्याने त्यांचा सत्कार केला. सत्कार समारंभावेळी ग्रामस्थांनी पुळुज शंकरगावच्या हद्दीतील १०-१२ वर्षापासून पाणथळ व क्षारमय झालेली हजारो हेक्टर जमिन सुधारण्यासाठी पाझर चर योजना तातडीने राबविण्याबाबत विनंती केली, ग्रामस्थांच्या विनंतीला मान देऊन श्री.सोडल साहेब यांनी, जमिन पाणथळ होऊन देशोधडीला लागलेल्या त्यांच्या गावातील गरीब शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी तातडीने ५ चर योजना कार्यान्वित करण्याचे आदेश DIRD पुणे कार्यालयाला दिले. मा.सचिव साहेबांचे आदेशाप्रमाणे मा.पवार साहेबांनी तातडीने कार्यवाही करुन माझ्या शाखेतील सर्व तांत्रिक

व अतांत्रिक कर्मचाऱ्यांना हुरुप देऊन जलद गतीने या ५ चर योजना राबविण्यामध्ये कार्यकारी अभियंता म्हणून कुशल नेतृत्व केले. एका वर्षा मध्ये P.I.R (प्राथमिक पहाणी) करुन Survey Estimate ला मान्यता देवून Survey पुर्ण करुन, चर योजनांच्या उतार निश्चितीला DIRD पुणे कडून मान्यता घेऊन सविस्तर नकाशे व अंदाजपत्रके तयार करुन, शासनाकडून प्रशासकीय मान्यता घेऊन, रीतसर निविदा प्रकीया पुर्ण करुन, मार्च अखेर पारेषण कामाव्यतीरीक्त १००% चर योजनांचे खोदकाम पुर्ण केले, ही DIRD च्या इतिहासातील न भुतो न भविष्यती अशी पहिलीच घटना आहे! हे केवळ श्री.पवार साहेबांचे कुशल व कल्पक नेतृत्व गुणामुळे शक्य झाले. माहे फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवडयात D-210 च्या १८ मशीनव्दारे सुमारे २२.०० कि.मी. लांबीच्या ५ चर योजनांच्या कामांचे खोल काळी मातीतील Branch Canal सारखे Section असलेले योजनांचे खोदकाम केवळ ४० दिवसात पुर्ण करुन दिले! माहे मार्च अखेर खोदकाम पुर्ण झालेल्या चर योजनेतून आजूबाजूच्या पाणथळ जमिनीतून पाझरुन खळखळा वाहणारे पाणी पाहून लाभधारक शेतकरी आनंदाने समाधान व्यक्त करत होते! या चर योजना राबवून १०-१२ वर्षापासून पडीक पडलेल्या क्षेत्रात लाभधारक शेतकऱ्यांनी ऊसासारखी नगदी पिक घेणे सुरु केले. या प्रमाणे राष्ट्रीय उत्पनात कोटयावधी रुपयांची वाढ झाली हे केवळ मा.पवार साहेबांच्या तांत्रिक हुशारी, वक्तशीरपणा व कुशल नेतृत्व यामुळेच, मी या काळात शाखा अभियंता या पदावर त्यांच्या सोबत त्यांच्या हाताखाली काम केले या बाबत स्वत:ला धन्य समजतो! केवळ ९ महिन्यातील या प्रचंड कामासाठी एकमेव शाखा अभियंतावर, माझ्या शाखा अभियंता म्हणून अहोरात्र कष्ट करण्याच्या प्रवृत्तीवर विश्वास ठेवून माझ्याकडून कामे पुर्णत्वास नेली याबाबत मी

पवार साहेबांचे मनोमन कृतज्ञता व्यक्त करतो! उपविभागात इतर ४ शाखा अभियंता कार्यरत असताना देखील श्री.पवार सो. यांनी केवळ मी त्याचे वर्गमित्र आहे म्हणून माझ्या एकट्याकडे कामे सोपविली अशा स्वरुपाच्या अनेक तक्रारी झाल्या. या सर्व तक्रारींना मा.पवार साहेब यांनी तंत्रशुध्द समर्पक उत्तर देवून तक्रारदारांची बोलती बंद केली हे मी येथे मुद्दाम नमूद करतो. IRD, पुणे येथील श्री.पवार सो. यांच्या कार्यकाळात केंद्रिय अर्थसाह्यांतर्गत (C-DWM् अंतर्गत) मोठ्या प्रमाणात चर योजना राबविल्या गेल्या. त्यावेळी चर योजनांच्या प्रस्तावांना मान्यता घेण्यासाठी दिल्लीला जावे लागत असे. दिल्लीतील कृषी मंत्रालयातील तत्कालीन Joint Director श्री.घनश्याम झा.सो. यांचे कडून प्रस्तावांना मान्यता घ्यावी लागत होती. त्यावेळेला पहिल्या Meeting ला महाराष्ट्र राज्य DIRD पुणे च्या वतीने प्रतिनीधी म्हणून मला दिल्लीला पाठविण्याची किमया, विश्वास श्री.पवार सो. यांनी माझ्यावर दाखवून मला संधी दिली! हे मी माझ्या आजपर्यंतच्या नोकरीच्या कालावधीतील सुवर्णक्षण समजतो. यावेळी मी माझ्या जीवनात पहिल्यांदा राजधानी दिल्ली पाहिली अर्थात नंतर श्री.पवार सो. व श्री.मोरे सो. यांच्याबरोबर दिल्लीला २-३ वेळा गेल्यावर सदर प्रस्ताव मंजूर झाले व ती कामेही पुर्ण करण्यात आली.

नुकताच सन २०१६ या वर्षात पाटबंधारे संशोधन विभाग, पुणे-१ (IRD Pune-1) या विभागास १०० वर्षे पुर्ण झाले म्हणून शतक महोत्सव झाले. सन २०२० मध्ये IRD पुणे स्थापन होवून १०४ वर्षे झाले DIRD पुणे मध्ये मी शाखा अभियंता या पदावर ३७ वर्षे व उपविभागीय अधिकारी या पदावर ३ वर्षे या प्रमाणे मी ४० वर्षे DIRD मध्ये अभियंता या पदावर काम करीत आहे. म्हणजेच IRD च्या जवळजवळ ४०% कालावधीचा मी साक्षीदार आहे. या विभागाचे प्रथम कार्यकारी अभियंता

सन १९१६ या वर्षात Sir C.C.Inglish होते. हे IRD चे एक अभियंता म्हणून मी अभिमानाने सांगतो. या ४० वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत अनेक हुशार कार्यकारी अभियंता या IRD पुणे -१ विभागामध्ये कार्यरत होते, परंतू श्री.आर.आर.पवार साहेबांच्या कालावधीत IRD पुणे अंतर्गत प्रचंड मोठया प्रमाणात पाणथळ व क्षारमय क्षेत्र निर्मूलनासाठी चर योजनांची कामे करण्यात आली. या शिवाय श्री.विजय घोगरे सो. यांच्या कालावधीत सुध्दा चर योजनांची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली होती. श्री.व्ही.एस.घोगरे साहेब यांच्या या विभागाच्या कार्यकारी अभियंता या पदावरील कार्यकाळात कृष्णा कालवा लाभक्षेत्रात सांगली जिल्यातील पलूस तालुक्यातील मौजे बुरुंगवाडी येथे बुरुंगवाडी चर योजनेचे यशोगाथा या दुरदर्शन कार्यक्रमावर मी स्वत: व तत्कालिन माझे उपविभागीय अधिकारी श्री.मुसळे सो. यांनी मुलाखत दिली होती. तो कार्यक्रम दुरदर्शनवर प्रक्षेपित करण्यात आला होता. दुरदर्शनवर एका सामान्य शाखा अभियंत्याला मुलाखत घ्यायला लावणे याचे संपुर्ण श्रेय श्री.घोगरे साहेब यांना जाते. मी त्यांचीही येथे कृतज्ञता व्यक्त करतो.

नंतर श्री.पवार साहेब IRD मधून S.E. या पदावर पदोन्नतीवर बदलून गेले. नंतर ते C.E या पदावर व आता सद्या जलसंपदा विभागाचे सचिव पदी अभियंता प्रवर्गातील सर्वोच्च पदी विराजमान आहेत. ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे! त्यांच्या मंत्रालयातील कक्षात केंद्रीय मंत्रालयाकडून महाराष्ट्र राज्य, जलसंपदा विभागास प्राप्त पुरस्कार प्रदान करते वेळेचे कार्यक्रमाचे छायाचित्र फलक मध्ये माझेही फोटो आहे, हे मी अभिमानाने सांगू इच्छितो! असे श्री.रा.रा., राजेंद्र रामचंद्र बरोबरच राजमान्य राजश्री ही पदवी नकळत मिळविलेले श्री. पवार साहेब स्थापत्य अभियांत्रिकी मधील एक हुशार, कुशल तंत्रज्ञानयुक्त, वक्तशीरपणाचे

मुर्तीमंत उदाहरण आहेत! अलिकडील ३-४ वर्षात दिल्ली येथे संपन्न होणाऱ्या प्रत्येक India Water Week प्रदर्शनात व इतर अंतरराष्ट्रीय प्रदर्शनात त्यांची भेट होते. DIRD पुणे कडून उभ्या केलेल्या दालनास ते आवर्जून भेट देतात. आमचे कामाचे कौतुक करतानाच बहुमूल्य मार्गदर्शन करतात. नुकताच २६ जानेवारी २०२० रोजीच्या प्रजासत्ताक दिवशी, जलसंपदा विभागाच्या वतीने मुंबई येथे सादर केलेल्या चित्ररथ चे संकल्पना मध्येही त्यांचे मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले. व DIRD च्या वतीने यशस्वीपणे कार्यान्वित केले. माझी दोन्हीही मुले स्थापत्य अभियंता असून, ते दोघेही Govt. College of Engineering कराडचे विद्यार्थी आहेत. जेथे श्री. पवार साहेब B.E. झाले! मी कराड येथे कार्यरत असताना श्री.पवार साहेब Karad Engineering College मध्ये श्री. माधव कुमठेकर सरांच्या आग्रहामुळे प्रमुख अतिथी म्हणून आले होते. माझ्या दोन्ही मुलांना मार्गदर्शन करतानाच माझ्या मुलांचे वर्गातील प्राविण्य पाहून पाहा माझे B.E. चे मार्कस् चे रेकॉर्ड तोडता आले तर मला आनंदच होईल असे माझ्या समोर म्हणाले होते! अद्यापही त्यांचे ९१.२० % मार्कस् चे रेकॉर्ड कोणीही तोडू शकले नाहीत! माझी दोन्हीही मुले आता सुध्दा त्यांच्या संपर्कात आहेत, त्यांच्याकडून अमूल्य मार्गदर्शन घेतात याचा मला सार्थ अभिमान वाटतो! असे आमचे श्री.आर. आर. पवार साहेब! त्यांचे भावी आयुष्य सुख समाधानाचे, आरोग्य पुर्ण जावो अशी मी प्रार्थना करतो!

सेवानिवृत्तीचे वय ५८ चे ६० वर्षे झाल्यास अजून दोन वर्षे त्यांचे मार्गदर्शन घेता येईल, असे व्हावे असे मनापासून वाटते, शेवटी शासन निर्णयं कायम शिरसावंद्य!



एका प्रगल्भ बुध्दीमतेचा गौरव

श्री वसंत निपुणगे माजी उपविभागीय अभियंता आणि श्री पवारसाहेब यांचे जवळचे मित्र आणि सहकारी नारायणगाव येथे सोबत काम केले आहे.

हो, मी मा. राजेंद्र पवार साहेबांच्या बाबतीत बोलतो. मला आठवतंय सन १९८६-८७ पासून मी साहेबांना ओळखत आहे. त्यावेळी मी कुकडी प्रकल्पांतर्गत नारायणगाव येथे सहाय्यक कार्यकारी अभियंता श्रेणी - २ या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी साहेब कळंब येथे सहाय्यक कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते. कार्यालयीन कामाच्या निमित्ताने आमची विभागीय कार्यालयात भेट होत असे.प्रत्येक वेळी साहेब समोर दिसले की माझ्याशी नक्की बोलत असत.साहेब माझ्याशी बोलत असत त्यावेळी जाणवत असे की या माणसाकडे किती प्रगल्भ बुध्दीमता आहे! दुसऱ्यांच्या प्रति आदर आहे. आपुलकी आहे. खरे तर महाराष्ट्र लोक सेवा आयोगाद्वारे साहेबांचे क्लास वन साठी थेट

सिलेक्शन झाले होते. पाटबंधारे खात्यातील मोठे व मानाचे पद मिळाले होते. याचा साहेबांना अभिमान होता परंतु गर्व कधीच नव्हता. प्रत्येक भेटीच्या वेळी साहेबांकडून काहीतरी नवीन तांत्रिक बाबींची माहिती समजत असे. अशा हुशार, बुध्दीमान, निगर्वी, सर्वांना समजून घेणाऱ्या अधिकाऱ्याकडे आपल्यालाही कधी तरी काम करायला मिळावे ही मनापासूनची इच्छा होती.

माझी बदली १९९१ साली उजनी प्रकल्पांतर्गत झाली. त्यामुळे साहेबांसोबत काम करण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले. पुढे १९९६ साली माझी उप विभागीय अभियंता या पदावर पदोन्नती झाली. पुढे सन १९९७ साली जिहे काठापूर या प्रकल्पावर बदली झाली. परमेश्वराने माझी सुप्त इच्छा जाणली होती. कारण या प्रकल्पावर कार्यकारी अभियंता म्हणून राजेंद्र पवार साहेबच होते. अशा रितीने आता साहेबांकडे काम करायला मिळणार म्हणून आनंद झाला होता. प्रकल्पाचे काम नव्यानेच सुरु झाले होते. माझा उपविभागीय सातारा येथे होता. तर विभागीय कार्यालय वेण्णानगर येथे होते. प्रकल्प नव्यानेच सुरु झाल्याने कामानिमित्त वारंवार वेण्णानगर येथे जावे लागत होते. कधी कधी रात्री उशिरापर्यंत थांबावे लागत असे. मला आठवतंय त्यावेळेस माझे कार्यालय नवीन असल्यामुळे कार्यालयास जीप नव्हती. वेण्णानगरला जायचे तर जीपने जायचे किंवा स्वत:च्या वाहनाने जावे लागत असे.

असेच एक दिवस कामानिमित्त मी व माझा कार्यालयीन सहकारी जीप नसल्याने मोटरसायकलवर वेण्णानगर येथे गेलो होतो. कामाच्या व्यापात रात्र केव्हा झाली हे कळलेही नाही. काम झाले होते परंतु रात्र फार झाली होती. वेण्णानगर ते सातारा हे अंतर १२ ते १४ किमी इतके असेल. रस्त्याच्या दोन्ही बाजूस दाट झाडी होती. या १२ ते १४ किमी अंतरामध्ये मनुष्यवस्तीदेखील फारशी नव्हती. असली तरी कुठेतरी एकादे घर होते.

त्यामुळे इतक्या रात्री साताऱ्याला जायची भीति वाटायला लागली. काय करावे असा प्रश्न पडला. तेवढ्यात लक्षात आले की पवार साहेबांचेही काम संपले आहे. चालकाने त्यांची कार केबीनजवळ लावली आहे. याचा अर्थ साहेबही साताऱ्याला जाणार आहेत. त्यावेळी जरा जीवात जीव आला. साहेबांच्या वाहन चालकाला मी बाजुला बोलाविले आणि सांगितले की आम्ही देखील मोटार सायकलवरुन सातारा येथे जात आहोत. आता रात्र खूप झाली आहे. जाताना तुम्ही आमच्या थोडे पुढे मागे रहा म्हणजे आम्हाला सुरक्षित वाटेल. कसे काय कोण जाणे परंतु मी चालकाला काहीतरी सांगत आहे हे साहेबांच्या लक्षात आले. त्यानंतर आमचा वेण्णानगर ते सातारा प्रवास सुरु झाला. त्यावेळी एक गोष्ट जाणवली की साहेबांची कार संपुर्ण प्रवासात आमच्यामागे साधारणपणे ५० मीटरवर होती. सातारा आल्यावर साहेबांनी गाडी थांबविली आणि विचारले, निपुणगे, आता सुरक्षित आहात ना? आम्ही गेलो तर चालेल ना? त्यावेळी खूप आनंद वाटला.

दुसऱ्या दिवशी कार चालकाने सांगितले की गाडीत बसल्यावर साहेबांनी सांगितले होते की सातारा येईपर्यंत गाडी त्यांच्या मोटरसायकलच्या मागेच राहू द्या.जास्त अंतर ठेऊ नका. त्यावेळी अक्षरश: डोळ्यातून पाणी आले होते. आपल्या सब ऑर्डिनेटबाबत केवढी काळजी अन केवढी आपुलकी! त्यानंतर त्या प्रकल्पात साहेबांचे बहूमोल असे मार्गदर्शन झाले. काम करणाऱ्या माणसाच्या पाठिमागे खंबीरपणे उभे रहाणे हा साहेबांचा एक विशेष गुण आहे.

पुढे साहेबांची बदली झाली. त्यानंतर काही दिवसांनी माझीही बदली झाली. परंतु या ना त्या कारणाने आम्ही एकमेकांच्या संपर्कात राहिलो.सन २००७ साली माझी विदर्भात जिगाव प्रकल्पांतर्गत बदली झाली.

माझ्या सुदैवाने साहेबांची देखील त्याच प्रकल्पावर अधीक्षक अभियंता म्हणून नियुक्ति झाली. मला तरी फारच मनस्वी आनंद झाला. कारण पुन्हा एकदा त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली होती. आता साहेब वरच्या पदावर असल्याने रोज भेट होणार नव्हती. परंतु प्रकल्प भेटीच्यावेळी भेट होत असे. त्यावेळी त्यांचे बहूमोल असे मार्गदर्शन होत असे.

अशीच एकदा उपसा सिंचन योजनेच्या पंपगृहाच्या ठिकाणी साहेबांची भेट होती. उपसा सिंचन योजनेसाठी सल्लागाराची नियुक्ति करण्यात आली होती. सल्लागाराने पंपगृहाची जागा निश्चित केली होती. ती जागा बुडीत क्षेत्रापासून थोडी दूर उंचावर होती. भेटीच्या वेळी साहेबांनी पंपगृहाची जागा दाखवा असे सांगितले. त्यावेळी मी सल्लागाराने निश्चित केलेली जागा दाखवली. साहेबांनी जागेचे तलांक व इतर गोष्टीची चौकशी केली आणि सांगितले की आपण ही पंपगृहाची जागा बदलून थोडी सबमर्जन्सजवळ घेऊ. त्यामुळे पाणी उचलण्याचा खर्च कमी होईल. पर्यायाने या प्रकल्पाचा खर्चही कमी होईल. सल्लागारांसह सर्वांनाच साहेबांची ही सुचना आवडली. प्रकल्पातील बचत ही अभियंत्यांसाठी आवश्यक बाब असते. ती साहेबांकडे प्रकर्षाने जाणवली. असे कितीतरी प्रसंग आहेत की ते सर्व सांगायचे म्हणजे शब्दही कमी पडतील.

सन २०१२ मध्ये मी सेवानिवृत्त झालो. जलसंपदा खात्यातून बाहेर पडलो तरी आजही साहेबांशी बोलणे होत असते. अशा शिस्तप्रिय, बुध्दिमान, आपुलकी असणारा अधिकारी मिळणे म्हणजे खरे तर माझेच नशिब म्हणायला हवे .साहेबांच्या सेवा निवृतीनंतरच्या उर्वरित आयुष्यासाठी व कारकिर्दीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!



मी पाहिलेले आर.आर. अर्थात राजेंद्र पवार सर

श्री. विष्णु दत्तात्रय आबनावे
उपविभागीय अधिकारी,
जलविज्ञान प्रकल्प, पुणे
इंजि राजेंद्र पवार जलविज्ञान प्रकल्पात मुख्य अभियंता असताना श्री. आबनावे त्यांचे सहकारी मित्र होते. दोघांचा स्नेह अद्यापही कायम आहे.

पुणे - नाशिक महामार्गावर असलेल्या छोट्याश्या कळंब, ता. आंबेगाव या गावात रस्त्याच्या कडेलाच पाटबंधारे खात्याची वसाहत आहे. वसाहतीमध्ये तीन उपविभाग. त्यापैकी एका अधिकाऱ्याची बदली झाल्याने नवीन अधिकारी हजर होण्यासाठी येणार म्हटल्यावर आम्ही सर्व कर्मचारी त्यांची वाट पहात होतो. शासकीय सेवेचा पहिला दिवस असलेला व हजर होण्यासाठी येणारा तरूण, तडफदार, देखणा अधिकारी म्हणजे त्यावेळीचे सहाय्यक कार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र पवार साहेब होत. अत्यंत लोभस, देखणं व्यक्तिमत्व असलेले साहेब आमचे कधी झाले हे आम्हा कर्मचाऱ्यांना कळलेच नाही. त्यावेळी मा. श्री. पवार साहेबांचा शासकीय सेवेच्या पहिल्या दिवसाचा मी साक्षीदार होतो. अत्यंत

तरूण संयमी, मृदुभाषी, हुशार, चाणाक्ष, चौकसबुध्दी, तसेच समंजस असा सर्वगुण संपन्न असलेला अधिकारी आम्हाला लाभला. त्यानंतरची पुढील तीन वर्षे एका बुध्दिवंत, हुशार तसेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची जाण असलेला अधिकारी यांच्या हाताखाली काम करण्याचे भाग्य आम्हास लाभले. तीन वर्षांच्या कार्यकाळात उपविभागाचे नाव मोठे करण्यात व धडाडीने कामे मार्गी लावण्यात सरांचा फार मोठा हात होता.

कळंब वसाहतमध्ये तीन उपविभाग असून त्याचा कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात रहात होता. त्यामुळे क्षेत्रीय कामे आटोपून संध्याकाळी सर्वजण एकत्र बसायचे, वसाहत कुटुंब समजून विविध सण साजरे करणे काही सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडणे, गणपती उत्सवात श्री. पवार साहेब स्वत: भाग घेऊन विविध कार्यक्रमाचे नियोजन करीत. वसाहतीमध्ये उत्साह आणीत असत. कोणताही मोठेपणा नाही. सर्वांना बरोबर घेऊन टीमवर्कने काम मार्गी लावणे यात त्यांचा हातखंडा होता. प्रत्येकाचे प्रश्न जाणून घेणे. त्यावर मार्ग काढणे, सरकारी कामातील अडचणीवर अत्यंत शिताफीने मार्ग काढून काम पूर्ण करणे. त्यांचा त्यावेळी ही कामाचा उरक दांडगा होता. आम्ही त्यांच्यापेक्षा शासकीय सेवेत जास्त दिवस असून अनुभव जास्त असून ही आमची दमछाक होत असे.

श्री. पवार साहेब जेवढे शांत स्वभावाचे होते. तेवढेच कडक शिस्तीचे आम्ही अनुभवले. कामचुकारपणा करणाऱ्याची गय नसायची, त्यामुळे उपविभागाचे काम प्रगतीपथावर असायचे. कुकडी प्रकल्पात ते सहाय्यक कार्यकारी अभियंता लोकप्रिय साहेब झालेले होते. दरम्यान पदोन्नतीमुळे त्यांना कळंब सोडावे लागले. कार्यकारी अभियंता पदी पदोन्नती झाल्यावर त्यांनी काही वर्षे इतरत्र काढली नंतर त्यांची नारायणगाव येथील कुकडी प्रकल्पाचे विभागात बदली झाली. आमचा उपविभाग त्यांचे

अखत्यारीत असल्याने आमची काम करण्याची उमेद द्विगुणीत झाली. राजेंद्र पवार साहेब कार्यकारी अभियंता म्हणून पदभार घेतलेल्या विभागात अत्यंत अवघड असे दोन धरणांना जोडण्याचे काम दोन नदीची उपखोरी जोडताना डोंगरपार करण्याचे काम सहसा कालवा उंचमाथ्यावरून नेण्याचे काम असते परंतु येथे अंदाजे ५७ कि.मी. चा डोंगर उताराला छेदत डोंगर पार करीत डिंभे धरणातील पाणी येडगाव धरणात कालव्याद्‌वारे सोडणे अश्या आव्हानात्मक कामाचे धनुष्य उचलण्याचा संकल्प श्री. पवार साहेबांनी केला होता.

कालव्याचे काम रोजगार हमीतून फार वर्षापूर्वी झाल्याने श्री. राजेंद्र पवार साहेबांनी विभागात उप अभियंता, शाखा अभियंता, तांत्रिक कर्मचारी यांना विश्वासात घेऊन कामाची रूपरेषा त्यासाठी अंदाजपत्रकापासून निविदा पर्यंतची कामे नेमून अत्यंत सुयोग्य नियोजन करून निविदेतील कामाचे वाटप स्थानिक तसेच काही बाहेरील कंत्राटदारांना देऊन कमीवेळेत काम पूर्ण कसे करायचे याची आखणी केली. एक कार्यकारी अभियंता म्हणून वरील सर्व जबाबदारी स्वत: पेलून कोणत्याही तक्रारीविना अत्यंत धीराने, संयमाने, चाणाक्ष बुध्दीचा वापर करून टीमवर्कने व चिकाटीने ५७ कि. मी. चा कालवा सर्वकष पूर्ण करून डिंभे धरणातील पाणी येडगाव धरणात सोडून ऐतिहासिक प्रकल्प केवळ अडीच वर्षात पूर्ण करून एक विक्रम केला होता. येडगाव धरणात डिंभे धरणाचे पाणी पाहताना पंचक्रोशीतील जनता अचंबित होऊन सदर कामाचा भगीरथ कोण हे पाहण्यासाठी पाणी पूजानेवेळी कार्यक्रमाला अलोट गर्दी केली होती हे झाल्याचे आम्ही साक्षीदार आहोत. या योजनेचा शिल्पकार होते श्री. राजेंद्र पवार साहेब!

वरील कामे करताना अनंत अडचणी होत्या. मोठ्या धाडसाने काही निर्णय घेऊन खोदाई काम, बांधकाम व अस्तरीकरण एकाच वेळी करून घेताना जागतिक बँकेच्या निधीतून करायची असल्याने वेळेचे बंधन,

कामाची गुणवत्ता, नियम अटी सांभाळत सर्वाना मार्गदर्शन करीत चिकाटीने, कार्यकुशलतेने तसेच प्रचंड वेगाने काम पूर्ण करून घेणे म्हणजे स्वर्गातून गंगा आवतरविणे सारखेच काम होते. जिहे कठापूर उपसा सिंचन प्रकल्पाच्या कामासाठी सन १९९७ ला हेच विभागीय कार्यालय व त्यांची उपविभागीय कार्यालये स्थलांतरीत होऊन सातारा येथे नवीन कामासाठी नवीन उमेदीने श्री. पवार सरांनी सर्व अधिकारी कर्मचारी यांना विश्वासात घेऊन कामे चालू केली. काम नवीन होते परंतु पवार सरांनी कोणतीही अडचण येऊ दिली नाही. या योजनेत माण व खटाव तालुक्यातील दुष्काळी भागास माण नदी व येरळा नदीवर के. टी. बंधारे बांधून पाणी देणे असे होते. श्री. पवार साहेबांनी माण नदीवरील जुन्या के. टी. बंधारेचा पुर्वानुभव जाणला होता. त्यांनी सदर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे हे कॉक्रीटमध्ये बांधण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन ज्या नदीमध्ये यापूर्वीच्या बंधाऱ्यात थेंबभर पाणी साठत नव्हते. तेथे पहिला कॉक्रीटचा को. प. बंधारा दहिवडी येथे बांधून पाणी अडवून त्यावेळचे अधीक्षक अभियंता यांचे हस्ते पाणी पूजन केले. त्यावेळी बंधाऱ्यावरील शाखा अभियंता म्हणून मीच काम पहिले होते.

श्री. राजेंद्र पवार साहेब हे अत्यंत मेहनती आहेत. कार्यक्षेत्रावर भेटीत त्यांना कधीही थकलेले मी पाहिलेले नाही. कामातील अडचणींचे निवारण करणे, कार्यालयापासून ते क्षेत्रीय कर्मचाऱ्यापर्यंत जातीने चौकशी करून मार्ग काढणे यात ते नेहमीत दक्ष असत. येरळा व माण नदीवरील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे हे कॉक्रीटमध्ये बांधण्याचे श्रेय श्री. पवार सरांना जाते. पवार साहेब हे एखादे काम करण्यापूर्वी त्या कामाची सखोल माहिती घेणे, त्यातील तांत्रिक बाबींचा अभ्यास करणे, त्यातील प्रचलित ऐवजी अद्यावत प्रक्रियाचा वापर करणे, सदर काम टीमवर्कने करण्यासारखे आहे का ते पाहणे त्या कामाच्या विविध अंगांचा अभ्यास करणे, कामाची उपयुक्तता

तपासणे असा सर्वकष अभ्यासानंतर ते काम तडीस नेणे, पूर्ण करणे. त्यांची अधिकारी यांचे कडून काम करून घेण्याची पध्दत वाखाणण्याजोगी आहे.

शासकीय कामकाजात नवनवीन संकल्पना आणणे त्या रूजवणे, अधिकारी कर्मचारी यांना त्याची माहिती/ महत्व पटविणे, त्यांना त्यात पारंगत करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आखणे, वर्कशॉप आयोजन करणे, विविध संस्थाना भेटीचे प्रोग्राम आयोजित करण्यास भाग पाडणे, दूरदृष्टी ठेऊन कोणतेही सरकारी काम पूर्ण करण्याचा श्री. पवार साहेबांचा धृढनिश्चय असतो. श्री. राजेंद्र पवार साहेब हे एक उच्चपदस्थ अधिकारी आहेत. त्यांचेकडे असलेली. सर्वगुणसंपन्नता पाहण्याची, अनुभवण्याची मला संधी मिळाली हे माझे भाग्य म्हणावे लागेल. ते सहाय्यक कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, मेरी महासंचालक तसेच आता जलसंपदा विभागाचे सचिव आहेत असे असताना त्यांचे प्रत्येक पदी व प्रत्येकवेळी त्यांचे हाताखाली काम करणारा कदाचित मी एकमेव कर्मचारी असावा याचा मला अभिमान आहे. मा. श्री. राजेंद्र पवार साहेब हे महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा विभागाचे सचिव (लाक्षेवि) आहेत. परंतु सुरूवातील ते आमच्या बरोबर जसे वागत होते. त्यावेळचे त्यांचे स्मित हास्य प्रेमळ स्वभाव आस्थेने विचारपूस ही आजही ज्यावेळी ते भेटतात किंवा मंत्रालयात भेटण्यासाठी जाण्याचा योग येतो. त्यावेळी तेच पवार साहेब तेच हास्य, प्रेमळ स्वभाव आस्थेनं विचारपूस...

सर्वाना समजून घेणारे, चूक झाल्यास समजावणारे, अत्यंत हुशार, प्रेमळ सर्वांना हवे हवेसे वाटणारे एक भव्य दिव्य व्यक्तिमत्व सर्वाना समवेत घेऊन काम करून घेण्याची त्यांची हातोटी त्यांचा धाक असतो. पण कोणाचेही मन न दुखावणारे, सर्वांना हवे हवेसे वाटणारे आजचे आपले महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा विभागाचे सचिव (ला.क्षे. वि.) श्री.राजेंद्र पवार साहेब यांना

त्रिवार नमन!!!

सर आपणास माझेकडून माझे कुटुंबाकडून व माझे तमाम सहकाऱ्याकडून आपणास पुढील उतुंग वाटचालीस शतशः शुभेच्छा!!



राजेंद्र म्हणजे राजस्व

इंजि. एस.के क्षीरसागर
शाखा अभियंता जलविज्ञान प्रकल्प नाशिक

इंजि राजेंद्र पवार जलविज्ञान प्रकल्पात मुख्य अभियंता असताना श्री. क्षीरसागर त्यांचे सहकारी मित्र होते. दोघांचा स्नेह अद्यापही कायम आहे.

राजेंद्र म्हणजे राजस्व! एखाद्या व्यक्तिमत्वाबद्दल काही विचार मांडावे असे हे व्यक्तिमत्व. आतापर्यंतच्या माझ्या सेवाकाळात बरीच व्यक्तिमत्वं संपर्कात आलीत. पण आम्हाला यांचा जो सहवास लाभला त्याबद्दल व तसा आशय नजरेसमोर ठेवून काहीतरी लिहावं असं मनात आलं म्हणून हा शब्द प्रपंच! घरी लग्नकार्य असतांना आपण जसे सर्वजण एकत्रितपणे येऊन कार्य सिध्दीस नेण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो तसेच सर्व घटकांना सहभागी करून कुठेही कार्यक्रमाला गालबोट न लागू देता कार्य यशस्वीपणे पार पाडण्यात यांचा हातखंडा.

खरं तर या लेखाचा उद्देश हा व्यक्तिमत्वाचा उदो उदो नाहीच. तथापि प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर सर्वकष पकड कशी असावी तसेच

विविध संकल्पना राबविताना सर्वांना पदाचा मुलाहिजा न बाळगता सहभागी करून घेऊन यशापर्यंत केलेली वाटचाल यावर टाकलेला हा दृष्टिक्षेप. जलविज्ञान प्रकल्पात मुख्य अभियंता पदावर काम करताना पहिल्या भेटीत वरिष्ठ अधिकाऱ्यास भेटतानाची भीति घालविण्यातील त्यांची कुशलता दिसून आली. यानंतर कधी मनात पदाची भीति आम्हाला जाणवली नाही.

श्री पवार सरांच्याच कार्यकाळात जलसंपदा खात्याकडे केंद्रीय तसेच जागतिक बँकेच्या सहकार्याने राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प राबविण्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. जलविज्ञान प्रकल्पाचा आतापर्यंतचा प्रवास हा केंद्रीय स्तरावर अग्रभागी राहिलेला आहे. यापूर्वी जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ मध्ये केलेल्या यशस्वी कामांची केंद्रीय स्तरावर पायाभूत प्रकल्प म्हणून निवड व्हावी व याच पायाभूत प्रकल्पावर आधारित इतर राज्यांनी देखील महाराष्ट्र राज्याचा आदर्श घेऊन केंद्र स्तरावर निवडलेल्या आदर्श पायाभूत प्रकल्पावर आधारित राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प राबविण्याची संकल्पना केंद्राने हाती घेतली व त्यास महाराष्ट्र राज्याने सहमती दिली. याच टप्प्यावर पवार सरांचा जलविज्ञान प्रकल्पामध्ये झालेला प्रवेश म्हणजे प्रकल्पाला आवश्यक गती देण्यास पुरक ठरला. या कालखंडात काम करताना सर्वांना सहभागी करून जलविज्ञान प्रकल्पाच्या टप्पा-१ व टप्पा-२ मधील झालेल्या प्रशंसनीय कामात सातत्य ठेवण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला.

याच दरम्यान सन २०१५ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा सुरू झाला. जलविज्ञान प्रकल्पात जलसंपत्ती तसेच जलगुणवत्ता याविषयावर बरेच काम झालेले आहे. सन २०१५ चे सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये आपले प्रकल्पाकडून काही शास्त्रोक्त योगदान देता येईल का याची सरांनी चाचपणी केली. याबाबत सन २००३ चे सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये नाशिक येथे झालेल्या सातव्या सिंचन परिषदेत मी सादर केलेला पेपर व सादरीकरण याबाबत

झालेल्या चर्चेस अनुसरून सरांनी सन २०१५ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत देखील पेपर तयार करण्याचा मानस व्यक्त केला. त्यास अनुसरून सन २०१५ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये करावयाचे कामाचे प्रारूप तयार करण्यात आले. कालावधीत इंडिया वॉटर वीकच्या राष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठावर सन २०१५ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याबाबतचा पेपर सादरीकरणाची संधी चालून आली. या संधीचा लाभ घेण्यासाठी जलविज्ञान प्रकल्पाच्या नाशिक येथील जलगुणवत्ता प्रयोगशाळेच्या माध्यमातून हे काम हाती घेण्यात आले.

हा पेपर तयार करताना सन २०१५ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये काय सापडले व त्यावर काय उपाय योजना कराव्यात हे सांगणे हा लेखाचा उद्देश नाहीच. किंबहूना हे काम करताना व मुख्य अभियंता पदी काम करताना हाताखालील काम करणाऱ्या लोकांमधील गुण हेरून त्याचा सरांनी कल्पकतेने कसा वापर केला यावर प्रकाश टाकणे हाच प्रमुख उद्देश या लेखाचा आहे. जलविज्ञान प्रकल्पाचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर असल्याने तसेच मंत्रालयीन स्तरावरील कामांमुळे त्यांचा बहुतांशी वेळ हा फिरतीवर असल्याने या विषयावर सक्षम चर्चेस पुरेसा वेळ मिळेनासा होई. काळाबरोबर चालण्याचा यांचा स्वभाव असल्याने नवनवीन संगणकीय प्रणालीवर यांचे प्रभुत्व असल्याने केलेल्या कामाचे प्रारूप संगणकीय प्रणालीद्वारे अर्थात ई मेलद्वारे पाठविले जाई. सरांकडे नेहमी दोन मोबाईल असत. एकदा त्यांनी ई मेलद्वारे प्रारूप पाठविले की ते वाचून घेत. काळाबरोबर कसे चालावे हे आम्ही त्यांच्याकडूनच शिकलो. प्राप्त झालेल्या प्रारूपामध्ये काही दुरूस्त्या असल्यास प्रवासात असले तरीही एका मोबाईलवरून फोन करून दुसऱ्या मोबाईलवर त्यांना पाठविलेले प्रारूप उघडून मोबाईल संभाषणाद्वारे प्रारूप अंतिम केले जाई.

प्रवासातील वेळ देखील आपल्या कर्तव्यासाठी वापरण्याचा त्यांचा

हा गुण म्हणजे खात्याचे प्रगतीसाठी किती पोषक आहे हेच यातून समजून येते. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक कसे रहावे हे देखील या अनुभवातून आम्हाला शिकता आले. यातूनच आम्हाला प्रेरणा मिळत गेली. याच दरम्यान मुख्यालयी आल्यावर सन २०१५ चे सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये प्रत्यक्ष नदीवर जाऊन पाहणी करताना देखील सर्वांना समवेत घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखीच आहे. याच कार्यपध्दतीतून राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या पेपरचे सादरीकरणासाठी दिल्ली येथे जाणे आवश्यक होते. माझ्या व्यक्तिगत अडचणीमुळे मला शक्य होणार नव्हते. तथापि त्यांनी याचा बाऊ न करता स्वत: दिल्ली येथे जाऊन सादरीकरण केले. एखाद्या व्यक्तिबद्दल प्रेम का वाटावे त्याचेच हे उदाहरण.

दरम्यानच्या काळात त्यांचा वाढदिवस आला. साहेब त्यावेळी फिरतीवर होते. समक्ष शुभेच्छा देता आल्या नाहीत त्यांना ई मेलद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा म्हणून एक कविता पाठविली. यावर त्यांनी त्याच तत्परतेने दिलेले उत्तर (एखाद्या शीघ्र कवी सारखी सहज, सुंदर अन उत्स्फूर्त अशी ही कविता खूपच आवडली. मन:पूर्वक धन्यवाद.) ही त्यांची शब्दरचना म्हणजे लेखाच्या शीर्षक देण्यामागची संकल्पना स्पष्ट करते आणि त्यांच्याविषयी शब्दांकन करताना प्रेरणा देते.

पुढच्या काळात त्यांची पदोन्नती झाली. ते कार्यकारी संचालक झाले. तरीही त्यांच्याशी ई मेलद्वारे संपर्कात होतो. मधल्या काळात स्मार्ट सिटी नाशिकवर माझा लेख स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित झाला. त्याची प्रत त्यांना ई मेलद्वारे पाठविली. त्यावर त्यांनी दिलेली दाद म्हणजे आमच्यासारख्यांचे अंगावर तोळाभर मांस वाढण्यास पुरक ठरते. जे चांगले आहे त्याचे कौतुक करण्यासाठी ते जराही कसर सोडत नाहीत. त्यांचे

अशाच लोकाभिमुख व सहृदयी स्वभावामुळे आज ते सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य या पदावर विराजमान आहेत.

ही विचारसुमनांद्वारे त्यांच्या पुढील वाटचालीस शत शत शुभेच्छा! सेवानिवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य सुखी, समाधानी आणि आरोग्यदायी जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

जिव्हाळा नात्यांचा



राजेंद्र पवार एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

श्री. व्ही.जी.पवार
मा.प्राध्यापक उस्मानाबाद

इंजि. राजेंद्र पवार यांचे मोठे बंधू अर्थात काकांचे चिरंजीव. परंतु लळा मात्र सख्ख्या भावापेक्षाही जास्त.भावापेक्षा दोघांमध्ये मैत्रीचे नातेच अधिक घट्ट आहे.

राजेंद्र पवार हा माझा भाऊ, परंतु आमचा संवाद, वर्तन, व्यवहार, प्रेम व आपलेपण तसेच सहकार्यवृत्ती सख्या भावाप्रमाणे कायम आहे.

परिवारामध्ये आम्ही सर्वजण 'राजू' या नावाने संभाषण-संवाद करतो. राजेंद्रचे येडशी सारख्या खेडेगावी बालपण व शालेय शिक्षण पूर्ण झाले. इयत्ता ५ वी पर्यंत जिल्हा परिषद शाळा येडशी येथे शिक्षण व इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण येडशी येथील जनता विद्यालयात पूर्ण झाले. या विद्यालयास जोडून सुमारे ३०० विद्यार्थ्यांची बोर्डिंग होती. मुलांच्या भोजन व निवासाची सोय होती. याच परिसरात दगडी बांधकाम असलेल्या पत्र्यांच्या घरात बोर्डिंगच्या विद्यार्थ्याच्या वेळापत्रकाप्रमाणे राजेंद्रचे शालेय शिक्षण

झाले.आई वडील शिक्षक असल्यामुळे त्यांच्या शिस्त व मार्गदर्शनामुळे राजेंद्रला शालेय जीवनात अभ्यासाच्या चांगल्या सवयी लागल्या. प्राथमिक वर्गापासून राजेंद्र कुशाग्र बुध्दीमत्तेचा विद्यार्थी म्हणून अभ्यासात आघाडीवर होता. चौथी शिष्यवृत्ती परीक्षा ही ग्रामिण भागातील पहिली स्पर्धा परीक्षा. या स्पर्धा परिक्षेच्या तयारीमुळे अभ्यासाचा पाया मजबूत झाला. परिक्षेतील उत्तर लेखनाच्या तंत्रातील वेगळेपणामुळे राजेंद्रचा अभ्यासाचा आत्मविश्वास वाढला. इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा या शालेय जीवनातील स्पर्धा परीक्षा म्हणून महत्वाच्या ठरल्या. राजेंद्रच्या भावी शैक्षणिक प्रगतीमध्ये शालेय जीवनातील चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा या स्पर्धा परीक्षा दिशादर्शक ठरल्या. ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परिक्षेत राजेंद्रने सोलापूर जिल्ह्यात गुणवत्ताधारक म्हणून यश संपादन केले. या यशाचा संबंध पुढील शैक्षणिक व व्यावसायिक स्पर्धा परिक्षेतील यशामध्ये दिसून येतो.

प्राथमिक स्तरावरील हे यश राजेंद्रने पुढे सतत कायम ठेवले. सन १९७७ मध्ये इयत्ता १० वी बोर्ड परिक्षेत बार्शी केंद्रात तो प्रथम आला. सोलापूर येथील पॉलिटेक्नीक कॉलेजमध्येही प्रथम आला. त्यानंतर कराड अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी. ई. सिव्हीलमध्ये शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला. बी. ई. सिव्हील पदवीनंतर पुणे येथे एम.ई. चे शिक्षण घेत असताना यु. पी.एस.ई आणि एम.पी.एस.सी या स्पर्धा परिक्षेची तयारी केली. तसेच पुणे येथेच श्री. शिर्के उद्योग समुहात नोकरी स्विकारली. पदवी परिक्षेतील गुणवत्ता व प्रत्यक्ष कामावरील अनुभव, कामाचे स्वरूप, कामाचे तंत्र - कुशलता, सरकारी नोकरीतील कार्यपध्दती याबाबत श्री. शिर्केकडून राजेंद्रला अनेक अनुभव व व्यावसायिक बहुमोल धडे मिळाले.

एम.पी.एस.सी च्या स्पर्धा परिक्षेतून राजेंद्रची सरळ सेवेने राज्य शासनाच्या सहाय्यक कार्यकारी अभियंता पदावर डिसेंबर १९८९ मध्ये

निवड झाली. हा क्षण पवार परिवारासाठी अत्यंत आनंदाचा होता. राज्य शासनाच्या सेवेत निवड झाल्यानंतर सुरूवातीचे प्रशिक्षण नाशिक येथे पूर्ण करून कार्यकारी अभियंता पदावर सातारा येथे प्रथम नियुक्ती मिळाली. राजेंद्रने राज्याच्या विविध विभागात कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता,मुख्य अभियंता या पदावर सक्षमपणे काम केले. पाटबंधारे विभागातील कार्यालयातील अनुचित हेतूने होणारी दप्तर दिरंगाई व अनिष्ट प्रथांना पायाबंद घातला. क्षेत्रिय काम व कार्यालयीन प्रशासन गतिमान केले. स्वत: आपल्या कामात प्रामाणिक राहून प्रत्येक कर्मचारी, अधिकारी यांनी आपल्या जबाबदारीला व कर्तव्याला न्याय दिला पाहिजे म्हणून त्यासाठी आग्रही राहून आपल्या कार्यक्षेत्रातील कामाला न्याय देण्याची कर्तव्य कठोर भूमिका घेतली. समोर येणाऱ्या प्रत्येक कामाशी संबंधीत निर्णय अभ्यासपूर्ण व अचूक घेतले. त्यामुळे क्षेत्रिय व कार्यालयीन पातळीवरील येणारी आव्हाने संधी समजून स्वीकारली व सक्षमपणे सोडवली.

सन २०१७ मध्ये जलसंधारण विभाग औरंगाबाद येथे राजेंद्र कार्यरत असताना मी विभागीय आयुक्त कार्यालयातील वैयक्तिक काम आटोपून जवळच असलेल्या त्यांच्या कार्यालयात पूर्वसुचना न देता भेटण्यास गेलो. राजेंद्र बाहेरगावी गेल्याचे कळले. माझा परिचय सांगितल्यानंतर उपस्थित अधिकाऱ्याने स्वागतानंतर मला कार्यालयातील सर्व कक्ष, बैठक हॉल इत्यादी माहिती सांगितली. सहज संवाद चर्चा करताना तेथील अधिकाऱ्याने मला सांगितले की राजेंद्र पवार साहेब शिस्तप्रिय अधिकारी आहेत. या त्यांच्या शिस्तप्रिय स्वभावामुळे त्यांच्या सतत बदल्या होतात. हा त्यांचा अनुभव आश्चर्यकारक वाटला. त्यावर चिंतन करत मी त्यांचा निरोप घेतला.

आदर्श नियोजनाचा अनोखा अनुभव

राजेंद्रचा लहान भाऊ डॉ. संजीव यांचा ६ फेब्रुवारी १९९५ मध्ये

नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे लग्न सोहळा झाला. या लग्नाचे पूर्ण नियोजन राजेंद्रकडे होते. त्यावेळी राजेंद्र पुणे जिल्ह्यामध्ये कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत होता. लग्ना निमित्त येडशी व बार्शी येथून इष्टमित्र, पाहुणे व सर्व वऱ्हाडी मंडळी दोन एस. टी. बस व तीन जीपसह ०५/०२/१९९५ रोजी रात्री आठ वाजता जेवण उरकून निफाडकडे मार्गस्थ झाले. एकूण पाहुणे व वऱ्हाडी मंडळी सुमारे १२५ लोक प्रवासात सोबत होते. एवढ्या वऱ्हाडी मंडळीची व्यवस्था कशी, कुठे करावयाची? कशी होणार? असे अनेक प्रश्न माझ्या मनात अकारण अनामिक भीति निर्माण करत होते. प्रवास मार्गात दोन तीन वेळा चिनीमातीच्या मोठ्या कपातील चहा घडयाळाच्या नियोजनबध्द वेळेनुसार अत्यंत तत्परतेने २० मिनिटात सर्व वऱ्हाडी पाहुणे मंडळीना चहाचे वितरण करण्यात आले. मध्यरात्री शिर्डीला पोहांचलो. तेथे सर्वांची सुसज्ज खोल्यातून शाही निवास व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी ६ वा. गरम नाष्टा, चहा घेऊन लग्नाचे वऱ्हाड निफाडकडे मार्गस्थ झाले. अगदी नियोजित वेळेपूर्वी लग्नस्थळी आम्ही सर्वजन सुखरूप पोहचलो. लग्न समारंभ वेळेवर पार पडल्यानंतर परतीचा प्रवास सुखरूप झाला. या नियोजनबध्द सुखरूप प्रवासाबद्दल आलेला अनोखा अनुभव आजही अनेक मित्र, पाहुणे कौतुकाने सांगत असतात. हा कौतुक पात्र लग्नाचा सामुहिक प्रवास राजेंद्रच्या दुरदृष्टीच्या व प्रत्यक्ष प्रवासाचे अंतर आजमावून केलेल्या आदर्श नियोजनाचा अनोखा अनुभव ठरला.

नगरची विवाहपूर्व बैठक

राजेंद्रची लहान बहिण सौ. सुनिता विलास गुंजाळ यांचा ज्येष्ठ चिरंजीव मनिष बेंगलोर येथे इंजिनियर म्हणून नोकरीस आहे. त्यांच्या लग्नासाठी वधू वर पसंती झाली. शिर्डी परिसरातील लोणी जवळच्या खेडेगावातील मुलगी वैद्यकिय सेवेत पुणे येथील हॉस्पीटलमध्ये नोकरीस

होती. वधू पक्ष वरपक्ष यांना पाहुणे संबंध पसंत पडले. वधुवरांची पसंती झाली. मान-पान, लग्न खर्च कुणी करावा, देण्या घेण्याबद्दल जबाबदारी निश्चिती करण्यासाठी ऑक्टोबर २०१९ मध्ये सौ. सुनिता या बहिणीच्या अहमदनगर मधील घरी विवाहपूर्व बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस मी उस्मानाबादहून हजर होतो. नाशिककडून राजेंद्रचे लहान भाऊ संजीव व स्वत: राजेंद्र मुंबईहून आलेला. वधु वर पक्षाकडून दहा वीस पाहुणे मंडळी बैठकीत स्थानापन्न झालेले. लग्न निश्चितीच्या बोलणीची सुरूवात करायची कोणी व कशी याबद्दल वधु वरांचे प्रमुख काळजीत होते. लग्न जमवायचे कसे? याबद्दल अनावश्यक चर्चा सुरू झाली. बैठक अंतिम हेतूपर्यंत येण्याची चिन्हे दिसत नाहीत हे हेरून वधुकडील प्रमुख काकांनी वराचे मामा राजेंद्र पवार यांना बैठक सकारात्मक करण्याची विनंती केली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राजेंद्र यांने सर्व पाहुणे मंडळीस बजावल, 'आता आपण काळानुरूप बदलायला हवे. अनावश्यक खर्चाला फाटा दयावा. दोन घराणे एकत्र येण्यासाठी देण्या-घेण्याचा व्यवहार अडथळा ठरू नये. लग्न कार्यासाठी कर्जबाजारी होणे भूषणावह नाही. वधु पक्षाला अडचणीत कशासाठी टाकायचे? लग्न म्हणजे दोन कुटुंबांची समान जबाबदारी आहे. त्यानुसार वधुपक्ष व वरपक्ष यांनी एकमेकांना समजून घेऊन एकमेकांची सोय पहावी आणि सोयरिक व्हावी. अशी अपेक्षा व्यक्त केली.' ही राजेंद्रची भावना मनोमन सर्वांना पटली आणि वधुचे काकांनी लग्न ऐपतीप्रमाणे करून देण्याचे मान्य केले व वधुचे कपडे वधुपक्षानी, वराचे कपडे वर पक्षाने घ्यावेत. मानपान ज्याचा त्यांनी पहावा. काकांच्या या प्रस्तावाचे हात जोडून राजेंद्रनी स्वागत केले. लगेच सुपारी फोडण्याचे निर्देश दिले. सर्वाना प्रस्ताव मनस्वी पटला. आनंदाने सर्वानी साखर खाल्ली. राजेंद्रच्या भूमिकेचे सर्वानी स्वागत केले. पाच मिनिटात बैठक संपली.

बैठकीतील भूमिका आणि पाच मिनिटाचा पॅटर्न सर्वांना आवडला. सर्वांनी राजेंद्रला धन्यवाद दिले.

राजेंद्र पवार हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. रानातलं फुल सुध्दा बागेतल्या फुलाशी स्पर्धा करू शकते. त्यानुसार येडशी सारख्या खेड्यात बालपण व शालेय शिक्षण झालेल्या राजेंद्र पवार नावाचे फुल स्पर्धेतून उच्च पदापर्यंत पोहचले. याचा मला व तमाम बहुजन समाजाला अभिमान वाटतो. राजेंद्रने आयुष्यभर अगदी स्वत:ला झोकून या देशाची सेवा केली आहे. आपले कर्तव्य अगदी प्रामाणिकपणे बजावले आहे. शासकीय नियमाप्रमाणे आता तो सेवानिवृत्त होत आहे. त्याचे हे ज्ञान मात्र शेवटपर्यंत जगाला वाटते रहाण्याचे काम मात्र तो शेवटपर्यंत करीतच राहिल याची मला खात्री आहे. पुढील आयुष्य त्याला सुख समृध्दी आणि आराग्यदायी जावो या मन:पूर्वक शुभेच्छा!



घरातील कर्ता पुरुष

सौ. रंजना सावंत
माध्यमिक शिक्षिका
सोलापूर
इंजि.राजेंद्र पवार यांच्या ज्येष्ठ भगिनी असून सोलापूर येथे स्थायिक आहेत. येथील माध्यमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

बार्शीच्या भगवंत नगरीत कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या कर्मभूमित, त्यांच्या छत्रछायेत वाढलेले व त्यांच्या विचाराने प्रेरित झालेले रामचंद्र जयवंत पवार सर हे व्यक्तिमत्व बार्शीच्या जगदाळे मामांच्या संस्थेत व येडशी येथील जनता विद्यालय आणि सुभाष विद्यार्थी वसतीगृह येथे त्यांच्या कर्तृत्वाने प्रसिध्द होते.

रा.ज. पवार सर हे जनता विद्यालय येडशी येथे हिंदी विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत होते. तसेच तेथीलच सुभाष विद्यार्थी वसतीगृहाचे सेक्रेटरी म्हणून कार्यरत होते. अगदी लहानपणापासून ते शिक्षण संपवून स्वत:च्या पायावर उभे राहून लग्न करून कौटुंबिक स्थिरस्थावर होईपर्यंत ते जगदाळे मामांच्या छत्रछायेत वावरले. त्यामुळे त्यांच्या मनावर मामांच्या

विचारांचा फार मोठा पगडा होता. जीवन घडविणारे संयम, शिस्त, कष्ट, जिद्द इत्यादी गुण त्यांनी अंगीकारले होते.

श्री. रा.ज. पवार सर यांना एकूण चार अपत्ये होती. दोन मुली आणि दोन मुले. त्यापैकी मोठी मुलगी म्हणजे मी सौ. रंजना गिरीधारी सावंत. दोन नंबरचा मुलगा माझा धाकटा भाऊ श्री.राजेंद्र रामचंद्र पवार, तीन नंबर माझी धाकटी बहिण सौ. सुनीता विलास गुंजाळ आणि चार नंबरचा धाकटा भाऊ डॉ श्री. संजीव रामचंद्र पवार. आम्हा भावंडाना आमच्या आईवडिलांनी शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली. प्रत्येक मुलाने आपापल्या आवडी नुसार शिक्षणाचे क्षेत्र निवडून त्यात आपले करियर केले.

माझे वडील तर शिक्षक होतेच पण माझी आईही शिक्षिका होती. असे म्हणतात ना घरातील पुरूष सुशिक्षीत असेल तर तो एकटाच सुशिक्षीत होतो. पण घरातील स्त्री सुशिक्षीत असेल तर अख्खे कुटुंब सुशिक्षीत होते. त्याप्रमाणे आमचे संपूर्ण कुटूंब सुशिक्षित होऊन सर्वांनी उच्च पदाच्या नोकऱ्या देखील मिळवल्या. आम्हा चारी भावंडांमध्ये माझा धाकटा भाऊ राजेंद्र हा खूप हुशार होता. त्याने प्रत्येक इयत्तेत पहिला क्रमांक कधीही सोडला नाही. इयत्ता १०वी च्या बोर्ड परिक्षेतही त्याने गुणवत्ता यादीत आपले नांव कोरले आणि शाळेचे व कुटुंबाचे नांव उज्ज्वल केले आहे. त्यामुळे तो आई वडिलांचा तसेच आम्हा भावंडाचा खूप लाडका होता.त्यामुळे आम्हां सर्वांना त्याचा खूप खूप अभिमान वाटत असतो.

आमचे आई वडिल सर्व सामान्य शिक्षकी पेशा असलेले. त्यामुळे त्यांनी आम्हा मुलांना ज्ञानाची शिदोरी भरभरून दिली. त्याच बरोबर आमच्यावर चांगले संस्कारही केले. पुढे १० वी नंतर राजुला पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवले. त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी वडील त्याची विशेष काळजी घेत असत. भविष्यात काय करावे, काय करू नये याचे धडे वडिलांनी आम्हाला

लहान वयातच दिले होते.

असंख्य संकटांच्या वादळामध्ये दीपस्तंभाप्रमाणे दृढ राहणारी व आपल्या मुलांच्या आयुष्यात दिशा व प्रकाश देणारी आमची सुसंस्कृत आई व भविष्याची उज्ज्वल वाट दाखवून उदिष्टाप्रत पोहोचण्यास मार्गदर्शन करण्यासाठी पाठीशी भक्कम उभे राहणारे आमचे वडील यांचा आम्हा चारी भावंडाना सार्थ अभिमान आहे.

कष्टाचं चांदणं होऊ दे
त्यांच्या उत्साहाला बहर येऊ दे !
आनंदाची फुले वेचित
त्यांचा प्रत्येक क्षण तृप्त होऊ दे

अशीच आम्ही सर्वजण देवाकडे प्रार्थना करत असू.

पुढे राजुने उच्च शिक्षण यू. पी. एस. सी. व एम. पी.एस.सी. परीक्षा देत यशाचे सर्वोच्च शिखर सर केले. आज तो यशाच्या उतुंग शिखरावर जाऊन पोहोचला आहे. हे पाहून आम्हा सर्वांची छाती अभिमानाने फुलून येते.

आणि हे सर्व शक्य झाले ते,
साहस, औदार्य अन संस्काराच्या कणाकणातून !
राजेंद्रचे व्यक्तिमत्व फुलले मातापित्यांच्या आदर्शातून !!

आज तो आमच्या घरातील एक कर्ता पुरूष आहे. आमच्या घरातील कुणाच्या काहीही समस्या किंवा अडचणी असो राजू अतिशय संयमाने, शांततेने समस्येचे निराकरण करतो. आम्हीपण सर्वजण त्याच्या विचारांचा आदर करतो. त्यामुळे तो आम्हाला एखाद्या दीपस्तंभासारखा भासतो.

सुसंस्कृतता, गुणवत्ता, यश ही काही मोठ्या शहरातल्या इंग्रजी

शाळांची आणि सुखसोयींने युक्त असलेल्या श्रीमंताच्याच मुलांची मक्तेदारी नसते तर ज्या हृदयात जिद्द, कष्ट, चिकाटी, धैर्य, आत्मविश्वास यांची ज्योत पेटते तेथे सर्व स्वप्नांची पूर्ती होते. हेच सर्व गुण राजुच्या अंगी होते. त्यामुळेच त्याने आज घराघरात आणि समाजात सर्वत्र मानाचे स्थान निर्माण केले आहे. आई वडिलांची स्वप्नपूर्ती करण्यात तो यशस्वी झाला आहे असे मला मनापासून वाटते आहे.

तुम्ही कोणाच्या पोटी जन्माला येता. तुमचे आई वडील गरीब आहेत की श्रीमंत, तुम्ही खेड्यात आहात की शहरात, मराठी मिडियमला आहात की सेमी इंग्रजीला आहात याचा व तुमच्या यशापयशाचा काहीही संबंध नसतो. तुमचे विचार, स्वभाव व मेहनत करण्याची वृत्ती यावरच तुमचे भवितव्य अवलंबून असते. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे राजेंद्रचा जीवन प्रवास होय.

राजू तुला दीर्घायुष्य लाभो हीच परमेश्वर चरणी इच्छा !

तुझ्या पुढील वाटचालीस व कार्यास लाख लाख शुभेच्छा !!



माझा पाठीराखा

प्रा.सौ. सुनिता गुंजाळ
प्राध्यापिका अहमदनगर
इंजि.राजेंद्र पवार
यांच्या कनिष्ठ भगिनी
असून अहमदनगर
येथे स्थायिक आहेत.
येथील महाविद्यालयात
प्राध्यापिका म्हणून
कार्यरत आहेत.

ट्रींग ट्रींग.... हॅलो... हं ताई मी पुण्याहून विजयकुमार मोरे बोलतोय. मला सचिव श्री राजेंद्र पवार साहेबांविषयी आपले मनोगत लिहून हवे आहे. Please......! मी ठीक आहे म्हणून फोन ठेवला आणि मन भूतकाळात घिरट्या घालू लागलं

सचिव श्री.राजेंद्र पवार साहेब म्हणजे माझा मोठा भाऊ! त्याच्या सेवाभावी कृतीची दखल घेऊन त्याच्यावर गौरवग्रंथ होतोय याचा मनस्वी खूपच आनंद झाला आणि अभिमानही वाटला! त्यात आपल्यालाही खारीचा वाटा मिळतोय म्हणून तर अत्यानंदच झाला. भाऊविषयी मनोगत काय लिहावं? किती ही लिहीलं तरी शब्द कमी पडतील असा आहे तो! तो माझा पाठीराखा, तोच माझा पालक (कधी आई कधी वडील) आहे. माझ्या

जगण्याची उमेद आहे. माझ्या समस्यांचे निराकरण आहे. माझा विश्वास फक्त माझाच नव्हे तर आमच्या पूर्ण परिवाराचा आधारस्तंभ आहे. परमेश्वराने माझ्या आई वडिलांच्या पोटी असा हिरा, सर्वांचा पालनहार जन्माला घातला त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार व त्या निर्मात्याला शतश: प्रणाम!

आमचं बालपण येडशी सारख्या सुंदर खेड्यात गेलं. माझा जन्मही तिथलाच. गावापासून दूर एक मैल अंतरावर जनता विद्यालय ही आमची शाळा व त्याला लागूनच असलेलं सुभाष विद्यार्थी वसतिगृह आहे. यातील एका विंगेत आम्ही व काही शिक्षक राहात असत. या वसतिगृहाचे सुपरिंटेडेंट म्हणून माझे वडील कै. रामचंद्र पवार सर हे सेवाभावी वृत्तीने विनावेतन काम पहायचे. त्याबरोबरच त्यांचा जनता विद्यालयात उत्तम हिंदी शिक्षक म्हणून नावलौकिक होता. माझ्या वडिलांमुळे आणि त्यांना सावलीसारखी साथ देणारी आमची आई यांच्यामुळे शिस्त, प्रामाणिकपणा, नियमितपणा, साधेपणा, स्वच्छ नीटनेटके राहणीमान, दुसऱ्यांना मदत करण्याची नि:स्वार्थी वृत्ती इ. अनेक गुण आम्हा चारही भावंडांमध्ये खोलवर रूजलेले आहेत. आम्हा भावंडांमध्ये कधीही आजतागायत भांडण झाल्याचे नव्हे कधीच एकमेकांना ओरडून मोठ्या आवाजात बोलल्याचंही आठवत नाही.अजूनही तोच आदरभाव आमच्यात टिकून आहे. घरातील सगळी कामं घरीच सगळ्यांनी मिळून करायची सवय आम्हाला लहानपणापासून होती. मग ते बागकाम असो, विहिरीवरून पाणी भरणे, घराची साफसफाई करणे, पाटाच्या पाण्यात जाऊन कपडे धुणे इत्यादी. रिकाम्या वेळेत वाचन, पाठांतर, खेळ, ड्रॉईंग इ. कला जोपासल्या जायच्या.

माझ्या भावाचे (राजेंद्र पवार) ड्रॉईंग खूपच सुंदर असून हस्ताक्षर तर बघतच राहावं असं आहे! वाचनाची प्रचंड आवड अगदी लहानपणापासूनच होती. कदाचित त्याच्यातील या दोन्ही कलाच त्याला Civil Engineering

कडे घेऊन गेल्या असाव्यात? त्याच्या अति वाचनाच्या ध्यासापायी व जिज्ञासू वृत्तीमुळे आमच्या घरातच एक छोटी लायब्ररी तयार झाली होती. त्याच्या हातात एखादं पुस्तक पडलं की तो तहान भूक विसरून वाचन करे. मला आठवतं त्याने छावाच नव्हे तर अशी कितीतरी पुस्तकं दहावीत असताना एका बैठकीत पूर्ण वाचली होती. येडशी गावात दहावीपर्यंतच शाळा होती. तो दहावीला केंद्रात व शाळेत पहिला आला. पुढील शिक्षणासाठी सोलापूरला गेला. तो घरापासून दूर गेला म्हणून वाईट वाटलं पण त्यानंतर भावनिक नातं अधिक दृढ होत गेलं. घरापासून दूर गेला तरी त्याला घराचा विसर, नात्यांचा विसर कधीच पडला नाही. उलट बाहेरच्या जगात नवीन जे काही तो पहायचा, अनुभवायचा त्या सर्व गोष्टी, ते अनुभव घरातील सर्वांना कसे सांगता येतील यासाठी तो सतत धडपड करायचा. घरासाठी उपयुक्त वस्तु, गोष्टी, त्याला आवडल्या की घरी घेऊन यायचा आणि अगदी प्रात्यक्षिकासहीत सर्वांना समजावून सांगायचा. त्यामुळे भाऊची भेट म्हणजे ज्ञानात भर. हे समीरकरणच झाले होते. भाऊ घरी येणार म्हटलं की आम्ही आतुरतेने वाट पहायचो. त्याच्या Gift म्हणजे नवनवीन अनुभवांची शिदोरीच! त्यामुळे आमचे Knowledge वृध्दींगत होत गेलं आहे आणि बाह्य जगाची ओळखही होत गेली आम्हा सर्वांना त्याच्या या कृतीमुळे...

बघता बघता मी B.Sc.झाले आणि भाऊ M.E. करत करत M.P.S.C परीक्षा देत होता. त्याने पहिल्याच attempt मध्ये परीक्षा पास होऊन Class -1 ‘अधकारी म्हणून Training ही सुरू केले. पण माझे शिक्षण मात्र थांबवण्याचा निर्णय माझ्या आई वडीलांनी घेतला. कारण त्याकाळी शिक्षणासाठी मुलींना बाहेर गावी ठेवण्याचा विचारसुध्दा पालक करत नसत. पण मी B .SCला University मध्ये 1 St आल्याचं जेव्हा त्याला समजलं तेव्हा त्याने घरात कुणालाही न सांगता माझ्या M .sc च्या admission

'साठी अर्ज केले. घरी येऊन वडिलांना सांगितले की ही म्हणजे मी M .sc करणार आणि तिचे admission मी करणार. तेव्हा तिचं शिक्षण पूर्ण होईपर्यंत तिच्या लग्नाचा विषय बंद आणि तिचे सर्व सुरळीत होईपर्यंत माझ्या लग्नाचा विषय बंद. नंतर मला जवळ बोलावून विचारले, ''कुठे करायचं तुझे admission? पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद की नागपूर? मी कधीच घर न सोडल्याने पुरती भांबावले होते. त्याने मला खूप समजावून सांगितले आणि B .sc ज्या विद्यापीठात झाले त्याच विद्यापीठात M .sc केलेले बरे राहिल म्हणून औरंगाबादला युनिव्हर्सिटीत माझे M .sc (Phy) साठी प्रवेश घेतला आणि त्यानंतर स्वामी समर्थांच्या मंत्राप्रमाणे भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे याप्रमाणे सतत सावलीसारखा माझ्या पाठीशी खंबीर उभा राहिला. तिथून पुढे तो फक्त माझा भाऊच नाही तर आई,वडील,पालक, शिक्षक सर्व काही झाला. त्याच्या या निर्णयामुळेच मी आज M .sc. Bed पूर्ण करून Jr. College Lecturer म्हणून आनंदाने कार्यरत आहे.

माझ्या लग्नाच्या वेळी अहमदनगरचं स्थळ आलेलं. तिकडूनच मागणी होती. पण नगर जिल्हा आमच्यासाठी अगदीच नवीन होता. एवढ्या लांब द्यावं की नाही या चिंतेत वडील व आई होते. तेव्हा भाऊ म्हणाला तुझं मत सांग, तुझी तयारी आहे का? तुला पसंत नसेल तर नको. अर्थात मला काहीच निर्णय देता आला नाही पण मी त्याला एवढंच म्हटलं की हुंडा न घेणाऱ्या स्थळाला माझी पसंती असेल! ...आणि झालंही तसंच. त्याकाळी पालक आई-वडील ठरवतील तेच Final होत असे. पण आमच्या घरात स्त्री-पुरूष समानता होती. तीच पुढे आम्ही भावंडानीही चालू ठेवली आहे. नंतर माझ्या आयुष्यात अनेकदा प्रचंड तणाव, अनेकदा नैराश्य आले. त्यावेळी मी खूप अस्वस्थ व्हायची. अशा काळात तर त्याने मला खूप सावरलंय. प्रत्यक्ष भेट होणं अवघड असायचं. अशावेळी अनेकदा पत्रांमधून अर्थपूर्ण कविता,

सुविचार याद्वारे माझ्यातील गुण दाखवून माझ्यातला न्यूनगंड कमी केलाय. अशीच एक कविता तू खरंच खूप खास आहेस (कुणी लिहीली माहित नाही) यातून माझं केलेलं सांत्वन मला शेअर करावसं वाटतं.

तू खरंच खूप खास आहेस....!
डोळे मिटून जेव्हा स्वत:ला शोधशील तेव्हा कळेल
तू खूप खास आहेस....!
आयुष्य म्हणजे आपल्याला हवं ते मिळवण्यासाठी
करावा लागणारा प्रवास आहे.
मग प्रवासात कधी दरी, कधी वादळ, तर कधी वाळवंट आहे.
कधी ऊन, तर कधी मुसळधार पाऊस आहे
कधी गालिचे, तर कधी काट्यांची फौज आहे
पण नजर लक्ष्यावर असेल
तर प्रवास ही एक मौज आहे!
अशा असंख्य लक्ष्यांची तुझी आस आहे.
डोळे मिटून जेव्हा स्वत:ला शोधशील
तेव्हा कळेल ... तू खरंच खूप खास आहेस ।।
वेदनांचे स्वत:चे एक महत्व आहे
त्या सहन केल्यास तरच
तुझं एक अस्तित्व आहे...
पण जर हार मानून गेलीस
तर मात्र पराभवाचे प्रभुत्व आहे...
प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर,
कधी शुभेच्छा
तर कधी शिव्या-शाप आहे

दुर्लक्ष केलंस तर कळेल,
तुला तर तुझ्या
स्वप्नांचाच इतका व्याप आहे....!
काहीही झाले तरी डगमगू नकोस,
तुझ्यात प्रचंड साहस आहे.....!
डोळे मिटून स्वत:ला शोधशील तर कळेल,
तू खरंच खूप खास आहेस....!

त्यानंतर मात्र मी खूप ताठ मानेने आणि कुठल्याही संकटाला न घाबरता आलेली परिस्थिती धैर्याने सावरायला व त्यावर मात करायला शिकले. अशा प्रकारे एखादी व्यक्ति चुकीच्या मार्गाने जात असेल तर त्याला समजावून सांगून, वेळ प्रसंगी कठोर होऊन त्या व्यक्तिला योग्य मार्गावर कसं आणायचं ही खुबी त्याच्यात आहे. समोरचा लहान, मोठा, गरीब, श्रीमंत हे न पाहता त्याचं म्हणणं एवढंच असतं की कुठल्याही व्यक्तिच्या किंमतीवरून आस्तित्व ठरत नसतं तर आस्तित्वावरून किंमत ठरत असते! म्हणून कोणी कसाही असो, त्याच्याशी इतकं चांगलं वागा की वाईटातल्या वाईट माणसाला देखील आपली कॉपी करण्याची इच्छा झाली पाहिजे.!

आज माझा भाऊ त्यांच्या खात्याच्या सर्वोच्च सचिव पदावर आहे याचा आम्हा सर्वांना सार्थ आभिमान आहे. एक एक पायरी पादाक्रांत करीत त्याने हे यशाचे शिखर स्वबळावर मिळवले आहे. त्या शिखराकडे ताठ मानेने पाहताना आमचा ऊर भरून आल्याशिवाय राहत नाही. त्याने मिळवलेले हे यश, त्याचं स्वकर्तृत्व, प्रामाणिक कष्ट, प्रचंड जिद्द यामुळेच मिळालेलं आहे. कित्येक रात्री तीन चार वाजेपर्यंत काम करताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे. तर कधी रात्रीची झोप अर्धा एक तास बसूनच घ्यायची आणि परत कामाला लागायचं हे ही मी पाहिलंय. एवढी प्रचंड उर्जा येते कुठून? सत्कर्मातूनच!

एवढ्या सगळ्या बाहेरच्या कामाचा ताण, व्याप यात मग्न असला तरी स्वत:च्या परिवाराकडे विशेषत: आई व वडिलांकडे कधीही दुर्लक्ष होऊ दिले नाही. जेवढे शक्य होईल तेवढा जगप्रवास (तीर्थक्षेत्र, निसर्गरम्य ठिकाणे इ.) त्यांना घेऊन केलाय. त्याला मी साक्षीदार आहे. आमच्या परिवारात सर्वांचा तो राजू भाऊ आहे. तर भाचे कंपनीचा लाडका राजू मामा आहे. सगळ्यांच्या मनात आदराचं स्थान असलेला आणि त्यांच्याजवळ कुठल्याही अडचणीवर मात करण्याची खात्री देणारा विश्वास आहे. प्रत्येकाने मेहनत करून स्वकर्तृत्वावर पुढे यावं असं त्याचं ठाम मत असतं. सतत कामाचा ध्यास व जे काम हाती घेऊ ते पूर्ण करण्याची जिद्द असलेला माझा भाऊ. त्याचे माझ्या जीवनातील स्थान पुन्हा थोडक्यात शेअर करते.

आई वडील म्हणजे माझा जन्म !
भाऊ म्हणजे मी झाल्याचा आनंद
आई वडील म्हणजे पुस्तकाची गोड सुरूवात
भाऊ म्हणजे पुस्तकाचा गोड शेवट
आई वडील म्हणजे शब्द
भाऊ म्हणजे कविता
आई वडील म्हणजे गोधडीतील ऊब
भाऊ म्हणजे थंडगार हवा
आई वडील म्हणजे लाड
भाऊ म्हणजे हट्ट
आई वडील म्हणजे discussion
भाऊ म्हणजे Suggestion
आई वडील म्हणजे Birthday
भाऊ म्हणजे Celebration

आई वडील म्हणजे Balance
भाऊ म्हणजे Phone
आई वडील म्हणजे कधी कधी रागावणे
भाऊ म्हणजे फक्त समजावणे
आई वडील म्हणजे विठ्ठल-रखुमाई
भाऊ म्हणजे फक्त भक्ती
आई वडील म्हणजे आशीर्वाद
भाऊ म्हणजे पूर्ण विश्वास
आई वडील म्हणजे हृदय
भाऊ म्हणजे शरीर
आई वडील म्हणजे माझं सुंदर आयुष्य
आणि भाऊ म्हणजे त्या आयुष्याचा सुंदर चित्रकार!

असा भाऊ (माझा पाठीराखा) मला मिळाला यापेक्षा सुंदर गोष्ट दुसरी कुठली माझ्यासाठी माझ्या आयुष्यात असूच शकत नाही. त्यासाठी त्या निर्मात्याला खूप धन्यवाद! मी आई वडील व तो कर्ता करवीता ईश्वर यांची खूप ऋणी आहे व सदैव राहील.

देवाने सेवानिवृत्तीनंतर त्याला उदंड आयुष्य निरोगी जीवन व मनातील सर्व इच्छा पूर्ण करण्याचे बळ द्यावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना व शतशः प्रणाम!

त्याच्याविषयी कितीही लिहिलं तरी लेखणी व कागद कमी पडतील पण कुठंतरी थांबायला हवं मला या मनोगताद्वारे कुठंतरी माझ्या भावना कागदावर उतरवता आल्या तशी संधी मोरे साहेब व त्यांचे साथीदार यांनी दिली त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार..! शेवटी एवढेच म्हणते....

कधीही न भांडणारा
तूच रे माझा सखा

अमृत मंथन

नेहमीच मार्गदर्शन करणारा
सतत मला (न कंटाळता) समजावणारा,
कधी तरी चिडणारा पण
तितकंच प्रेम करणारा
राखीचा मान ठेवून
आवडती ओवाळणी टाकणारा
सर्वात अनमोल हिरा
मला आशीर्वाद देणारा
उदंड आयुष्य लाभू दे तुला
आणि
जन्मोजन्मी तूच मोठा भाऊ म्हणून
मिळू दे मला ..!



माझा भाऊ

डॉ. संजीव पवार
व्हेटरनरी डॉक्टर, पुणे
इंजि.राजेंद्र पवार यांचे हे कनिष्ठ बंधू असून काही वर्षे परदेशात नोकरी केल्यानंतर आता ते पुणे येथे स्थायिक झाले आहेत. ते वर्ग १ चे अधिकारी आहेत.

''**हे** घे डेक्कन एक्सप्रेसचे तिकीट मी काढून ठेवले होते, चल तुला पुणे स्टेशन वर सोडतो.'' भाऊंचं हे वाक्य ऐकून चक्रावून गेलो व तीन ताड उडालो...!

पूर्वीच्या काळी ग्रामिण भागामध्ये विहिरीत पोहायला शिकवायचे. विहिरीजवळ गेल्यावर ज्याला शिकवायचे आहे त्याला त्याच्या न कळत उचलून पाण्यात फेकून द्यायचे. जेणेकरून त्या व्यक्तिची पाण्याची भीती जावी. पण त्यावेळी त्या व्यक्तिची जशी अवस्था होते अगदी तशीच अवस्था माझी भाऊच्या या वरील वाक्याने झाली. भाऊने मला मुंबईच्या मायानगरीत फेकून दिले होते. त्याचे झाले असे.

मी १९८३ साली बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर मेडिकल, इंजिनीयर,

कृषि तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश अर्ज केले होते. सर्वात पहिला ॲडमिशन कॉल मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचा आला. त्यावेळी भाऊ पुण्यात ME करत होता. त्यावेळी फोन नव्हते. मी लगेच भाऊला पत्र लिहिलं आणि ॲडमिशन कॉल बद्दल माहिती दिली. पत्र मिळाल्याबरोबर तो येडशीला आला. काका (वडील) बरोबर चर्चा करून त्याने सांगितले की कॉल आला आहे तर ॲडमिशन घेऊ आणि नंतर इतर क्षेत्रातील कॉल आला तर हे ॲडमिशन रद्द करून दुसरीकडे घेऊ. त्याकाळी अशी सोय होती. मी मात्र त्यांची चर्चा शांतपणे ऐकत होतो. तेव्हा संमिश्र विचारांचा गोंधळ माझ्या मनामध्ये सुरू झाला. येडशी सारख्या ग्रामिण भागामध्ये प्राथमिक व सोलापूर येथे माध्यमिक शिक्षण घेतले. सोलापूर हेच एकमेव मोठं शहर मी माझ्या आयुष्यात पाहिलेलं. मुंबई या स्वप्ननगरी बद्दल केवळ ऐकून होतो आणि आयुष्यात कधी मुंबईला जायला मिळेल असे स्वप्नातही वाटले नव्हते. भीतीही होती व खुशीही होती.

‘‘चला तर उद्याच निघू’’ या वाक्याने मी भानावर आलो. भाऊ व काका कॉलेज/हॉस्टेल फी व इतर खर्च याची सोय करण्यासाठी गेले आणि मी व ताई (आई) कपडे व इतर साहित्य याची जमवाजमव करण्यात गुंतलो. सर्व साहित्य ट्रंक (लोखंडी पेटी) मध्ये भरले आणि गादीची वळकटी बांधून घेतली. लातूर–मुंबई ही एस टी बस येडशी येथून जाते. त्या बसने भाऊ व काका यांच्या बरोबर माझा प्रवास मायानगरीत मुंबईकडे सुरू झाला. रात्रीचा प्रवास होता पण मनाची सारखी धकधक चालूच होती. घरापासून एवढ्या लांब एकटं राहायचं? मग कुठली झोप!

दुसऱ्या दिवशी मुंबईत पोचलो आणि कॉलेज व हॉस्टेल प्रवेशाच्या सर्व प्रक्रिया भाऊनेच पार पाडल्या. मी मात्र पूर्ण हरखून गेलो होतो. चौकशी अंती समजले की प्रत्यक्ष कॉलेज क्लास चालू व्हायला एकूण १५ दिवसांचा

कालावधी होता. माझ्या काळजात धस्स झालं. भाऊ व काका निघून गेल्यावर मला एकटं राहावं लागणार या भीतीने. पंधरा दिवस इथे एकटा काय करणार? ‘‘चल आमच्या बरोबर परत. पुण्यात माझ्याबरोबर राहा. नंतर मी तुला आणून सोडतो.’’ भाऊने मार्ग काढला आणि माझा जीव भांड्यात पडला. सर्व सामान हॉस्टेल रूममध्ये ठेवले व थोडे कपडे बरोबर घेऊन आम्ही पुण्यात आलो. काका येडशीला परतले. भाऊ परत मुंबईला नेऊन सोडणार म्हणून मी मनोमन खूश होतो.

भाऊ पुण्यात दोन मित्रांबरोबर शनिवार वाड्याजवळ एक रूममध्ये रहात होता. त्यावेळी एक लुना होती भाऊकडे. कॉलेजचं काम झालं की रोज लुनावर आमचं पुणे दर्शन व्हायचं. असे छान दिवस चालले असताना १५ दिवस कधी संपले हे कळलंच नाही. एक दिवस ‘हे घे डेक्कन एक्सप्रेसचे तिकीट. मी काढूनच ठेवले होते. चल तुला पुणे स्टेशनला ट्रेनमध्ये बसवून देतो. आता कॉलेज क्लास सुरू होतील. जा तू मुंबईला.’ भाऊंचे हे वाक्य ऐकून चक्रावून गेलो व तीन ताड उडालो.! म्हणजे मी अक्षरश: किंचाळलोच. ‘‘तू मुंबईला येणार होता ना मला सोडायला?’’ मी कापऱ्या आवाजात म्हटले. भाऊ नेहमी प्रमाणे मिश्किल हसला आणि म्हणाला, ‘‘मी नाही आलो तरी डेक्कन एक्सप्रेस पुण्याहून मुंबईलाच जाणार आहे. काही घाबरायची गरज नाही. तू आता लहान नाहीस. एकटा जाऊ शकतोस. एकटा गेल्याशिवाय तुझा आत्मविश्वास कसा वाढेल. १५ दिवसापूर्वी आपण जसे गेलो होतो तसेच जायचे. काही अवघड नाही.’’ मग पुणे स्टेशनवर ट्रेनमध्ये बसवून भाऊ निघून गेला. त्याने अक्षरश: विहिरीच्या पाण्यात मला ढकलून दिले होते. मग काय? जेवढे आठवतील तेवढ्या देवांचा मनोमन धावा करत होतो. इंजिनच्या वेगापेक्षा माझ्या हृदयाची धडधड जास्त वेगात होती. विचारांची चक्रेही वेगात फिरत होती. अचानक एकटा जाऊ शकतोस व त्यामुळे तुझा आत्मविश्वास

वाढेल. हे भाऊंचं वाक्य सतत मनात फिरत होतं. मनाची धडधड एकदम कमी झाली. आता फक्त इंजिन वेगात धावत होते. मुंबईत प्रवेश केला आणि काय आश्चर्य १५ दिवसा पूर्वीचा प्रवास आठवला. ओळखीची ठिकाणं वाटायला लागली आणि भाऊने सांगितल्याप्रमाणे सुखरूप कॉलेजवर पोचलो.

मुंबई मायानगरीत अशाप्रकारे फेकून दिल्याने माझ्या मनाची भीति कायमची निघून गेली होती. त्यानंतर मात्र आजपर्यंत मुंबईचं काय भारतात कुठेही तसेच परदेशातही कुवैत, केनिया, इथिओपिया, नायजेरिया या देशांचा एकट्याने प्रवास आणि एकटं राहायची ताकद व आत्मविश्वास केवळ या घटनेने दिला आणि माझे आयुष्य पूर्णपणे बदलले. आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. भाऊंचं व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व याचं वर्णन करणं खरंच शब्दांच्या पलीकडे आहे. वर्णन करायला शब्दच सापडत नाहीत आणि जे सुचतात ते अगदीच ठेंगणे वाटतात. आतापर्यंतच्या आयुष्यात प्रत्येकवेळी अडचणीमध्ये भाऊंचे मार्गदर्शन व तत्परतेने मदत लाख मोलाची ठरली. त्याचा मित्र परिवार प्रचंड मोठा आहे. फक्त इंजिनीरिंग क्षेत्रातच नव्हे तर इतर सर्व क्षेत्रात त्याचे मित्र आहेत. प्रत्येकाशी दांडगा संपर्क व जिव्हाळ्याचे संबंध आहेत. हे सर्वांना जमतेच असे नाही. सरकारी नोकरीचा प्रचंड व्याप सांभाळून मित्रांशी सतत संपर्क, घरातील परिवारातील सर्वांच्या अडचणींवर योग्य मार्गदर्शन व प्रत्येकाला मदत करणे आणि एवढं करुनही स्वत:च्या त्रासाचा किंवा अडचणींचा सुगावाही कोणाला लागू न देत नाहीत. चेहऱ्यावर सतत मिश्किल भाव. मला वाटतं ही देणगी परमेश्वर सर्वांनाच देत नाही.

एक दिवस भाऊला आम्ही सर्वांनी मोठा आश्चर्याचा धक्का देण्याचे ठरविले. १५ जुलै २०१२चा तो दिवस!. भाऊचा वाढदिवस पुण्यात साजरा करायचं ठरविलं. त्यावेळी तो पुण्यात होता. गुप्त ठेवणं अवघड होतं. परंतु

वहिनी आणि चिण्मयीने(भाऊची मुलगी) ही जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्यांच्याशी सतत फोनवर समन्वय साधून होतो. आपटे रोडवरील हॉटेल श्रेयसमधील हॉल बुक केला. जेवणाची व इतर सर्व व्यवस्था केली. संपूर्ण कुटुंबाला पुण्यात निमंत्रित केले. १५ जुलै रोजी परिवारातील जवळपास ५० ते साठ सदस्य सकाळी १०.३० वाजता हॉलमध्ये पोहचले. वहिनींना निरोप दिला. सर्व तयार असल्याचे सांगितले. त्यांनी काहीतरी सांगून भाऊला हॉटेल श्रेयसमध्ये आणले. हॉलचा दरवाजा भाऊने ढकलला आणि....

परिवारातील सर्व सदस्यांनी एकाचवेळी पुष्पवृष्टि करुन व सुरेख केक कापून भाऊला ५० व्या वाढदिवासाच्या शुभेच्छा दिल्या. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. सर्वात जास्त आश्चर्य म्हणजे वडील आजारी असताना आईसह बार्शीहून पुण्याला आले होते.

भाऊ......! एक भारदस्त व्यक्तिमत्व! वागण्यात खंबीर व कणखर... पण तेवढाच मऊ, हळवा आणि संपूर्ण कुटुंब व परिवाराचा फार मोठा आधारस्तंभ... अगदी पाठीच्या कण्यासारखा...!

भाऊस शतशः नमन!



कुटुंबाचा आधारवड

डॉ.सौ. अंजली पवार
नाशिक येथे वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत इंजि.राजेंद्र पवार यांच्या भावजयी असून डॉ. संजीव पवार यांच्या त्या धर्मपत्नी आहेत.

मला फोनवर विचारण्यात आले की तुम्ही लेख लिहाल का ?... आम्ही श्री. राजेंद्र पवार सचिव, पाटबंधारे खाते ... यांच्यावर गौरवग्रंथ काढतोय..! श्री. राजेंद्र पवार म्हणजे माझ्या पतीचे मोठे भाऊ! त्यांना मी भाऊजी म्हणते. तेव्हा माझे मन पंचवीस वर्षे मागे गेले. प्रथमच आमचे लग्न ठरवण्यासाठी माझ्या वडिलांना मोत्यासारख्या अक्षरात पत्र लिहिणारे होते भाऊजी!

तेव्हापासूनच प्रत्येक बाबतीत घरातील मोठा मुलगा म्हणून सर्वांची जबाबदारी घेणारे भाऊजी! आम्हाला कुठलीही अडचण येवो त्याचं उत्तर भाऊजींकडे असते.

बालपण येडशी (उस्मानाबाद जिल्हा) सारख्या छोट्याशा खेड्यात गेले.राहते

घर म्हणजे फक्त एक छोटी खोली. तिथे आई वडील व चार भावंडे अशा छोट्या गावात बालपण जाऊनही, भाऊजींना प्रगतीपासून कुणीही थांबवू शकले नाही.

Razor sharp असे वर्णन ज्यांच्या बुध्दीचे करता येईल असे एकमेव माझ्या पाहण्यातील असे आमचे भाऊजी! त्यामुळे पहिलीपासून ते पॉलिटेक्नीक. पॉलिटेक्निक ते इंजिनीरिंग (बी.ई.) सगळीकडे त्याचाच पहिला नंबर ...! MPSC मध्ये काहीतरी तांत्रिक चुकीमुळे फक्त दुसरा नंवर!

माझा मुलगा मला कधी म्हणतो, ''आई मला पुण्या मुंबईत शिकायला जायचंय.'' तेव्हा मी त्याला सांगते एका छोट्या खेड्यात राहून काका सचिव पदापर्यंत जाऊ शकतात तर तू का नाही?

वाचनाचा अफाट वेग! मग कधी कधी प्रवासातही पुस्तक वाचून काढतील. भाऊजींकडे कुठलीही कला नाही असे नाही! शिवाय कुणाकडेही त्याचे शिक्षण न घेता...! मी तर ते बघूनच अवाक होते... भाऊजी सुंदर चित्रे काढतात, बुलबुल, पियानो वाजवतात, छानसे गाणे म्हणतात असे सर्वगुणसंपन्न आमचे भाऊजी!

आमच्या बार्शीच्या घराचे नाव आहे विरंगुळा..! त्याच नावाचा व्हॉट्अप ग्रुप आहे. कुटुंबात कुठलीही अडचण निर्माण होवो ते प्रकरण शेवटी भाऊजींकडे जाते. त्यामुळे आम्ही भाऊजींना गंमतीने सुप्रीम कोर्ट म्हणतो!

कुटुंबातील सर्वांच्या आवडी निवडी लक्षात ठेवून त्या भाऊजी पूर्ण करतात. जेव्हढे प्रेमळ तेवढेच कुणाचे काही चुकले तर त्यांच्याकडे चुकीला माफी नाही. त्यातून कुणीही सुटत नाही मग!

भाऊजींचे जेवणाचे कुठल्याही प्रकारचे नखरे नसतात. परंतु मराठवाड्यातील असल्याने ठेचा अत्यंत प्रिय!

माझ्या मुलांच्या यश अपयशात कायम बरोबर असणारे, मुलाला

दहावीत ९५% मार्क मिळाल्यावर ऑफिसमध्येही पेढे वाटणारे भाऊजी! एकदा मुलीला CA च्या परिक्षेत अपयश आले तर वातावरण हलके फुलके करून तिला सिनेमाला जायला लावणारेही भाऊजीच!

आमचे सासरे गेले तेव्हा धीरोदात्तपणे डोळ्यातील अश्रू बाजूला सारून सासऱ्यांच्या शवावर कुठलेही विधी न करता सोलापूर मेडिकल कॉलेजला त्यांचा देह दान करणारे पण भाऊजीच! माझे पति डॉ संजीव व त्यांच्यामधील नाते म्हणजे आधुनिक काळातील दुसरे राम लक्ष्मणच!

कवी सुरेश भटांच्या ओळी आठवतात

तारूण्य तुझ्या हृदयाचे
हे असेच बहरत राहो
वार्धक्य तुझ्या जगण्याला
हे असेच विसरत जावो

भीति ज्यांच्या शब्द कोषातच नसणारे असे एकमेव आमचे भाऊजी!

संकटांना कधीही न घाबरणारे, स्वत:च्या आयुष्यातील संकटाचा वाराही आमच्यापर्यंत येऊ न देणारेही भाऊजीच! किती आणि काय काय लिहावेसे वाटतेय पण शब्दांची मर्यादा मला घालून दिल्यामुळे थांबते. भाऊजींना शुभेच्छा देते.

शत शरदांचे सुभग चांदणे
उजळो वाटेवर,
लाभो संसारातील सारे
सुखदायी सुंदर.



प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

इंजि.श्री. सुजीत सावंत
(एम टेक)
मुंबई येथे युनियन बँकेत मॅनेजर. इंजि.राजेंद्र पवार यांचे भाचे असून सोलापूर येथील बहिण रंजना सावंत यांचा मुलगा आहे. सद्या मुंबईत स्थायिक आहेत.


माणूस आपल्या आयुष्यात मित्र मैत्रिणी, शिक्षक ऑफिसमधील सहकर्मचारी निवडू शकतो. पण रक्ताचे नातेवाईक अथवा नाती ही जन्मत: नशिबात लिहिलेली असतात. श्री. राजेंद्र पवार उर्फ राजुमामा हे त्यापैकीच नशिबात लिहिलेलं एक नातं.

माझे आजी आजोबा मुळातच सुशिक्षित आणि त्यातून शिक्षकी पेशात असल्यामुळे त्यांनी सर्वच मुलांमधे अभ्यासाची गोडी रूजवली होती. मामांनी (M .E . civil) झाल्यावर MPSC Clear करून Errigation मध्ये class -1 officer ची पोस्ट मिळवली. त्यामुळे आम्हा सर्व भावा बहिणींमध्ये लहानपणापासूनच आदर्श रचला गेला होता. मामांचा स्वभाव मुळातच कडक आणि शिस्तप्रिय असल्याने नातेवाईकांमध्ये लहानांपासून

मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच मनात त्यांच्याबद्दल आदरयुक्त भीति दडली आहे. ज्ञान, शिस्त आणि कामामधील एकनिष्ठता यांचा सुयोग्य ताळमेळ मामांच्या क्षेत्रातील प्रगतीत दिसून येतो. ऑफीसच्या कामानिमित्त बऱ्याचदा म्हणजे अगदी आठवड्यातून दोन ते तीन वेळा त्यांचा बाहेरगावी दौरा होत असे. आजही म्हणजे Retiement जवळ आलेली असताना कुठली Site - visit असेल conference असेल meeting असेल मामा प्रवास तितक्याच उत्साहात आणि आवडीने करतात. एवढे करून ही मी त्यांना कधी थकलेले किंवा आजारी पडून Hospital मध्ये admit केल्याचे पाहिले नाही. किंवा आठवतही नाही. कामाच्या वेळापत्रकात इतके गुंतलेले असूनही कुटूंब नातेवाईक आणि मित्रपरिवार यांच्या भेटीगाठीसाठी वेळ काढण्यात ते कधी ही चुकले नाहीत. मामांच्या मित्र परिवारांपैकी काही मंडळीचा योगायोगाने माझाही परिचय झाला. त्यापैकीच एक म्हणजे सध्याचे विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. प्रतापराव दीघावकर साहेब. एका भेटी दरम्यान दीघावकर साहेब मला पाठीवर हात ठेवून म्हणाले होते, ''तू राजेंद्र पवारांचा भाचा म्हणजे माझाच भाचा! काही मदत लागली तर हक्काने सांग.'' या त्यांच्या बोलण्यावरून मामांची आणि श्री दीघावकर साहेबांची मैत्री किती घट्ट असेल याचा परिचय आला होता. मामांच्या आयुष्याच्या वाटेवर अनेक खडतर प्रसंगानाही ते नेटाने सामोरे गेले. सन २०१७ मधील पितृशोक ही त्यातीलच एक घटना. आजोबांची प्रकृती २०१६ डिसेंबरच्या अखेरिस अतिशय खालावली. त्यांना Ventiletor वर ठेवण्यात आले होते. पण अखेर २ जानेवारी २०१७ रोजी त्यांनी शेवटचा श्वास सोडला. शेवटच्या दिवसांमध्ये त्यांच्यावर जगदाळे मामा रूग्णालय बार्शी येथे उपचार चालू होते. अशा कठीण प्रसंगामध्ये सुध्दा मामांनी स्वत:ला सावरत आजीला खूप धीर दिला. मृत्यूनंतर आजोबांचे देहदान करायचे ठरले होते. त्यासाठी त्यांना

सोलापूरला घेऊन जायचे ठरले. एक रूग्णवाहिका बोलावली. त्यासोबत २-३ गाड्यांमध्ये इतर नातेवाईकांना घेऊन आम्ही दुसऱ्या दिवशी सोलपूरला निघालो. त्याआधी दोन दिवसांपासून एक क्षणभर सुद्धा मामा झोपलेले नव्हते अशा परिस्थितीत मी त्यांना स्वत: गाडी न चालवण्याची विनंतीही केली होती पण बार्शी ते सोलापूर हे काही फार अंतर नसल्याने त्यांनी स्वत:च गाडी चालवण्याची आग्रही भूमिका घेतली होती. शेवटी आम्ही निघालो. माझी गाडी त्या ताफ्यामध्ये सगळ्यात शेवटी होती आणि माझ्या समोरच मामांची गाडी होती. त्यांच्या गाडीत माझे दुसरे मामा, मावशी, आई आणि आजीसुध्दा होती. शोककळा पसरली असल्यामुळे गाडीमध्ये कुणीच कोणाशी बोलत नव्हते. अशा परिस्थितीत समोरून येण्याऱ्या बसवर मामांची गाडी जाऊन जोरदार आदळली. एखाद्या स्फोटासारखा आवाज झाला. तो अपघात इतका भयंकर होता की त्यामुळे गाडी पूर्ण निकामी झाली. मी पटकन माझी गाडी बाजूला लावून त्यांच्या गाडीकडे धाव घेतली. गाडीच्या सर्व काचा फुटल्या होत्या. सुदैवाने जीवितहानी झाली नव्हती. सर्वांना बाहेर काढण्यासाठी गाडीचे दार तोडून काढावे लागले. कसेबसे आम्ही देहदानाचे सोपस्कार पूर्ण करून परत आलो. डोळ्यासमोर घडलेला तो अपघात आठवला तर आजही अंगावर शहारे येतात. काळाच्या त्या दुहेरी आघातातून स्वत: सावरत मामांनी आजीला आणि इतर नातेवाईकांनाही धीर दिला.

मला माझ्या आयुष्यात मामांकडून बरेच काही शिकायला मिळाले आजही शिकतो आहे. त्यांचे कलागुण आचरणात आणण्याचा प्रयत्न करत आहे. कुटुंबातील एक सदस्य म्हणून सर्वांनांच त्यांचा अभिमान वाटतो. या मनोगतात एवढेच सांगण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न!



मामा एक विद्यापीठ

इंजि.श्री. मनिष गुंजाळ
(इंजिनिअर)
इंजि.राजेंद्र पवार यांचे भाचे असून अहमदनगर येथील बहिण सौ. सुनिता गुंजाळ यांचा मोठा मुलगा आहे. सद्या तो बेंगलोर येथे बॅक्स्टर कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहे.

महाराष्ट्रातील सर्वात लहान वयातील मुख्य अभियंता, देशातल्या पहिल्या जलव्यवस्थापन अहवालाचे निर्माते व योगदानकर्ते या व अशा अनेक बिरूदावल्या मिरवणारे 'राजू मामा' आमच्यासाठी सदैव प्रेरणास्थान आहेत. आमची आई आम्हाला सदैव सांगायची की यश मिळवणे सोपे असते पण ते टिकवणे कठीण. ते टिकवता आले पाहिजे. मामांनी यश फक्त मिळवलेच नाही तर ते टिकवून पण दाखवले. आपल्या कारकिर्दीच्या सर्वोच्च पदापर्यंत फक्त आणि फक्त आपल्या बुध्दिमत्तेच्या व कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी पोहोचून दाखवले. शालेय व महाविद्यालयीन जीवनात त्यांनी प्रथम क्रमांक मिळवण्याबरोबरच निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा, संगीत, नाट्य, क्रीडा इ. क्षेत्रातही पारितोषिके पटकावली आहेत हे मला जेव्हा समजले

तेव्हा मी आश्चर्याने तोंडात बोटे घातली. ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहेत यात शंकाच नाही. अनेक विषयांमधले सखोल ज्ञान त्यांनी प्राप्त केले आहे. कुठल्याही विषयावर सर्व बाजूंनी विचार करून निर्णय घेण्याची त्यांची क्षमता अफलातून आहे. चिकाटी, झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, एकाग्रता, हजरजबाबीपणा, सहजता व साधेपणा, विनोद कौशल्य हे गुण त्यांनी सहज आत्मसात केल्यासारखे वाटतात. यातील १०% गुण जरी माझ्यात आले तरी मी नाव कमावले याची मला खात्री वाटते. माझी आजी मला नेहमी म्हणायची मित्र कंपनी असावी तर मामांसारखी! कुठल्या क्षेत्रात त्यांचे मित्र नाहीत असे नाही.प्रत्येक खात्यात त्यांचे मित्र आहेत.

माझी स्नातकोत्तर पदवीचा प्रकल्प मला त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याची संधी मिळाली. त्यातून त्यांचा आपण केलेले काम तितक्याच समर्पकपणे कसे सदर करता आले पाहिजे हा खूप महत्त्वाचा गुण त्यांच्याकडून मला शिकायला मिळाला. तसेच त्यांच्याबरोबर मुंबईत ५-६ महिने राहाण्याची जी संधी मिळाली याबाबत मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो. त्यांच्या सहवासात राहून त्यांचे निरीक्षण करून मी ज्या काही चार गोष्टी शिकलो व प्रगल्भ झालो. त्याचा मला दैनंदिन तसेच व्यावसायिक जीवनात खूप उपयोग होत आहे. यात तीळ मात्र शंका नाही. त्यांच्याकडून शिकायला मिळालेल्या गोष्टी मला इतर कुठल्याही शिक्षणापेक्षा लाख मोलाच्या वाटतात. मामा हे एक चालते फिरते विद्यापीठ आहे असे मी मानतो व त्यात मी कायम नापास झालेलो आहे. सरकारी नोकरीमध्ये स्वत: काम करण्याबरोबरच इतरांकडूनही काम करवून घेणे खूप जिकिरीचे काम असते. पण त्यांनी ज्याप्रमाणे प्रामाणिक काम करणाऱ्यांना कौतुकाची थाप दिली. त्याप्रमाणेच कामचुकार माणसांना सरळही केले आहे. त्यांच्या कामाच्या ठिकाणी असणारा दरारा मी खूपदा अनुभवला आहे. त्यावरूनच ते किती उत्तम नेतृत्व आहेत हे कळते.

व्यावसायिक जीवनात तसेच कौटुंबिक जीवनात आलेल्या संकटांना धैर्याने तोंड देत ते सचिव या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले ही आमच्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे. आमच्या कुटुंबात सुध्दा आम्हा सर्वांना वेळोवेळी मार्गदर्शन करताना त्यांनी स्वत:चे मत कधीच न लादता योग्य दिशेने विचार कसा करावा हे दाखवले. प्रत्येकाला निर्णय स्वातंत्र्य दिले. एक परिपूर्ण जीवन कसे असावे याचा मामा एक जीवंत दाखला आहेत. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व आमचे मामा आहेत यावर माझा कधी विश्वास बसत नाही. त्यांनी आतापर्यंत मिळवलेल्या यशाला सलाम!

सेवानिवृत्तीनंतरही परमेश्वर त्यांना असेच आरोग्यदायी व हसत खेळत ठेवो. त्यांचे शतक महोत्सव साजरा करण्याची आम्हाला संधी मिळो व त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होवो ही विठ्ठलचरणी प्रार्थना!



बहूआयामी व्यक्तिमत्त्व

श्री. प्राजक्ता मनिष गुंजाळ
(एम फार्मा)
इंजि.राजेंद्र पवार यांचा भाचा मनिष गुंजाळ यांच्या या पत्नी असून सौ. सुनिता गुंजाळ यांच्या सुनबाई आहेत. एका रुग्णालयात औषध विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

जशी सूर्याला साथ आहे किरणांची, पाण्याला साथ आहे वाऱ्याची, चंद्राला साथ आहे चांदण्यांची आणि निसर्गाला साथ आहे प्राण्यांची तशीच आम्हाला साथ आहे मामा तुमची......

आयुष्य खूप सुंदर आणि छोटं आहे. त्यात खूप कमी लोक आपले खास असतात. अशाच खास लोकांमध्ये एक तुम्हीसुध्दा आहात. मामा आपले व्यक्तिमत्व, नेतृत्व, दातृत्व, कर्तृत्व, मित्रत्व आणि वक्तृत्व या पंचतत्वांनी बनलेले आहे. तुमच्या या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे पैलू अन या सर्व पैलूतून जीवनातील प्रत्येक टप्प्यावर मिळणारे मार्गदर्शन हे लाखमोलाचे आहे. आपण आम्हाला वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करून आमच्या जीवनाला नवीन दिशाच दिली आहे. जीवन कसे जगावे हे तुम्हीच तर आम्हाला शिकवलंत.

मामा मला जेव्हा कळाले की तुम्ही सचिव आहात तेव्हा माझ्या मनात तुमच्याबद्दल आदरयुक्त भीति निर्माण झाली होती. पण जेव्हा पुण्याच्या घरी आपण भेटलो तेव्हा तुमच्या मनमोकळ्या आणि मनमिळावू गप्पांनी कधी आपलंस केलं ते कळलंच नाही. जी भीति निर्माण झाली होती ती गायब झाली मात्र आदर द्विगुणीत झाला. आपल्या मैत्रीपूर्ण मार्गदर्शनाने माझी अनामिक भीति कुठल्या कुठे पळाली व आपल्या विषयीचा आदर अजून वाढला. त्यावेळी मामा म्हणजे काय? हे नेमके मला समजले. मा म्हणजे मायेची थाप देणारे आणि मा म्हणजे मार्गदर्शन करणारे व्यक्तिमत्व आणि आमच्या आयुष्यात तुम्ही ते मार्गदर्शन करणारे व्यक्तिमत्व आहात. आज तुमचाच आदर्श घेऊन आम्ही तुमच्या मागोमाग चाललो आहोत. आणि पुढे देखील चालत राहू.

तुमच्या विषयी जितके लिहू तितिके कमीच आहे. मामा तुमचा आशीर्वाद नेहमी आमच्या सोबत असाच निरंतर असूद्या हीच विनंती.

आपल्याला सेवानिवृतीनंतरच्या आयुष्यात उत्तम दीर्घायु लोभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!



Encyclopaedia of problems

इंजि.केतक गुंजाळ
हे इंजि. राजेंद्र पवार
यांचा भाचा असून
अहमदनगर येथील बहिण
सुनीता गुंजाळ यांचा
द्वितीय पुत्र आहे.

Climbing to the top demands strength, whether it is to the top of Mount Everest or to the top of your career. – A.P.J. Abdul Kalam

This quote by one of my idol fits with my other idol i.e., Mr. Rajendra Pawar (Raju Mama) perfectly. He is one of the strongest person I have known and like Dr. Kalam. I am talking about mental strength here. Since my childhood days, Raju Mama has always been the person I look up to and the person I wish to be like. In our classes my teacher used to say that getting rank one is easy in exams but maintaining that rank is very difficult and I have experienced this. But whenever someone talks about achievements of Raju Mama, he/she always mentions that Rajendra Pawar was always the topper and he never left that rank number one to anyone else. Even in the professional field also he continues to achieve higher and higher

peaks every day. And this achievement is not based upon only the bookish knowledge. He can play violin/keyboard naturally and also has played many sports in his youthful days. He is also like an Encyclopaedia of everything that we need. Back when we did not have much internet or google to search, our source of knowledge was "Ask Raju Mama". He surely knew answers to our problems or at least guided us along the path to find the solution.

Being a civil engineer myself, I have a little bit idea about the field he works in and how hard it is to be CIVIL all the time. But I have always seen him listening rationally to the other person and then give logical responses to that person. Even while scolding someone I never heard any cuss word or foul language, but his scolding used to make direct impact wherever needed. He was or in fact is feared as much as is revered in our family for his scolding. His discipline and seriousness about work is known to everyone who has worked with him even for small time. Even after achieving such success like conquering the skys, he has always kept his feet grounded. I have seen him becoming a child while with babies and children. I have also seen him cutting the nails of our aajoba (Mr. Ramchandra Pawar) when he could have asked anyone else to do it. During the time my grandfather was severely ill and admitted in ICU, mama was by his bedside, almost all the time and performed all the chores. My ajji (Mrs. Sushila Pawar) always tells me that whenever mama was transferred to any new place, he always made sure to bring aajoba and ajji to that place and gave them a tour of nearby tourist places.

Having said so many good things and qualities about mama, I think there are some negative sides too. Mama is a workaholic person and he is always travelling to places for work. This may sound good but there are many times that he dozes off and starts snoring even while sitting or watching TV. Don't take me in any wrong way, he surely has maintained his health very well, even after working and travelling vigorously. But it is now time for his second

innings, and we all need him to guide us through our life with such vigour for a long time.

I am close to my mother, as she is my rock, my pillar of strength. But when my mother is also in need, she goes to her brother who is the strongest foundation and support system she can have. So, here is wishing my Raju mama a happy, peaceful and relaxed retired life…. Cheers!!!!



लोकप्रिय व्यक्तिमत्व

तेजस्वीनी कदम
ही इंजि. राजेंद्र पवार यांचा भाचा केतक गुंजाळ यांची वाग्दत वधू आहे. पवार कुटुंबियाशी तिचे आतापासूनच जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

मामाची व माझी पहिली भेट साधारणपणे दोन वर्षापूर्वी झाली होती. ती ओळख केतकने करुन दिली होती. केतक हा माझा वर्ग मित्र असून जेव्हापासून आम्ही एकत्र शिकत होतो तेव्हापासून केतक नेहमी आपले मामा इंजि. राजेंद्र पवार साहेब यांच्याविषयी सांगत असे. परंतु भेट होण्याचा योग दोन वर्षापूर्वी आला. मामांची शिस्त, साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी या विषयी तो अगदी भरभरुन बोलत असायचा. त्याच्या बोलण्याचा प्रत्यय जेव्हा प्रत्यक्ष भेटीअंती आला. त्यावेळी जे मामा केतकचे आदर्श आहेत ते मामा माझेही आदर्श व्हायला फारसा वेळ लागला नाही. मला आठवते की जेव्हा मी त्यांना पहिल्यांदा भेटले होते तेव्हा मला त्यांनी उकडलेल्या शेंगाचे पाकिट

भेट दिले होते. पहिल्या भेटीतच त्यांनी मला आपलेसे करुन टाकले होते. मामांच्या वागण्यावरुन आणि बोलण्यावरुन असे वारंवार वाटत होते की आमची खूप वर्षापासूनची ओळख आहे. एकादा माणूस एवढ्या उच्च पदावर कार्यरत असताना आपल्या माणसांसोबत किती मनमोकळा असू शकतो हे पाहून माझ्या मनातील त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणीत झाला. त्यांच्या बोलण्यातील भावच असा आहे की कोणताही व्यक्ति आपले विचार निसंकोच त्यांच्यासमोर मांडू शकतो. मामांनी आयुष्यभरामध्ये इतकी माणसं जोडली आहेत आणि ती टिकवूनही ठेवली आहेत की त्यांनी एकादा फोन केला तरी लोकांची रांग लागते त्यांच्यासाठी! एवढा आदर खचितच एकाद्या माणसाला मिळत असेल. मामांना ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तिमध्ये त्यांच्याबद्दलचा तेवढाच आदर दिसून येतो.

अगदी अलिकडच्या काळातील एक प्रसंग आठवतो. माझे वडील एकदा खूप आजारी असताना मामा आपल्या व्यस्त वेळापत्रकातून खास वेळ काढून त्यांना बघायला आल होते. त्यावेळी त्यांनी इतक्या आपुलकीने केलेली तब्येतीची चौकशी त्यांना फार समाधान देऊन गेली होती. माझ्या बहिणीच्या घटस्फोटाची केस कोर्टात चालू आहे असे कळताच त्यांनी आतापर्यंत काय काय झाले आणि आता त्यावर आपण काय काय करु शकतो या सर्व गोष्टीवर त्यांनी सविस्तर चर्चा केली. शक्य तितकी मदत आणि मोलाचे मार्गदर्शन केले.

जे जे लोक मामांच्या संपर्कात येतात ते मामांचे गुनगान केल्याशिवाय रहात नाहीत. कारण आहेतच तसे आमचे मामा! प्रत्येकांच्या मनामध्ये मामा घर केल्याशिवाय रहात नाहीत. असे त्यांचे व्यक्तिमत्वच आहे. त्यांच्या कार्याचा आणि प्रगतीचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. कामाच्या निमित्ताने

कितीही धावपळ असली तरी त्यांच्या चेहऱ्यावरचे ते निर्मळ हास्य कायम असते. ते कधीही कमी झालेले दिसत नाही. त्यांचे हे हास्य कायमस्वरुपी टिकून रहावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना आहे. सेवानिवृतीनंतरचे त्यांचे जीवन असेच त्यांच्या हास्याप्रमाणेच आणखी बहारदार व्हावे व जीवन आनंदी आणि सुखाचे व्हावे ही प्रार्थना.

Wish you a happy peaceful and healthy retire life Mama ! We all love you Mama !



आभाळ मायेनं भरलेला माणूस

प्रा.श्री. शेखर मोहिते
लाल बहद्दुर शास्त्री कॉलेज सातारा येथे सिनियर प्राध्यापक इंजि.राजेंद्र पवार यांचे मेव्हणे (पत्नीचे बंधू) असून ते सातारा येथे स्थायिक आहेत.

मानवी जीवनात मायेला, प्रेमाला अत्यंत महत्त्व आहे. माया आणि प्रेम हे शब्द दिसायला सारखेच असले तरी त्यामध्ये किंचितसा फरक आहे. हे आपण लक्षात घ्यायला हवे. प्रेम या शब्दात सर्व काही सामावले असले तरी माया शब्द वेड लावल्याशिवाय राहात नाही. माया म्हणजे आई आणि आईने केलेले प्रेम कौतुक म्हणजे माया. ज्याच्यामध्ये स्वार्थ नसतो. मतलब नसतो, असतो तो साधाभोळा मायेचा, जिव्हाळ्याचा स्पर्श! हाच स्पर्श प्रत्येकाला हवाहवासा वाटत असतो. प्रत्येकाला त्याची ओढ असते. त्याच्याविषयी एक प्रकारची आसक्ती असते ती माया ते प्रेम देणारा कोणीतरी एक अवलीया असतो. तोच प्रत्येकाला आपला वाटू लागतो. असा प्रत्येकाला हवासा वाटणारा माणूस म्हणजेच आभाळ मायेचा माणूस

म्हणून ज्यांचा उल्लेख केला तर अतिशयोक्ती ठरणार नाही असे ते म्हणजे आमचे दाजी श्री. राजेंद्र पवार हे होत.

माणसाचा जन्म कोठे झाला यावर त्याचे व्यक्तिमत्व अवलंबून नसते. ते त्यांच्यावर होणाऱ्या संस्कारावर अवलंबून असते. आपल्या आई वडिलांच्या छायेखाली आमच्या दाजींची जडण घडण झालेली असल्याने अनेक संस्काराचे पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात दिसून येतात. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी–येडशी सारख्या खेड्यात त्यांचा जन्म सामान्य कुटुंबात झाला. घरची परिस्थिती बेताचीच होती. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा श्री गणेशा गावातच झाला व प्राथमिक शिक्षण गावातच झाले तर पुढील शिक्षणासाठी त्यांना सोलापूर व कराड येथे जावे लागले. ते जरी शिक्षणाच्या निमित्ताने खेड्यातून आले तरी मातीतले संस्कार कधी विसरले नाहीत. गावाच्या मातीशी जोडलेली नाळ कायम टिकवून ठेवण्याचे काम करीत आहेत. माणसाकडे माणूस म्हणून पाहत मानवतेच्या मूल्यांचा अमोल ठेवा त्यांनी जतन करून ठेवला आहे. त्यामुळेच आज सेवा निवृत्त होत असताना जमलेला समुदाय याची साक्ष देतो आहे. अनेक खात्यांचे सचिव, मंत्रालयातील अनेक सहकारी, एका सामान्य अधिकाऱ्याच्या सेवा निवृत्तीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमास असलेली उपस्थिती फार बोलकी असते.

श्री. राजेंद्र हे घरात थोरले असल्याने घराची जबाबदारी लवकरच त्यांच्यावर येऊन पडली. घरची परिस्थिती नाजूक होती. परिस्थितीचा सामना करीत करीत त्यांनी कराडमध्ये इंजिनियरीगपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढचे शिक्षण पुणे येथे घेतले. आज ते महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त होत आहेत.

माणूस हाच माणसाच्या दुःखाला कारणीभूत असतो. असे ते नेहमी म्हणत. माणसानं माणसांशी माणसांसारखं वर्तन ठेवलं तर मानवी जीवनात

दु:ख निर्माण होण्याची वेळच येणार नाही. माणसातल्या चांगुलपणावर, त्याच्यातल्या संवेदनेवर दाजींचा फार विश्वास आहे. आपल्या वर्तनाने किंवा आपल्या साध्या बोलण्यानेही कोणाचे मन दुखावले जाणार नाही. याची काळजी ते पदोपदी घेत असत. माणसांवर मनापासून प्रेम करत आयुष्यभर इतरांचा विचार करण्याचे कौशल्य दाजींच्यात उत्पन्न झाले होते ते माणसांवरच्या मायेपोटीच. दाजी नात्यातल्या माणसांवर जितके प्रेम करतात त्यापेक्षा किती तरी पटीने ते सर्वच प्राणीमात्रावरही प्रेम करताना दिसतात.

आयुष्याच्या वाटेवरून चालत असताना दाजींच्या आयुष्यातही अनेक संकटे आली. वादळं आली होती. परंतु या संकटांना, वादळांना न घाबरता खंबीरपणाने सामोरे जाण्याचे धैर्य दाजींच्यात आहे. एकदा वाळवंटात ताट मानेने फिरणाऱ्या शहामृगाला कोणीतरी विचारले होते की या वाळंवटातील वादळांच्या तडाक्यातून तू स्वत: कसा सावरतो ? त्यावेळी शहामृगानं दिलेले उत्तर खूप छान आहे. शहामृग म्हणतो येथे सारखीच वादळांची मालिका सुरू असते. त्यातून वाचायचे असेल तर इथल्या जमिनीला घट्ट चिकटून राहायला हवे. मी तेच करतो. येथे जेव्हा वादळ येते तेव्हा मी मातीत चोच खुपसून बसतो. थोड्यावेळाने वादळ निघून गेले की मी ताठमानेने, उजळ माथ्याने सर्वत्र फिरत असतो. यातून हेच कळते की माणसाच्या आयुष्यातही संकटाची वादळे अशीच येत असतात आणि निघून जात असतात. त्या संकटाचा सामना माणसाने धैर्याने केला पाहिजे. या कथेपासून बोध घेत आमच्या दाजींनी अनेक संकटावर मात करीत सेवानिवृत्तीचे यश गाठले आहे. या त्यांच्या वृत्तीबाबत सांगताना मला म्हणावे वाटते की,

छळून घ्या संकटांनो संधी पुन्हा मिळणार नाही !
कर्पूराचा माझा देह जळून पुन्हा जळणार नाही !

अशा प्रकारचा ठाम विश्वास बाळगीत दाजींनी संकटावर मात केली. आपल्या

भावंडाच्या विषयी त्यांच्या मनात नेहमीच सौहार्दाची, मायेची, प्रेमाची भावना असे. लहान भावंडाचे शिक्षण त्यांचा वैद्यकीय खर्च त्यांची लग्ने या सर्वाची जबाबदारी दाजींनी अगदी चोखपणे पार पाडली आहे. नोकरीला लागल्यानंतर आपले लग्न उरकण्याआधी दाजींनी आपल्या भावंडांच्या लग्नांचा विचार केला. अगदी सुयोग्य अशी स्थळे पाहून दोन बहिणींची लग्ने लावून दिली आणि मग दाजींनी आपल्या लग्नाचा विचार केला. हा त्यांचा विचार किंवा कृती त्यांची नैतिकता स्पष्ट करणारी आहे.

आपली जबाबदारी त्यांनी कधीही टाळली नाही किंवा तसा विचारही केला नाही. कष्टावर त्यांची अढळ श्रद्धा आहे. कोणतेही काम करताना त्यांनी कोणतीही लाज बाळगली नाही. अभ्यास असो, शेती असो, पाटबंधारे खात्यात सचिव पदावरती काम करणे असो. त्यांनी आपल्या कामाला देव मानून त्यात झोकून दिले व आपल्या कर्तृत्त्वाचा आणि यशाचा ठसा कामाच्या रूपाने उमटविला. अशा दाजींच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव आमच्या सर्व नातेवाईकांच्या कुटुंबावर पडलेला आहे. दाजींच्या एकूण व्यक्तिमत्वापासून माझ्या मुलाने प्रेरणा घेतली. रात्रंदिवस अभ्यास केला आणि आरटीओ ऑफिसरपर्यंत मजल मारली. दाजींच्याच संस्कार प्रेरणेने आपण हे पद मिळवले असल्याचे माझा मुलगा ठामपणे सांगतो आहे. एखाद्या कार्यक्रमानिमित्त किंवा सणावारनिमित्त सगळे नातेवाईक एकत्र आले की माझे दाजी पवारसाहेब कष्टाचं महत्त्व सांगताना म्हणत असत की माणसाला मोठं व्हायचे असेल तर त्याने श्रमाची सवय बाळगायला हवीच. माणसाचं काम माणसाला मोठं करतं. माणूस कामाला मोठा करीत नाही. त्यासाठी माणसानं मोठे होण्याचे स्वप्न पाहताना कष्टाचीही तयारी ठेवायला हवी. कष्ट केल्याने रात्रीची सुखाची झोप मिळते हे दाजी पवारसाहेब सांगत असत. त्यावरून मला कुठेतरी वाचलेल्या कवितेच्या ओळी आठवतात त्या पुढीलप्रमाणे –

रात्री शांत झोप येणं
सहज सोपी गोष्ट नाही....
त्यासाठी संपूर्ण दिवस
प्रामाणिक असावं लागतं....

दाजी पवारसाहेबांचे असले विचार ऐकायला लागले की मी कधी त्यांच्यात गुंतून जायचो ते मलाही कळायचे नाही. दाजी पवारसाहेब जसे शांत होते तितकेच ते शिस्तीचे भोक्ते आहेत. शिस्तप्रियता हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा गुण सांगता येईल. सकाळी वेळेत उठणे, वेळेत सगळ्या गोष्टी उरकणे यावर त्यांची भिस्त असे. आपल्या घरातील इतरांही त्यांनी आपल्या विचारांनी आणि वाणीच्या जादूने शिस्तप्रिय बनवले आहे. दाजी पवारसाहेब यांचा शिस्तीचा हट्ट कौतुकास्पद असाच आहे. दुसऱ्यांच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा मूळचा स्वभाव आहे. माणसं स्वता:साठी जगणारी खूप असू शकतात. मात्र इतरांसाठी जगणारी माणसं फार कमी असलेली पाहायला मिळतात. आमचे दाजी स्वत:साठी फार कमी जगले. इतरांसाठी मात्र त्यांनी आपलं आयुष्य खर्ची घातलं. संकटात असणाऱ्यांना मदत करीत त्यांच्या दु:खात सहभागी झाले. संकटात सापडलेले लोक कधी नातेवाईक असत तर कधी मित्र असत. ते कोणीही असो त्यांचे दु:ख समजून घेत त्यांच्या दु:खात दाजी पवारसाहेब सामील होत असत. सर्वांच्या अडचणीचे निराकरण करण्याचा त्यांचा स्वभाव आपणास पाहायला मिळतो.

दाजी पवारसाहेब पाटबंधारे विभागात कळंब जि. पुणे येथे शासकीय सेवेत हजर झाले. तेथून पुणे, सातारा, चांदोली, नारायणगाव, बुलढाणा, ठाणे, मुंबई या ठिकाणी शासकीय नोकरी प्रामाणिकपणे केली. ते जिथे जात तिथे आपलेपणाची भावना तिथल्या लोकांच्यात निर्माण करण्यात त्यांना यश आले. आपल्या शांत मनमिळावू स्वभावाने त्यांनी लोकांची मने जिंकली

आहेत. आपल्या कामातून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. कामाशी प्रामाणिक राहात सामाजिक बांधिलकीही त्यांनी सांभाळली आहे. याचा परिणाम म्हणूनच त्यांना जलसंपदा विभाग व विविध क्षेत्रातून मौलिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

पर दु:ख स्वत:चे मानणारे आमचे दाजी पवारसाहेब एक मानवातावादी व्यक्तिमत्व आहेत. आमची आई म्हणजेच त्यांच्या सासूबाई या आजारी असताना आपण जावई आहोत आणि त्या आपल्या सासूबाई आहेत, असे मनात न आणता आपली आईच आहे असे समजून आजारपणात सासूची सेवा करणारे दाजी पवारसाहेब आमचे आदर्श आहेत. दुसऱ्याचे दु:ख आपले मानून ते सोसण्याची त्यांची वृत्ती भावणारी आहे. माझी मुलगी निकिता सातारा येथे खूप आजारी पडली. उपवार सुरू होते. परंतु दिवसेंदिवस आजार बळावत होता. अशावेळी तिला उपचारसाठी पुणे येथे हलविण्याचे ठरले. त्याप्रमाणे आम्ही हालचाल केली. निकिताला घेऊन पुणे येथे निघालो. त्यावेळी दाजी पुण्यात होते. ते हॉस्पिलमध्ये जाऊन निकितावर आल्या आल्या उपचार चालू ठेवण्यासाठी डॉक्टरांची फौज उभी करून आमची वाट पाहात होते. इतर डॉक्टरांशी बोलून फोनवरून सल्ला घेत होते. सर्वत्र चौकशी करीत होते. त्यांचे प्रयत्न मनापासून सुरू होते. पण दुर्दैवानं निकिता वाचू शकली नाही. हा प्रसंग आमच्या स्मरणातून कधीही जाणार नाही. सर्वांच्यावर आपलेपणाने प्रेम करणारे दाजी पवारसाहेब आमच्या वाट्याला आले आहेत हे आमचे भाग्यच आहे.

श्री. राजेंद्र पवारसाहेब आमचे दाजी नोकरीत अगदी वरिष्ठ पदापर्यंत म्हणजे सचिव पदापर्यंत पोहचले आहेत. तरीही त्यांच्या वागण्यात राहण्यात असलेला साधेपणा, विचारातील उच्चपणा तोच असून तो आमच्या मनात अधिक ठासून बसला आहे.

पवारसाहेब हे विज्ञानवादी आहेत. तसेच संत साहित्यातील अध्यात्माची ओढही त्यांना आहे. पवारसाहेबांच्या वडीलांचे निधन झाल्यानंतर पारंपरिक पद्धतीला विरोध करीत त्यांनी वडीलांचा मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयाला दान दिला. एक नवा आदर्श आमच्या सर्वाच्या पुढे त्यांनी ठेवला. स्वत:ला केवळ आधुनिक म्हणवून न घेता ते तसे वागले आहेत. जसा त्यांचा विचार असतो तसे वर्तन ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पदच असतो. असे सर्वाना आपले वाटणारे सर्वांवर प्रेम करणारे सर्वाना आदर्श वाटणारे आपल्या कृतीतून इतरांना प्रेरणा देणारे आभाळ मायेचे रूप असलेले पती माझ्या बहिणीला मिळाले आहेत याचा मला अभिमान आहे. या पवार कुटुंबातील सर्वाना उत्तम आरोग्य लाभो! त्यांना सुख समृद्धी लाभो! अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो.



कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व

राजश्री अजित मोहिते
एरंडवणे, पुणे
इंजि. राजेंद्र पवार यांचे मेहूणे अजित मोहिते यांच्या पत्नी आहेत. पवार कुटुंबियाशी जवळचे नाते आहे.

श्री. पवार साहेब यांची माझ्या नणंदबाई सौ. संयोगिता यांच्यासाठी माझे सासरे यांनीच निवड केली होती. माझे सासरे कै पांडूरंगराव मोहिते हे हयात असतानाच त्यांनी श्री. पवार साहेब यांचे स्थळ पाहिले होते. म्हणतात ना सोनं पारखण्यासाठी सोनार तर रत्ने पारखण्यासाठी रत्नपारखीचीच आवश्यकता असते. अशा प्रकारे काही दिवसांनंतर या दोघांचा विवाह संपन्न झाला आणि आमच्या मोहिते परिवारांच्या मुकुटामध्ये श्री. पवार साहेब यांच्या रूपाने एक हिरा कोंदणामध्ये बसविला गेला.

मी नंतर दोन वर्षांनी लग्न होऊन मोहिते परिवारामध्ये आले. साहेबांना मी दाजी म्हणते. जेव्हापासून मी त्यांना ओळखते ते म्हणजे अतिशय उत्साही, कष्टाळू, हरहुन्नरी, हुशार, सर्वांना आपलसं करून घेणारे लहान - मोठा असा

भेद न करता सर्वांना संभाळून घेणारे अतिशय कुंटुब वत्सल असे विविध पैलू असलेले व्यक्तिमत्व आहेत. आमचे सर्व नातेवाईक व अनेक कुंटुबातील सर्व लोकांसमोरचे एक आदर्श व्यक्तिमत्व! साहेबांबद्दल, त्यांच्या गुणांबद्दल, हुशारी बद्दल मी बोलते ही माझी योग्यता कमीच. परंतु जेवढे मी त्यांना जवळून पाहिले, अनुभवले आहे ते सांगण्याचा माझा छोटासा प्रयत्न.

दाजी जबाबदारी आणि कर्तव्य पार पाडताना नेहमीच पुढे राहिलेत. घरातील कोणत्याही निर्णयात किंवा क्रिटीकल परिस्थिती असो आम्हाला त्यांचे नेहमीच योग्य मार्गदर्शन व आधार मिळाला आहे. मला या ठिकाणी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो. माझ्या मिस्टरांच्या (अजित मोहिते) आजारपणामध्ये दाजींनी मला वेळोवेळी दिलेला आधार माझ्या मोठ्या भावाप्रमाणे ते सतत माझ्या पाठीशी उभे राहिले. त्यावेळी मला त्यांचा खूप खूप आधार होता. जेव्हा जेव्हा काही अडचण, क्रिटीकल परिस्थिती येई तेव्हा तेव्हा मी पहिला फोन दाजींना करायचे. अगदी यांच्या शेवटच्या वेळी रात्री अडीच वाजता मी त्यांना फोन केला. दाजी तुम्ही लवकर इकडे या. डॉक्टरांची काही तरी गडबड चालू आहे. मला खुप भीति वाटतेय.

दाजी खरंच तुमच्या शब्दांनी मला खूप धीर वाटायचा तेव्हा आणि आजही.....

दाजी खूप लहान वयात तुम्ही यशाची अनेक शिखरे गाठलीत. तुमचे कर्तृत्व, हुशारी, यश यांचे मी वर्णन करावे यासाठी माझे शब्द अपुरेच. एवढचं वाटत की तुमचे हे यश आणि कर्तृत्व पहायला पप्पा (सासरे) असायला हवे होते. कारण की अष्टपैलू हिऱ्याचे मूल्य एका रत्नपारखी पेक्षा जास्त कोणास समजणार? कोणत्याही नवयुवकाला लाजवेल असा तुमचा कामाचा अवाका, नेटकेपणा, नियोजनबध्दता, नवनिर्मिती, बुध्दीमत्ताही तुमच्या यशस्वीतेची सचोटी आहे. आपणाकडून यापुढेही उत्तमोत्तम कामगिरी पार पडो, आपल्या

बुध्दीमत्तेचा उपयोग समाजाने समाजविकासासाठी करून घ्यावा. आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले जावो. परमेश्वर आपणास उदंड, आरोग्यमय, समाधानी व सुंदर आयुष्य देवो हीच प्रार्थना.

जे मनापासून भावले तेच कागदावर उतरविले काही कमी जास्त झाले असल्यास क्षमस्व!



माझे प्रेरणास्थान

इंजि. अभिजीत शिंदे
किसनवीर साखर कारखान्यात असिस्टंट सिव्हिल इंजि.म्हणून कार्यरत आहेत. इंजि. राजेंद्र पवार हे त्यांच्या आत्याचे जावई आहेत.

मा. राजेंद्र पवार साहेब यांच्या बद्दल काही लिहिण्या एवढा मी मोठा नाही. परंतु त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन मी माझे करियर डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनीयर झालो. नातलग असल्याने त्यांना फार जवळून पाहता आले. अत्यंत मनमिळावू, स्वाभिमानी, थोरामोठयांना त्यांच्या मानाप्रमाणे वागवणे, संयम, तेवढाच हजरजबाबीपणा, उत्तम निर्णय क्षमता, पदाचा कोणताही अहमपणा नाही. जर मोठा भाऊ कसा असावा तर साहेबांसारखाच असावा. माझ्यासाठी ते मला मोठ्या भावासारखेच होते. साधी राहणी व उच्च विचारसरणी!

सातारा येथे कार्यकारी अभियंता या पदावर असताना मी त्यांच्या जास्त संपर्कात आलो. एकदा त्यांच्या बरोबर सांगली जिल्ह्यातील कितीतरी हेक्टर जमीनी पाणी साठून राहिल्यामुळे क्षार पड झाल्या होत्या. त्याकरीता

साईटवर गरजेनुसार चाऱ्या काढून त्यात होल पाडून सिमेंट पाईप टाकून त्यावर जाड वाळूचा चाळ टाकून त्यावर माती टाकून योग्य प्रकारे पाण्याचा निचरा करून सर्व जमिनी लागवडीखाली आणल्या. त्या एका साईटवर जाण्याने मला मी कार्यरत असलेल्या कारखान्यावर साधारण ५० एकर जमीन कॅनालखाली असल्याने कायम क्षारपड असायची. मी मा. चेअरमन मदनदादा भोसले सो. यांना वरील साहेबांच्या कामाचा संदर्भ देऊन तसा प्रयोग आपल्या कारखान्यावर करावा असे सांगितले. त्यास त्यांनीही परवानगी दिली. साहेबांना ते चांगले ओळखतात. त्यानुसार कारखान्याची ५० ते ६० एकर जमीन नापिक जमीन ऊस लागवडी करीता उपलब्ध झाली व सर्व पाणी एका ठिकाणी शेततळे करून मत्स पालन चालू आहे. अशाप्रकारे बरेच खाजगी शेतकऱ्यांच्या शेतात सुध्दा अशा प्रकारे यशस्वी प्रयोग केले आहेत. या सगळ्याची प्रेरणा तसेच सर्व श्रेय पवारसाहेबांना देतो. अजूनही काही काळ त्यांच्या संपर्कात असतो तर माझे करियर आता आहे त्यापेक्षा निश्चितच चांगले झाले असते.

कार्यकारी अभियंता ते सचिव पदापर्यंत त्यांनी केलेली वाटचाल ही त्यांनी स्वकर्त्तृत्वावर मिळवलेले यश असून ते यश सर्वांनाच प्रेरणादायी आहे. मला साहेबांचा सार्थ अभिमान आहे व माझ्यासाठी ते एक प्रेरणा स्थान आहेत. यापुढेही त्यांच्या जीवनात अशाच प्रकारे उन्नती होवो! त्या करीता त्यांना आई तुळजा भवानी उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो ही प्रार्थना.

साहेबांबद्दल माझे मनोगत सांगण्याची संधी दिल्याबद्दल विजयकुमारजी मोरे मी आपला आभारी आहे.

सन्माननीय व्यक्ती



अमृत मंथन करणारा अभियंता

श्री. अनिल तात्या मेहेर (कृषिरत्न) चेअरमन कृषि विज्ञान केंद्र नारायणगाव (पुणे) इंजि.राजेंद्र पवार यांच्या नोकरीतील सुरुवातीच्या काळलातील जेष्ठ स्नेही तसेच मार्गदर्शक मित्रही आहेत. गेल्या ३५ वर्षापासूनचा स्नेह अद्यापही कायम आहे.

उत्तर पुणे जिल्हयातील नारायणगाव परिसर हा एक महत्वाचा आणि पुणे-नाशिक हायवे वरील शेतीशी निगडीत व्यवसायावर आधारीत भाग म्हणून ओळखला जातो.

जुन्नर - आंबेगाव तालुक्यात पश्चिम पट्टयामध्ये डिंभे, वडज, पिंपळगाव जोगा, येडगाव, माणिकडोह, चिल्हेवाडी ही धरणे बांधली गेली. त्यावेळी धरणे तर झाली होती. परंतु म्हणावे असे पाणी नारायणगाव परिसर तसेच जुन्नर, शिरूर, नगर पट्टयात फिरले नव्हते. त्यामुळे बागायती क्षेत्राचा विकास झाला नव्हता. त्यावेळी श्री. राजेंद्र पवार यांनी कार्यकारी अभियंता म्हणून पदभार स्विकारला. श्री. राजेंद्र पवार यांच्या बाबतीत सांगायचे झाले तर शेतकऱ्यांशी नाळ जोडलेला माणूस, कुशल नेतृत्व, तळमळीने काम

करणारा अधिकारी या गुणांची त्यांच्या पहिल्याच भेटीत मला कल्पना आली.

श्री. राजेंद्र पवार यांनी कार्यकारी अभियंता या पदाचा पदभार स्विकारला तेव्हा डिंभा डावा कालव्याची बरीचशी कामे ठप्प पडली होती. त्यावेळी त्यांनी या परिसराची अत्यंत बारकाईने माहिती घेतली. त्यासाठी त्यांची माझ्याबरोबरच इतर जाणकार शेतकऱ्यांशी महत्वपूर्ण चर्चा घडवून आणून आपल्याला ही कामे कशा पध्दतीने पुढे नेता येतील यावर विचारमंथन केले. यामध्ये महत्वाचा मुद्दा सांगायचा झाला तर काही ठिकाणी भूसंपादन करण्यासाठी शेतकऱ्यांचा विरोध होत होता. अगदी उमेदीने साहेबांना ही ठप्प पडलेली कामे पुढे न्यायची होती. यासाठी त्यांनी जागतिक बँकेमार्फत निधी उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा केला होता. उपलब्ध होणाऱ्या निधीची माहिती शेतकऱ्यांना दिली. मंजुरीसाठी सर्व पत्रव्यवहार पाटबंधारे खात्याकडे केला. नंतर डिंभा डावा कालवा गतीने सुरू करण्यासाठी मोठे योगदान दिले तसेच यासाठी महसूल खात्याकडे त्यांनी वेगाने पाठपुरावा केला. त्यावेळी कालवा खोदाईसाठी शासनाकडे उपलब्ध निधी नसल्यामुळे रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करण्याचे धोरण शासनाने आखले होते. तसेच काही शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा निषेधही मोठया प्रमाणावर पुढे येत होता. हा विषय मात्र त्यांनी अत्यंत सचोटीने हाताळला. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन आपल्या या कालव्याच्या माध्यमातून चांगला विकास होऊ शकतो हे मनावर बिंबवले आणि कालव्याच्या कामाला अखेरीस सुरूवात त्यांच्या विशेष प्रयत्नातून झाली.

परंतु कालव्याबरोबर शेतकऱ्यांच्या शेती विषयासाठी पोटचाऱ्या, पादचारी पूल, मोठे पूल बांधणे तितकेच गरजेचे होते. त्यासाठी साहेबांनी यामध्ये अतिशय महत्वपूर्ण योगदान दिले कारण त्यांना हे नवीन होत की जरी कालवा झाला तरी भविष्यात दळणवळणच्या संदर्भामध्ये मोठ्या समस्या

उभ्या राहू शकतात. त्यासाठी शेतकरीभिमुख असलेले कार्यकारी अभियंता यांनी शासनाचे पादचारी पूल, मोठे पूल इ.ची कामे करण्यासाठी २.५ कि.मी. मध्ये पूल नसावा असा नियम होता. परंतु शेतकऱ्यांची मशागतीची कामे, उत्पादित शेतमाल बाहेर काढण्यासाठी व इतर दळणवळणाशी सोयीस्कर अशी पुलांची संरचना केली गेली. त्यासाठी त्यांनी आवश्यकतेनुसार बदल केला व शेतकरीभिमुख दळणवळणाच्या सोयी पूल बांधून उपलब्ध करून दिल्या. यासाठी त्यांनी शासन दरबारी मोठ्या प्रमाणावर पाठपुरावा केला व शेवटी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात ते यशस्वी ठरले.

यामध्ये पोटचाऱ्या केल्यामुळे पाणी फिरायला लागले होते. शासनाच्या माध्यमातून काम घेत असताना त्यांनी गुणवत्तेच्या कामावरही लक्ष केंद्रीत केले होते. त्याचा फायदा आज दिसून येत आहे. साहेबांच्या कारर्किदीत झालेल्या चांगल्या उच्च प्रतीच्या कामामुळे खूप कमी प्रमाणात लिकेज गळती दिसून येत आहे. त्यांनी छोटे बंधारे हे अभ्यास करून मोठ्या बंधाऱ्यांकडे वळविले. त्यामुळे निश्चितच पाणी साठवण क्षमता वाढली व जमिनीमधील पाण्याचा स्त्रोत उपलब्ध झाला. या एकंदरीत कामाचा फायदा आजही या परिसरातील शेतकऱ्यांना २० वर्षानंतरही झालेला दिसून येत आहे. मी ग्रामपंचायत वारूळवाडीचा सरपंच असताना डिंभा डावा कालव्यावर खालच्या बाजूने लाभक्षेत्रात येत असल्यामुळे कुठल्याही प्रकारचे मोठे बंधारे घालता येत नव्हते. त्यासाठी आम्ही तत्कालिन आयुक्त यांच्याशी बोलणी केली की लाभक्षेत्रामधील पावसाचे पाणी अडवून जिरवायचे काम करणार असल्याचे सांगितल्यामुळे त्यावेळी त्या कामाला मंजुरी देण्यात आली. तसेच उचल पाणी परवाना देण्यासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना प्राधान्याने परवान्यासाठीचा अग्रक्रम देण्यात आला.

त्याचप्रमाणे नारायणगाव, वारूळवाडी परिसराचे नागरीकरण

होण्यासाठी डिंभा डाव्या कालव्यामुळे मोठी मदत झाली. तसेच लाभक्षेत्रात पाणी फिरल्यामुळे ऊस क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. कारखानदारी वाढली परिणामी रोजगारही उपलब्ध झाला. पीकाची समृध्दी, त्यामुळे शेतकऱ्यांची समृध्दी झाली. यामध्ये कार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र पवार यांचा सिंहाचा वाटा आहे. श्री.राजेंद्र पवार यांना या तालुक्यातील एक नागरिक म्हणून काम पाहण्याचा जवळून योग आला. पाण्याचे योग्य प्रमाणात नियोजन साहेबांच्या माध्यमातून झाले होते.

एकंदरीतच उत्तर पुणे जिल्ह्यातील जी गावे दुष्काळामध्ये होरपळून निघत होती त्या ठिकाणी कार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या अथक प्रयत्नातून पाण्याचे सर्वांगिण क्षेत्र उपलब्ध झाले. त्यामुळेच १९९० च्या दशकात झालेल्या कामामुळे आज शेतकरी बारमाही पिके घेऊ लागला आहे. तसेच या भागामध्ये जोडधंद्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक नफा मोठ्या प्रमाणात मिळू लागला आहे. शेतकरी योग्य प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे आज द्राक्ष, डाळिंब, केळी, टोमॅटो व इतर फळबागा करू लागला आहे. यातूनच या पिकांखाली क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यामधूनच द्राक्ष शेतीमध्ये सद्यस्थितीत द्राक्ष बागायदार द्राक्षाची निर्यात करू लागले आहेत. यातूनच आर्थिक सुबत्ता वाढली.

एकंदरीतच साधी राहणीमान, उच्च विचारसरणी असलेला अधिकारी, कुशल नेतृत्व, शेतकऱ्यांशी नाळ जुळलेला व तळमळीने काम करणारा अधिकारी अशी त्यांची ओळख आहे.

अमृतरूपी पाण्याविना जीव होतो बेजार ।
जगण्याला, श्वासाला पण पाण्याचा आधार ।।
पाणी देते प्रत्येक जीवास जीवदान ।
करूया पाणी जतन करण्याचे सर्वश्रेष्ठ काम ।।

वरील उक्तीप्रमाणे पाणी संवर्धनाचे साहेबांचे कार्य अविरत चालू आहे. या कार्याचा गौरव म्हणूनच साहेबांच्या कारर्किदीवर गौरवग्रंथ प्रकाशित होत आहे. त्याचा मला व्यक्तीश: आनंद होत आहे. त्यासाठी त्यांना त्यांच्या कार्याबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा! त्याच प्रमाणे आपल्या संपुर्ण कारकिर्दीत त्यांनी अशाच प्रकारचे लोकोपयोगी काम केले आहे. शेतकऱ्यांना उपयुक्त आणि लोकांना पिण्यासाठीही पाणी म्हणजे जीवन देऊन आपल्या शासकीय सेवेतून ते सेवानिवृत्त होत आहेत. जे पेरले तेच उगवते असे म्हणतात. त्यांनी आपल्या आयुष्यात खूप चांगली कामे केली आहेत. त्यामुळे त्यांचेही सेवा निवृतीनंतरचे आयुष्य असेच सुखाचे आणि समृध्दीचे जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना.



प्रेरणादायी जीवनालेख

डॉ. रमेश दापके
(प्राचार्य) उस्मानाबाद
प्राध्यापक दापके हे इंजि. राजेंद्र पवार यांचे मूळ गाव तळेगाव ता.अहमदपूर जि.लातूर येथील मूळ रहिवासी असून ते पवार कुटुंबाचे निकटचे स्नेही आहेत. राजेंद्र पवार यांचे वडील आर. जे.पवार यांचे ते मित्रही होते.

शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील एक क्रियाशिल कार्यकर्ते श्री. व्ही. जी. पवार आणि पत्रकारिता क्षेत्रातील व्यक्तिमत्व श्री विजयकुमार मोरे यांचा फोन आला आणि सांगितले की जलसंपदा (कडा) विभागाचे (महाराष्ट्र राज्य) सचिव श्री राजेंद्र रामचंद्र पवार हे सेवा निवृत्त होत असून त्यांच्या जीवन कार्यावर एक गौरवग्रंथ काढला जात असून त्या कुटुंबाशी आपले स्नेहाचे संबंध राहिले आहेत. श्री. राजेंद्र पवार यांना आपण बालपणापासून ओळखता. त्याकरिता आपला लेख हवाच अशी आग्रही मागणी केली आणि पवार कुटूंबियांचा ७०-८० वर्षापूर्वीचा काही ऐकलेला व काही प्रत्यक्ष पाहिलेला इतिहास आठवायला लागला.

श्री. राजेंद्र पवार व आमचे मूळ गाव एकच. तळेगाव ता. अहमदपूर

जि. लातूर! आज गावाचा फारसा संबंध राहिलेला नसला तरी श्री. पवार साहेबांच्या वडिलांना गावाचे खूप मोठे आकर्षण होते. निजाम राजवटीतल्या एका खेड्यात प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असताना श्री. रामचंद्र पवार यांना शिक्षण हे विकासाचे, प्रगतीचे साधन आहे आणि आपण ते घेतलेच पाहिजे असे त्यांच्या बालपणी वाटले. बार्शीला जगदाळे मामांनी शिक्षणाची व वसतीगृहाची सोय केल्याची बातमी ऐकून पंढरपूरकडे वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांसोबत बार्शीला पोहचले. जगदाळे मामांच्या सोबत ६ मुलं राहात होती. त्यातील एक त्यांचा भाचा होता. तो त्यांना मामा म्हणायचा म्हणून बाकीची मुलेही त्यांना मामा म्हणू लागले.

जगदाळे मामांच्या पहिल्या सहा विद्यार्थ्यांमध्ये श्री. रामचंद्र पवार हे एक विद्यार्थी होते. हा काळ स्वातंत्र्यपूर्वीचा होता. त्यांच्या काळात शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळात त्यांची १० वी झाली व मामांनी त्यांना येडशी (ता. बार्शी) आज ता. उस्मानाबाद येथे वसतीगृह प्रमुख म्हणून नेमले. तिथेच जनता विद्यालयात आयुष्यभर शिक्षक म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे जगदाळे मामांच्या शिस्तीत काम केले. आपली देखील शैक्षणिक पात्रता वाढवली. जवळपास ४००-५०० मुलांचे वसतीगृह काटेकोर व काटकसरीने चालवले. राजेंद्र पवार साहेबांच्या आई-वडिलांचे वास्तव्य विद्यार्थ्यासोबत वसतीगृहातच होते. आई-वडील दोघेही शिक्षकी पेशा अत्यंत कर्तव्यशिलतेच्या भावनेने पार पाडत होते. वडील व्यासंगी आणि चिंतनशिल व्यक्तिमत्वाचे होते. शिक्षणाच्या सामर्थ्यावर आणि पावित्र्यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. ज्ञान म्हणजे व्यक्तिच्या जीवनाचा पाया समजत होते तर शैक्षणिक गुणवत्ता ही सर्व प्रकारच्या प्रगतीचे साधन असते असा त्यांचा सतत दावा असे. मी उस्मानाबादला आर. पी. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीला लागलो. त्यांना खूप आनंद झाला. आपल्या बालमित्राचा मुलगा शैक्षणिक क्षेत्रात

कार्यरत आहे याचा त्यांना अभिमान वाटायचा. महिना दोन महिन्याने येडशीवरून भेटायला यायचे. त्यांची वैचारिक, सामाजिक, ग्रामिण हिताची वैचारिक बैठक पक्की होती. सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, श्रम प्रतिष्ठा, गुणवत्ता इत्यादी विषयांवर अत्यंत प्रभावीपणे आपले मुद्दे मांडायचे. त्यांचे सर्व विचार अतिशय प्रगल्भ होते. त्यांच्या त्या भूमिकेचा संवादाचा नक्कीच माझ्याही वैचारिक बांधिलकी पक्की होण्यास परिणाम होत होता. काय वाचले? काय लिहिले? चौकशी करणे आणि विधायक सूचनाही देत. अशा माझ्या वैचारिक जडणघडणीतील एका मार्गदर्शकाच्या मुलाच्या कर्तबगारीचे मनोगत लिहिणे आत्मियतेचा व आनंदाचा योग वाटत आहे.

शैक्षणिक व वैचारिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबामुळे श्री. राजेंद्र पवार यांची वैचारिक व बौध्दीक धाटणी पक्की झाली. वाटचाल गुणवत्तेनेच चालू राहिली. १० वीला गुणवत्ता, पॉलिटेक्निकला राज्य पातळीवर गुणवत्ता, कराड अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिवाजी विद्यापीठात प्रथम तर पदव्युत्तर एम.ई. साठीही प्रथम येण्याचा पायंडा चालूच ठेवला. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हटले जाते. त्याप्रमाणेच आपल्या प्राथामिक शाळेपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत गुणवत्ता साध्य करून उज्जवल भाविष्याची आणि जीवनाची प्रचिती येत गेल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेतून कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली आणि जलसंपदा विभागात नियुक्ती मिळाली. ज्या विभागात पाणी आणि माती याचा अतूट संबंध येतो. पाण्याचे विकास कार्यात फार महत्व आहे. पाण्याच्या थेंबातून जीवनाची निर्मिती होते. राज्याची सर्वांगिण उन्नती होण्यासाठी जल सिंचन विभागाचे काम अत्यंत प्रभावी होणे आवश्यक असते. महाराष्ट्रातील असमान पर्जन्यमान, प्रतिकूल भूरचना, सततचा दुष्काळ यामुळे पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन होणे गरजेचे आहे. सर्व

सामान्य शेतकऱ्यांपासून ते राज्यकर्त्यापर्यंत पाण्याची अत्यंत गांभिर्याने चर्चा व घोषणा होत असतात. उदा. पाणी आडवा पाणी जिरवा, नदी जोड प्रकल्प, पाण्याचे समन्यायी वाटप, जलयुक्त शिवार, स्मार्ट शेती, साश्वत शेती, या सर्व बाबींच्या यशस्वी प्राप्तीसाठी आदर्श पाणी व्यवस्थापन होणे गरजेचे आहे ते काम जलसंपदा विभागामार्फतच होऊ शकते. त्यासाठी कमालीचा साधेपणा, अभ्यासूपणा, कार्यक्षमता व लाभार्थ्यांबद्दल मानवतावादी दृष्टीकोन लाभलेला श्री. राजेंद्र पवार यांच्यासारखा कुशल प्रशासक असावा लागतो. देशात सर्वात जास्त धरणे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राची भूमि आणखी सुजलाम सुफलाम करण्यासाठी विकासात्मक व मानवतावादी दृष्टिकोन असणारी अधिकारी व सहकारी राजेंद्र पवार साहेबा सारखे हवे आहेत.

श्री राजेंद्र पवार हे आपल्या विभागातील अतिउच्च पदावर गेले तरी अधिकाराचा आणि सत्तेचा दर्प कधी डोक्यात येऊ दिला नाही. सतत वास्तवाचे भान ठेवून व जमिनीवर पाय ठेवूनच कार्यरत राहिले. त्यांच्या संवाद कौशल्यातूनच सहकारी टारगेट पूर्ततेसाठी लक्षवेधी काम करत असत. पवार साहेबांच्या व्यक्तिमत्वात प्रशासकाच्या विविध वैशिष्ट्यांचा असाधारण समन्वय लाभल्याचे दिसून येते. श्री. राजेंद्र पवार साहेबांनी शासकीय सेवेत आपल्या कार्यातून एक वेगळी छाप निर्माण केली आहे. त्याबरोबरच आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या बहीण, भाऊ व इतर नातेवाईकांच्या विविध कार्यक्रमांची जबाबदारी घेऊन अत्यंत आपुलकी व आत्मियतेने पार पाडतात. आमच्या विविध प्रासंगिक, नैमितिक भेटीतून, संवादातून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाची जाणीव होते. सामाजिक, आर्थिक विषयाबाबत पटणारे त्यांचे निष्कर्ष असतात. जलतज्ज्ञ, कृषितज्ज्ञ, समाजचिंतक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून उल्लेख करावा एवढे काटेकोर मुल्यमापन अल्पशा चर्चेतूनही दिसून येते. त्यामुळे ते ज्या संस्थेत शिकले त्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. यादव साहेब यांनी

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या व्यवस्थापन मंडळात सदस्यत्व दिलेले आहे. पुढच्या पिढीत संस्थेचे संचालन योग्य व्यक्तिकडे जावे ही अपेक्षा असावी.

आज हातात भरपूर अधिकार असताना, आपल्या प्रशासनाचा दबदबा असताना, स्वभावात कसलाही अभिनिवेष दाखवला नाही किंवा अहंगंडाने भरलेली पोजही दाखवली नाही. सकारात्मक विचार करणारे आणि विवेचन करणारे, सामाजिक बांधिलकिने युक्त अधिकारी म्हणून शोभून दिसतात. शिक्षण महर्षि जगदाळे मामांच्या विचाराप्रमाणे श्रमाची कधी लाज वाटू देऊ नका हा संदेश सर्व कुटूंबियाच्या स्वभावातच रूजला होता. म्हणूनच श्री राजेंद्र पवार साहेब इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना सुट्टीत घरी आल्यानंतर म्हशीचे दुधही काढत होते. वसतीगृहातील इतर विद्यार्थ्यांप्रमाणे दगडी फरसीवरच झोपत होते. हाच श्रम संस्कार बहिण सौ. रंजना, सौ. सुनिता यांच्यावरही झाला. पहाटे लवकर उठून वीस कि. मी. अंतर असलेल्या उस्मानाबाद सारख्या शहरात एस. टी. बसने प्रवास करून अत्यंत गुणवत्तेने शिक्षण पूर्ण करून प्राध्यापिका झाल्या. तर बंधू पशूवैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी घेऊन भारताबाहेर विविध देशात नोकरी करतात. आईची पहाटेपासून मुलांसाठी राबण्याची तपश्चर्या कोणीही दुर्लक्षू शकत नाही. त्या कुटुंबातील सदस्यांकडून ताई म्हणून संबोधल्या जात. वसतीगृहातील विद्यार्थ्यांकडूनही त्या ताई अशाच संबोधल्या जात. आज त्यांचे वय ८५-८८ वर्षे असेल. या वयात श्री. राजेंद्र पवार साहेब आईची सेवा आपल्या हाताने घडावी म्हणून सोबतच ठेवतात. उच्चसंस्थांच्या आजच्या जीवनात हे एक अत्यंत दुर्मिळ उदाहरण आस्था आणि अभिमान वाटावा अशा सुपत्राचे आहे.


वडिलांप्रमाणेच राजेंद्र पवार साहेबांनी माणसं घडवण्याचे माणसांचे उदंड पिक काढण्याचे कार्य केले. कुशल प्रशासकाशिवाय एक मित्र म्हणूनही

त्यांचा सहवास व संवाद आनंददायी असतो. नर्म विनोद हे त्यांच्या संवादाचे वैशिष्टय आहे. सातत्याने चेहऱ्यावर दिसणारे हास्य, सुगम व सुलभ भाषा, सहज पटणारे चर्चेतील मुद्दे ,अकॅडेमिक स्वभावाचे वैशिष्टये वाटतात. कोणत्याहीदृष्टिने विचार केला तर अत्यंत सोबर व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.

* राहणीमान साधे पण अत्यंत टापटिप.
* बोलणे कमी पण मुद्देसुद.
* स्वभाव शांत पण कर्तव्यदक्ष.

थोडक्यात सांगायचे म्हणजे शांत, मनमिळावू स्वभावाचा दिलखुलास प्रशासक.

जीवनात उंच भरारी घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी श्री. राजेंद्र पवार यांचा जीवन आलेख प्रेरणादायी आहे. सेवानिवृत्तीनिमित्त त्यांच्या आरोग्यकडे पहाता ते आणखी खूप मोठे काम करू शकतील असा विश्वास वाटतो. त्यांना उंदड आयुष्य लाभो ही आई तुळजाभवानी चरणी प्रार्थना.



वारसा सामाजिक जाणिवेचा...

प्रा.चंद्रकांत मोरे
(मा.प्राचार्य)श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी.
बार्शी येथील मामासाहेब जगदाळे यांचे सहकारी व जेष्ठ साहित्यिक.
राजेंद्र पवार यांचे वडील रा.ज.पवार यांचे सहकारी मित्र आहेत.

आदरणीय कै. रा.ज. पवार सर हे बार्शीच्या छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य आणि येडशी येथील सुभाष वसतिगृहाचे अधीक्षक असल्याने त्यांच्याकडे जाण्याचा प्रसंग अनेकदा येई. त्यावेळी सरांनी बोर्डिंगच्या मुलांना लावलेली शिस्त आणि अभ्यासाची सवय बघून कौतुक वाटायचे. त्याचबरोबर त्यांनी स्वत:च्या चारही मुलांना लावलेली शिस्त आणि शिक्षणाची आवड हे बघूनही समाधान वाटायचे. मुले हुशार आणि चुणचुणीत होती. खरे तर यात रा.ज. पवार साहेबांइतकाच किंबहूना काकणभर अधिकच वाटा त्यांच्या सौभाग्यवती सुशीलाबाईचा होता. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांनी आसपासच्या खेड्यापाड्यातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण रूपी अमृत तर दिलेच. त्याबरोबर

आपल्या मुलांची हेळसांड होणार नाही याकडेही लक्ष दिले. त्यामुळेच त्यांची चारही मुले आज उच्च विद्या विभूषित असून वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या पदांवर विराजमान झाली आहेत. खरे तर आई वडील दोघेही शिक्षक असताना बोर्डिंगच्या मुलांसोबतच सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे, त्यांच्या सोबतच अभ्यास करणे आणि जेवणही तेच पिठले भाकरीचेच! अशा प्रकारे अतिशय साधेपणाने राहून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. आई वडिलांचे संस्कार, शिक्षणाची आवड आणि जिद्द या गुणांमुळे राजेंद्र पवार अर्थात आमच्या रा.ज. पवार सरांचे चिरंजीव हे जलसंपदा खात्यामधील सर्वोच्च पदावर अर्थात सचिवपदी विराजमान झाले आहेत. त्याठिकाणी देखील त्यांनी आपल्या हुशारीची चुणूक दाखविली असल्याने त्यांना संधी मिळाली आहे. त्यामुळे केवळ आईवडिलांचेच नाही तर आपल्या मातृभूमिचे आणि कर्मभूमिचे उपकार फेडले आहेत असे म्हणावे लागेल!

काही वर्षापूर्वी मी माझा सातारा येथे रहाणारा चुलत भाऊ रमण मोरे याच्याकडे गेलो होतो. तो तेथे पाटबंधारे खात्यात प्रयोगशाळेत कार्यरत होता. त्याच्याकडे गेल्यानंतर गप्पा सुरू असताना तो मध्येच म्हणाला, ''आमचे साहेब देखील तिकडचेच बार्शीचे आहेत.'' बार्शीचे साहेब आहेत म्हटल्यावर थोडी उत्कंठा वाढली. त्याला विचारले, ''नांव काय त्यांच?'' त्यावर त्याने राजेंद्र पवार असे सांगितले. परंतु त्यावेळी माझ्या ते लक्षात आले नाही की ते आमच्याच रा.ज. पवार सरांचे चिरंजीव असतील! परंतु उत्सुकता स्वस्थ बसू देईना. बार्शीचे आहेत म्हटल्यावर भेटून तर घेऊयात! भेटीयंती कुठून तरी ओळख निघेल असे वाटले म्हणून भावाबरोबर त्यांच्या कार्यालयात पोहचलो तर तेच राजेंद्र रामचंद्र पवार म्हणजे आमच्या रा.ज. पवार सरांचे चिरंजीव! मला पहाताच ते खुर्चीवरून उठले आणि मला नमस्कार केला! कै. मामासाहेब जगदाळे यांच्या संस्थेतील संस्कार किती खोलवर रूजले आहेत

हे त्यावेळी दिसून आले. अतिशय मनांपासून गप्पा झाल्या. त्यांनी मला घरी येण्याचा आग्रह केला. त्या आग्रहातील प्रामाणिकपणा आणि आत्मियता बघून मलाही घरी जाणे टाळता आले नाही. आदरातिथ्यातील संस्कारही तेच दिसून आले. तेव्हापासून राजेंद्र पवार आणि आमचा स्नेह वाढला. तेही कधी बार्शीला आले तर आठवणीने घरी येतात. रा. ज. पवार सरांशी असलेला स्नेह नव्या पुढच्या पिढीनेही कायम ठेवला आहे. पुढे रा. ज. सर सेवानिवृत्त झाल्यानंतर सदस्य म्हणून राजेंद्र पवार यांना घेण्याचा संस्थेने निर्णय घेतला! त्यांची हुशारी, वैचारिक प्रगल्भता आणि उच्च पदस्थ असणे याचा संस्थेला उपयोग होईल आणि त्यांचीही संस्थेशी असलेली नाळ कायमची जोडली जाईल या उद्देशाने त्यांना सभासदत्व देण्यात आले आहे. त्यानंतर मात्र आमच्या अनेकदा भेटीगाठी होऊ लागल्या.

मामासाहेब जगदाळे हॉस्पीटलमध्ये ट्रॉमा युनिट सुरू करण्याचा निर्णय संस्थेने अलिकडेच घेतला आहे. यासाठी खर्च मोठ्या प्रमाणावर येणार आहे. जवळपास १७ ते १८ कोटी रूपयांपर्यंत खर्च जाईल अशी शक्यता वर्तविण्यात आली. अशा वेळी काय करायचे असा प्रश्न पडला. त्यावेळी मार्गदर्शन घेण्यासाठी म्हणून श्री. राजेंद्र पवार यांना फोन केला. त्यावेळी ते म्हणाले, ‘‘काही काळजी करू नका! काही तरी मार्ग काढूया! चांगल्या कामासाठी मदतीचे हात नेहमी पुढे येतात.’’ त्यानंतर त्यांनी एक संकल्पना मांडली की आपल्या संस्थेतून शिकून गेलेले अनेक विद्यार्थी सद्या मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत. त्या सर्वांना एकदा एकत्र बोलवूया! त्यांची बैठक मुंबई येथेच बोलवुया. संस्थेचे सर्व पदाधिकारी देखील मुंबईला या. एकत्र बसून यावर तोडगा काढूया! त्यानंतर त्यांनी स्वत: याबाबतीत पुढाकार घेऊन कै. जगदाळे मामांच्या संस्थेतून शिकून बाहेर पडलेल्या आणि सद्या चांगल्या हुद्यावर नोकरीत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची बैठक बोलावली आणि त्या

ट्रॉमा युनिट सुरू करण्याबाबतच्या प्रश्नावर विचारविमर्श करण्यात आला. योगायोगाने या बैठकीला चांगला प्रतिसाद मिळाला आणि अनेक माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे पाठिंबा दिला आणि तो प्रश्न मार्गी लागला आहे. लवकरच बार्शीच्या मामासाहेब जगदाळे हॉस्पीटलमध्ये ट्रॉमा युनिट सुरू करण्यात येत आहे. यासाठी राजेंद्र पवार यांनी पुढाकार घेतला नसता तर हे एवढ्या लवकर शक्य झाले नसते.

राजेंद्र पवार यांचे एक बंधू व्हेटनरी डॉक्टर आहेत तर दोन बहिणी (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षिका आहेत. अतिशय गुणवान मुले आहेत. अशा गुणी मुलांना घडविण्यात त्यांच्या आई सुशीलाबाई रामचंद्र पवार यांचा मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणे त्यांनी सुभाष बोर्डिंगच्या मुलांनाही पुत्रवत प्रेम दिले आणि चांगले संस्कार केले. सुशीलाबाई या संस्कार करणारे विद्यापीठच आहेत याची दखल घेऊन मी स्थापन केलेल्या ट्रस्टच्या वतीने त्यांना आदर्श माता हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. हा पुरस्कार २००५ सालापासून दरवर्षी एका आदर्श मातेला दिला जातो. पुढची पिढी घडविणाऱ्या माता भगिनींना प्रोत्साहन मिळावे म्हणून माझ्या सेवा निवृत्तीनंतर मिळालेल्या रकमेतून १ लाख रूपये फिक्स डिपॉझिट ठेवून त्याच्या व्याजातून मिळालेल्या पैशातून हा पुरस्कार दिला जातो. सन २००५ पासून ही पुरस्कार देण्याची प्रथा सुरू असून यापुढेही ती अशीच अखंडपणे सुरू राहील.!

रा. ज. पवार सर हे त्यागमूर्ती होते. आयुष्यात त्यांनी खूप त्याग केला आहे. एवढेच नव्हे तर आपल्या मृत्यूनंतरही त्यांनी त्यागाचीच शिकवण दिली आहे. रा. ज. पवार सरांनी मृत्यूपूर्वीच आपले मृत्यूपत्र तयार करून ठेवले होते. त्यानुसार त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार न करता तो मृतदेह मेडिकल कॉलेजला दान करावा अशी इच्छा त्या मृत्यूपत्रात लिहिली होती.

त्या अनुसार त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मृतदेह शववाहिनीद्वारे बार्शीहून सोलापूरला नेला जाता होता. त्यावेळी शववाहिनीच्या मागे एक कार गाडी होती. त्या गाडीत राजेंद्र पवार, त्यांचे भाऊ संजीव पवार, बहिणी सौ. रंजना आणि सौ. सुजाता आणि त्यांच्या मातोश्री सुशीलाबाई हे संपूर्ण कुटुंब त्या गाडीत होते. गाडी स्वत: राजेंद्र पवार चालवित होते. सकाळची वेळ होती. आदल्या रात्री रात्रभर रा. ज. पवार सरांवर उपचार सुरू होते. त्यामुळे सर्व कुटुंबांचा डोळ्याला डोळा लागला नाही. त्यात सकाळी मृत्यू झाल्यानंतर मृतदेह मेडिकल कॉलेजला सुपुर्द करण्यासाठी सर्वजण एकाच गाडीत बसून सोलापूरकडे जात असताना रस्त्याने समोरून येणाऱ्या एका बसने राजेंद्र यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. ती धडक इतकी जोरदार होती की त्या कारचा पुढचा भाग चेंदामेंदा झाला होता आणि त्या कारचे तोंड सोलापूरच्या दिशेने होते ते अपघातानंतर बार्शीच्या दिशेला म्हणजे थेट विरूध्द दिशेला झाले. इतका भयंकर अपघात झाला तरी आत बसलेल्या संपूर्ण पवार कुटुंबाला कोणीतीही मोठी इजा झाली नाही. किरकोळ मुका मार वगळता कोणीही जखमी झाले नाही. ही रा. ज. पवार यांची पुण्याई नव्हे तर याला काय म्हणावे! इतका भयंकर अपघात होऊनही सर्वजन सुखरूप वाचले! पाप पुण्य या गोष्टी जगात आहेत की नाहीत यावर वाद होईल. परंतु ही घटना बघितल्यावर पुण्याईवर विश्वास बसल्या शिवाय रहात नाही.

रा. ज. पवार सरांना आम्ही गुरूस्थानी मानतो. त्यांचे कार्य, सेवा, त्याग आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिला आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन असे असंख्य रा. ज. पवार घडावेत या उद्देश्याने आम्ही काही मित्रांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेणारे पुस्तक काढावे असे ठरले. त्याचे संपादकत्व मी आणि श्री इंगळे सर यांनी स्वीकारले. त्यावेळी राजेंद्र पवार यांनीदेखील उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला आणि एक छान पुस्तक पवार सर या नावाने

प्रकाशित केले.

खरोखरच त्यांच्या आयुष्यातील सर्व घटना प्रेरणादायी आहेत हे पुस्तक वाचल्यानंतर पटते. राजेंद्र यांनीदेखील वडिलांच्या पावलांवर पाऊल ठेवून आपले कार्य चालू ठेवले आहे. शासकीय सेवेत कार्यरत असताना आणि अतिशय व्यस्त कामकाजातून वेळ काढून ते आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत असतात. त्यामुळे त्यांचेही कार्य वाखाणण्याजोगे आहे, प्रेरणादायी आहे. त्यांच्यावर गौरवग्रंथ निघत आहे ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे. त्यांनी सेवा निवृत्तीनंतर नव्या जोमाने सामाजिक कार्यात उतरावे त्यासाठी त्यांना उदंड आयुष्य मिळावे ही प्रार्थना!



जगदाळे मामांच्या संस्कारातील अंकूर

श्री. व.न.इंगळे
(मा.प्राचार्य)श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी.
बार्शी येथील मामासाहेब जगदाळे यांचे सहकारी व जेष्ठ साहित्यिक. राजेंद्र पवार यांचे वडील रा.ज.पवार यांचे सहकारी मित्र आहेत.

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात सुमारे सत्तर वर्षापूर्वी शिक्षणाचे फारसे वारे वहात नव्हते. शेतकऱ्यांची मुले शिक्षणाऐवजी शेतीकडे वळायची.! शेती परवडणारी नव्हती! तरीदेखील जगण्याचे ते एक महत्त्वाचे साधन होते. त्यामुळे मुले थोडीफार लिहायला वाचायला शिकली की शेतीची वाट धरायचे! त्यामुळे शिक्षणाची वाट धुसर होत होती. अशा काळात मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील येडशी सारख्या गावात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली ती शिक्षण महर्षि मामासाहेब जगदाळे यांनी! बहूजन समाजातील शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजेत या तळमळीपोटी सन १९३४ मध्ये मामासाहेबांनी श्री. शिवाजी बोर्डिंगची स्थापना केली आणि शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाची दारे मोकळी केली. त्याचे लोण १९५१ मध्ये


येडशी येथे म्हणजे मराठवाड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहचले. मामासाहेबांनी येडशी येथे सुरूवातीला सुभाष बोर्डिंग नावाचे वसतिगृह सुरू केले आणि त्यानंतर पुढच्या वर्षी म्हणजे १९५२ मध्ये जनता विद्यालयाची स्थापना!

मी इयत्ता ७ वीसाठी या जनता विद्यालयात प्रवेश घेतला आणि रहाण्यासाठी आणि खाण्यासाठी बाजूलाच असलेल्या सुभाष बोर्डिंगमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी या बोर्डिंगचे सेक्रेटरी म्हणून काम पहाणारे रा. ज. पवार सर होते! अत्यंत सेवाभावी, बोलक्या डोळ्याचे, गोड स्वभावाचे आणि सदैव प्रसन्न वाटणारे पवार सर हे बोर्डिंगचे काम विना वेतन करायचे! बोर्डिंगमधल्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांचे ते पालक होते. मुलांच्या शिक्षकांची आणि आई वडिलांची भूमिका तेच पार पाडायचे. या बोर्डिंगच्या कामाशिवाय ते जनता विद्यालयात हिंदी विषयाचे शिक्षक म्हणून देखील कार्यरत होते. ते एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून प्रख्यात होते. शाळेच्या वेळेव्यतिरिक्त राहिलेला संपूर्ण वेळ ते बोर्डिंग आणि तेथील मुले यांच्यासाठी देत असत. अर्थात त्यांचे वास्तव्यदेखील त्या बोर्डिंगमध्ये एका खोलीत सहकुटुंब असे. त्यांच्या अर्धांगिनीदेखील शिक्षिका होत्या. ते सहकुटुंब तिथे रहात होते. त्यांनी १९५१ ते १९८६ या काळात या बोर्डिंगचे सेक्रेटरी म्हणून काम पाहिले आणि पुढे ते संस्थेचे सदस्यदेखील झाले.

बोर्डिंगमध्ये असताना इयत्त ७ वी पासून ते मॅट्रीकपर्यंत रा.ज. पवार सर यांच्या सानिध्यात रहाण्याची संधी मिळाली. त्यावेळी त्यांनी मुलांवर केलेले संस्कार आणि शिस्त यामुळे अनेक मुले यशाच्या शिखरावर जाऊन पोहचली आहेत. बोर्डिंगमधील शेतकऱ्यांच्या मुलांवर त्यांनी पुत्रवत प्रेम केले. त्याबरोबरच स्वत:च्या मुलांनादेखील घडवले आहे. त्यापैकी त्यांचा मोठा मुलगा म्हणजेच आजचे जलसंपदा खात्यात सर्वोच्च सचिव पदावर असलेले राजेंद्र पवार होत!

राजेंद्र पवार यांचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण येडशीच्या जनता विद्यालयातच झाले आहे. त्यामुळे अगदी लहानपणापासूनच त्यांच्या अंगी येडशीच्या सुभाष बोर्डिंगची शिस्त आणि कष्टाला न लाजण्याची सवय बाणली गेली आहे. लहानपणापासून अभ्यास आणि हुशार विद्यार्थी अशी त्यांची ख्याती होती. मॅट्रीकनंतर त्यांनी सिव्हील इंजिनियरींगचा डिप्लोमा केला आणि अंतिम परिक्षेत ते बोर्डाच्या मेरिट लिस्टमध्ये आले. पुढे इंजिनियरींगची पदवी घेण्यासाठी कराडच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात दाखल झाले आणि संपूर्ण शिवाजी विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळविला!

आपल्या हुशारीच्या बळावर त्यांनी राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन त्यावेळच्या पाटबंधारे खात्यात अधिकारी म्हणून नोकरीस प्रारंभ केला आणि आपल्यावर झालेल्या संस्कारानुसार स्वत:ला झोकून देऊन काम केले. अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आणि आता ते सेवानिवृत्त होत आहेत. बालपणी त्यांना मिळालेल्या संस्काराच्या बळावर त्यांनी आपली कारकिर्द यशस्वीपणे पार पाडली आहे. कर्मवीर डॉ. जगदाळे मामा यांच्या संस्थेत तयार झालेला एक विद्यार्थी आज शासनाच्या एका विभागाच्या सर्वोच्च पदावरून सेवानिवृत्त होत आहे. ही संस्थेसाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे. सेवानिवृत्तीनंतर देखील आपल्या ज्ञानाचा उपयोग नक्कीच काही चांगल्या कामासाठी होईल याची खात्री आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभाशिर्वाद!



हसरे पवार साहेब

श्री. अनिलकुमार हटकर
(आर्किटेक्ट)
हे व्यवसायाने आर्किटेक्ट असले तरी जमीन आणि पाणी या विषयावरील त्यांचे ज्ञान वादातित आहे. ते या विषयावर जागतिक पातळीवर काम करत असून सद्या पुण्यात त्यांचे कार्यालय आहे.

''रिव्हर बेसिन वाटर अँड वाटर रिसॉर्सेस'' या विषयावर एक परिषद घेण्याचे आमच्या कंपनीने ठरविले होते. ही परिषद पुणे येथील हॉटेल फरियास येथे जून २०१९ मध्ये घेण्याचे ठरले. या परिषदेसाठी अध्यक्ष म्हणून माजी केंद्रिय कृषिमंत्री आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी येण्याचे कबूल केले होते. त्या दृष्टिकोनातून तयारी सुरु होती. अशा वेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून या परिषदेसाठी उपस्थित रहाण्यासाठी कोणीतरी व्यक्तिमत्व हवे होते. त्यासाठी आम्ही थेट मंत्रालय गाठले. त्यावेळी आम्ही कडा विभागाचे सचिव म्हणून श्री राजेंद्र पवार साहेब यांना भेटलो. तीच आमची पहिली ओळख आणि भेटही. जेव्हा आम्ही आमची परिषदेची कल्पना त्यांना सांगितली त्यावेळी ते एकदम दिलखुलास हसले आणि म्हणाले, ''तुम्ही

या परिषदेसाठी भेटायला आलात हे फार छान झाले. मनस्वी आनंद झाला. आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करता आहात हे ऐकून आनंद वाटला. जगात या विषयावर खूप काम चालू आहे. आता ते आपल्या देशातही सुरु झाले आहे. त्यासाठी तुमच्यासारख्या लोकांची गरज आहे. त्याकरिता आपण स्वत: पुढाकार घेत आहात हे पाहून खूप आनंद झाला.''

पहिल्या भेटीतच ते आमच्या खास लक्षात राहिले. त्याचे कारण त्यांनी जे दिलखुलासपणे हसून केलेले स्वागत होय. त्यांच्या त्या हसण्यात मनापासून स्वागत केल्याची भावना होती. एवढेच नव्हे तर त्यांनी या परिषदेसाठी संपुर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आणि लगेच त्याची सुरुवातही केली. यासंबंधी इतर खात्यांशी स्वत: संपर्क करुन दिला आणि स्वत: जातीने हजर रहाण्याचे कबूल केले. एक सरकारी अधिकारी आणि तोही सचिव पदावर असलेला इतक्या आपुलकीने आनंदाने स्वागत करतो आणि सांगितलेल्या कामात इतक्या आनंदाने सहभागी होतो याचे आश्चर्य वाटले. त्यांची ती पहिली भेट इतकी अविस्मरणीय ठरली की त्यांचा मोबाईल क्रमांक मी ''हसरे पवार'' या नावाने मोबाईलमध्ये सेव केला आहे. ज्याप्रमाणे ते बोलले त्याप्रमाणे त्यांनी या परिषदेसाठी सर्वोतोपरि सहकार्य केले आणि स्वत: देखील त्या परिषदेला हजर राहिले. परिषदेतील विषयाची मांडणी पाहूनही ते खूप खूष झाले. यापुढेही अशा परिषदा घ्याव्यात आमचे सक्रिय सहकार्य असेल असे आश्वासनही दिले. परिषदेचे सुरेख नियोजन, मांडणी आणि विविध संस्थांचा सहभाग बघून ते प्रभावीत झाले आणि त्यांनी या कार्यक्रमाचे तोंड भरुन कौतुक केले.

श्री राजेंद्र पवार साहेब एक व्यक्ति म्हणून एक मनमिळावू, कर्तृत्ववान, ज्ञानी आणि निगर्वी व्यक्तिमत्व आहेत. त्यांचे आपल्या क्षेत्रातील ज्ञान अगाध आहे. बोलताना कधीही ते विषय सोडून बोलत नाहीत. आपल्या क्षेत्रातील

विषयात त्यांचे ज्ञान खूप आहे. अद्यापही त्यांच्या ज्ञानाचा सरकारने पूरेपूर उपयोग करुन घेतला नाही असे वाटते. जगभरातील जलतज्ञांपेक्षा काकणभर अधिकच ज्ञान त्यांच्याकडे आहे. पाण्याचे गव्हर्नन्स, काँझरवेशन असेल, मायक्रो इरिगेशन असेल किंवा वॉटर क्वालिटी मॅनेजमेंट असेल, रिसायकल अँड रियुज ऑफ इंडिस्ट्रीस वेस्ट वॉटर या विषयावर त्यांनी काम करावे असे मला वाटते. कारण यापुढे या गोष्टीचीच जास्त गरज भासणार आहे. या विषयावर जगभर चाललेले संशोधन अभ्यास करुन ते आपल्या देशात वापरले जावे. जगभरातील उदाहरणे आपल्या देशात राबवावीत. या संबंधातील जगाचा दृष्टिकोन आणि व्हिजन लोकांसमोर मांडायला हवे. यासाठी आमच्यासारख्यांचे सहकार्य लागले तर त्यांनी जरुर आवाज द्यावा. मदतीसाठी आम्ही सदैव तयार आहोत. त्यासाठी लागणारी आर्थिक मदत मिळविण्यासाठी प्रयत्न करता येतील. श्री पवार साहेब यांची कामाची पध्दत आणि त्यातील रस पहाता बरेच मोठे कार्य त्यांच्या हातून घडेल अशी अपेक्षा आहे. त्यांच्या कामाची दखल राज्यभर तर घेतली आहेच या शिवाय देशपातळीवरही त्याचा उपयोग करुन घेतला जाईल असे वाटते.

श्री पवार साहेब यांच्यासारखी माणसे ध्येयाने प्रेरित झालेली असतात. ती सतत कामात मग्न असतात. त्यांच्या विचारांची विमाने सतत उंच उंच झोके घेत असतात. त्यांच्या ज्ञानाचा आणि विचारांचा नक्कीच राज्यासाठी आणि देशाासाठी उपयोग होईल याची खात्री आहे. त्यांनी सेवा निवृतीनंतरही पाण्याच्या क्षेत्रात काम करावे आणि आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ लोककल्याणासाठी करावा ही अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

निखळ मैत्री

श्री. सुरेंद्र अग्रवाल
(उद्योजक) पुणे
इंजि. राजेंद्र पवार यांचे हितचिंतक मित्र आहेत. दोघानांही जेव्हा वेळ मिळतो तेव्हा अनेक विषयांवर चर्चा होत असतात.

माणसाच्या आयुष्यात सर्वात समाधानाची कोणती गोष्ट असेल तर ती निखळ मैत्री होय! कोणत्याही प्रकारची अपेक्षा अथवा स्वार्थ न ठेवता जी मैत्री असते. त्या मैत्रीच्या नात्याचा आनंदच काही और असतो. श्री. राजेंद्र पवार साहेब आणि माझी ओळख अशीच आमच्या दोघांच्या कॉमन मित्रांच्या माध्यमातून झाली. बोलता-बोलता एकमेकांचे स्वभाव कळाले, विचार कळाले आणि गट्टी जमली! आम्ही दररोज भेटणारे किंवा वारंवार फोनवर गप्पा मारणारेही मित्र नाही आहोत. परंतु आमचे स्थान मात्र एकमेकांच्या हृदयात आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

दर्शने स्पर्शनेपि यत्र द्रवतेहृदया
सा स्नेह इति कथ्यते!

काही माणसे अशी असताता की त्यांना रोज नाही भेटले, रोज फोन केला नाही तरी त्यांच्या केवळ आवाजाने, त्यांना समोर बघितल्यावर किंवा त्यांचे नाव जरी ऐकले तरी हृदय विरघळते यालाच स्नेह असे म्हणतात. स्नेह याचेच दुसरे नाव मैत्री आहे. आमच्या मैत्रीचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही प्रकारे कामाचा संबंध नाही, देवाण घेवाणीचा संबंध नाही आणि कुठल्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहारात पडत नाही. त्यामुळे उरते ती केवळ निखळ मैत्री! निखळ मैत्री करण्यासाठी निखळ स्वभावाची माणसे लागतात. तो स्वभाव मला त्यांच्यात दिसला आणि आमची मैत्री झाली. आमची मैत्री नात्यागोत्याच्या पलिकडची आहे. जीवाभावाची मैत्री जी ओढ निर्माण करते.

श्री.राजेंद्र पवार साहेबांनी आपल्या क्षेत्रात चांगले कार्य केले आहे. परंतु मी त्यांच्याबाबतीत एवढे ठामपणे सांगू शकतो की ते एक दिलदार आणि मोठ्या मनाचे माणूस आहेत. एक खळखळत्या पाण्याचा स्वच्छ झरा! ज्याचे मन स्वच्छ असते त्याच्याकडून कधी काही चुकीचे घडत नाही. अशी माणसे सर्वांनाच हवीहवीशी वाटतात. त्यामुळे त्यांचे कार्य जरी जलसंपदा या शासकीय खात्यात असले तरी त्यांचा मित्र परिवार सर्वच खात्यात आणि सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विभागात आहे. आयुष्यभरात त्यांनी असंख्य माणसे जोडली आहे. आपल्या प्रेमळ स्वभावाने माणसे जोडणे हा त्यांचा स्वभावच आहे. ज्याला आयुष्यात मित्र खूप लाभतात तोच खरा श्रीमंत माणूस ठरतो. अशा आमच्या मित्राला उदंड आयुष्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना!



मैत्रीचा अभिमान

श्री. अशोक, किशोर, अनुप, संतोष आणि नहार परिवार

नहार आणि पवार या दोन्ही परिवारांचा गेल्या तीन पिढ्यांपासूनचा जवळचा स्नेह आहे. जणू एका कुटुंबातीलच वेगवेगळी भावंडे आहेत.

भोगले जे दु:ख त्याला सुख म्हणावे लागले
एवढे मी भोगले की मज हसावे लागले

सुरेश भटांच्या या ओळी सर्व काही सांगून जातात. तसेच मा. राजेंद्रजी पवार यांचेबाबत म्हणावे वाटते. कारण स्व. श्री.रामचंद्रजी पवार सर आणि स्व. श्री. चांदमलजी नहार हे दोघे घनिष्ट मित्र होते. आमचे कौटुंबिक संबंधही तेवढेच जिव्हाळ्याचे होते, आहेत. मला आठवते लहानपणापासून राजेंद्रजी (राजू) हूशार, चलाख, प्रामाणिक आहेत. मला स्वत:ला अभ्यास करताना काही अडचणी आल्या की मी त्यांच्याकडून समजावून घेत असे. त्यांचा स्वभाव पहिल्यापासून खूप शांत संमंजस आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वावर त्यांचे वडीलांचा प्रभाव जास्त आहे हे जाणवते. मा. राजेंद्रजी म्हणजे महावीरांची

शांती, बुध्दांची, क्षमा, विवेकानंदाची बौधिकता, तुकारामांचा परखडपणा, ज्ञानदेवाची सहिष्णुता आहे. असे म्हटले तरी वावगे होणार नाही. असा माझा जीवाभावाचा मित्र मंत्रालयात सचिव आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. मी आणि राजू तसे ५० वर्षापासूनचे मित्र म्हणजे शालेय जीवनातील पहिला मित्र म्हणजे राजे! अशा या मित्राचा गौरवग्रंथ निघत आहे. हे कौतुक ऐकूनच छाती फुलून आली आहे. जुन्या आठवणीनी मन गहिवरून आले आहे. ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना पुढील आयुष्य आरोग्यदायी लाभो. निवृत्तीनंतरचा काळ कुटुंबासाठी, देशासाठी, समाजासाठी, राष्ट्रासाठी आणखी सतकारणी लाभो हीच सदिच्छा!

शेवटी सुरेश भटांची ओळ आठवते राजेंद्रजीसाठी

वागणे माझे जरी साधेच होते
दाबलेले हूंदके ताजेच होते!

हितचिंतक मित्र



अतुट मैत्रीचे नाते

श्री. जी.ए.भिलारे
इंजि. राजेंद्र पवार यांचे पुणे येथील सहकारी जवळचे हितचिंतक मित्र. एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी होणारे आणि पाठींबा देणारे मित्रवर्य आहेत.

माणसाला कधी कधी फार मोठ्या माणसाचा सहवास लाभतो. त्याक्षणी त्याची जाणीवसुद्‌धा होत नाही की आपण एका महान माणसाच्या सहवासात आहोत. कालांतराने जेव्हा त्या माणसाचे कर्तृत्व व कार्य आपल्याला समजते तेव्हा आपण अशा व्यक्तिबरोबर व्यतित केलेल्या काळाचा अभिमान वाटतो. अशी व्यक्ति जर आपल्या जीवन प्रवाहाचा हिस्सा झाली असेल तर जीवन सार्थकी लागते. असेच काही झाले आहे माझ्या बाबतीत जेव्हा राजेंद्र पवार मित्र म्हणून माझ्या आयुष्यात आला आणि अजूनही आहे.

सन १९७९ झाली मी कराड येथील शासकीय इंजिनियरींग कॉलेजला प्रथम वर्षाकरिता ॲडमिशन घेतले होते. राजेंद्रने इ. १० वी नंतर Civil

engineering पदविकेचा अभ्यासक्रम महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केला होता. कोणत्याही शाखेच्या ३ वर्षाच्या पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर इंजिनियरींगच्या दुसऱ्या वर्षाला थेट ॲडमिशन दिले जाते. पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यामुळे राजेंद्रने दुसऱ्या वर्षाकरिता कराडलाच इंजिनियरींगसाठी ॲडमिशन घेतले. त्यावेळेस आम्हा रेग्युलर बॅचची ३ री सेमीस्टर जवळजवळ संपत आली होती. नियमाप्रमाणे पदविका अभ्यासक्रमानंतर इंजिनियरींगच्या दुसऱ्या वर्षात ॲडमिशन घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षाचे Maths-1 आणि दुसऱ्या वर्षाचे (म्हणजेच ३ ऱ्या सेमीस्टरचे) Maths -3 असे तीन Maths चे विषय व २ ऱ्या वर्षाचे *III* ऱ्या सेमीस्टरचे इतर सर्व विषय अभ्यासक्रमासाठी असतात. तसेच इतर विषयांचे भले मोठे सबमिशनही त्यांना वेळेत पुर्ण करायचे असते. हा एवढा मोठा घाट राजेंद्रने एका दमात पार केला. पहिल्या वर्षाचे Maths -2 आणि *III* ऱ्या सेमीस्टरचे Maths - 3 व सर्व विषय पठ्ठयाने एका वेळेसच सोडविले आणि एवढेच नाही तर तो दुसऱ्या क्रमांकाने पास झाला होता नंतर मात्र सेमीस्टर *IV* जे *VIII* मध्ये तो आणि तोच फक्त पहिला येत राहिला. मी नेहमी रेग्युलर Lectuers attened करायचो, खूप अभ्यास करायचो. मी प्रत्येक सेमीस्टरला ठरवायचो की पुढच्या सेमीस्टरला राजेंद्रपेक्षा जास्त मार्कस मिळवून त्याच्या पुढे जायचे. पण मला हे शक्य झाले नाही, अपवाद वगळता फायनल *VIII* सेमीस्टरला मी त्याच्या पेक्षा Computer Methods ह्या एकाच विषयामध्ये जास्त मार्कस मिळवले होते. राजेंद्रची बुध्दीमत्ता खूप तल्लख आहे. त्याने एकदा वाचले की त्याच्या लक्षात राहते. इंजिनियरींगला तो वर्गात केवळ एक वही घेऊन येत असे. त्याची स्मरणशक्ती नि मेंदू म्हणजे Xeroxe Memery पुस्तकातले एकदा वाचले की परिक्षेमध्ये तसेच्या तसे उत्तरपत्रिकेमध्ये उतरलेले असे.

इंजिनियरींगच्या शेवटच्या वर्षी तो शिवाजी विद्यापीठामध्ये पहिला आला होता आणि मी पाचवा आलो होतो. आमच्या दोघांमध्ये जवळ पास १०० मार्कांचा फरक होता. मला सार्थ अभिमान वाटतो की राजेंद्रच्या १९८३ च्या वर्षीच्या मार्कांचे Record आजतागायत अबाधित आहे.

राजेंद्रच्या घरी साक्षात सरस्वती देवीचा वास होता. त्याचे वडील बार्शीतील थोर समाजसेवक जगदाळे मामा यांच्या शाळेमध्ये शिक्षक होते तर आई अन्य शाळेमध्ये शिक्षिका होत्या. त्यांच्या जडण घडणीत आईवडिलांनी राजेंद्रवरती विविध पैलू पाडले होते.

आमच्या इंजिनिअरींगच्या शेवटच्या वर्षांमध्ये मी राजेंद्र आणि संजय घळसासी कँपस इंटरव्यूमधून व्ही.एम.जोग कंपनीमध्ये सिलेक्ट झालो होतो. मला डिझाइन डिपार्टमेंट पाहिजे होते तर संजयला साइट एक्झुक्युशन डिपार्टमेंट पाहिजे होते पण झाले उलटेच! १ जुन १९८३ ला व्ही.एम. जोग कंपनीमध्ये Love groove pumping station वरळीच्या मुंबई साईटवर रूजू झालो. पण माझे मन ह्या साईटवर काही रूळले नाही. त्यामुळे मी आठच दिवसांमध्ये ते काम सोडले. व्ही.एम. जोग मध्ये आम्हाला रू. १०००/- महिना पगार मिळणार होता. व्ही.एम.जोगमधील काम सोडल्यानंतर मी बी.जी.शिर्के कंपनी, पुणे येथे मुलाखत देऊन १० जून १९८३ पासून महिना रू.१२५०/- या पगारावर रूजू झालो. राजेंद्र अजून व्ही.एम. जोगमध्ये रूजू झाला नव्हता. बी.जी.शिर्के कंपनीमध्यव्ही.एम.जोग कंपनीपेक्षा जास्तीचा रू. २५०/- पगार मिळत आहे तसेच पुण्यामध्ये व मुंबईमधील राहण्याचा फरक ह्या दोन गोष्टी समोर ठेवून मी राजेंद्रलाही बी.जी. शिर्के कंपनीमध्ये पुण्यात रूजू होण्यासाठी तयार केले आणि त्याप्रमाणे तो मुलाखत देऊन रूजू देखील झाला. त्यावेळेस आम्ही दोघे एकाच रूममध्ये पुण्यामध्ये रहात होतो नि कंपनीमध्ये रोज राजेंद्रच्याच सायकलने त्याला मी डबलशीट घेऊन जात

होतो. तेव्हा पुणे सायकलचे पुणे म्हणून ओळखले जायचे.

याच दरम्यान आमचा इंजिनिअरींगचा निकाल लागला, राजेंद्र शिवाजी विद्यापीठामध्ये पहिला तर मी पाचवा आलो होतो. खूप आनंद झाला होता. आमचा आनंद आम्ही बी.जी. शिर्के साहेबांना पेढे देऊन पण साजरा केला होता. त्यावेळेस शिर्के साहेबांनी आम्हा दोघांची केवळ स्तुतीच केली नव्हती तर कंपनीमध्ये एक नोटीस काढून आमचा निकाल सर्वांबरोबर शेअर केला होता. मला चांगले आठवत आहे की स्तुतीबरोबर त्यांनी आमची कान उघडणीही केली होती. त्याचप्रमाणे आम्हाला लाखमोलाचा असा सल्ला दिला होता की तुम्ही कितीही मोठे झालात तरी तुमचे पाय नेहमी जमिनीवरच ठेवा. त्यांचे म्हणणे होते की इतकी हुशार मुले आमच्या कंपनीबरोबर जास्त काळ नाही राहणार. तुम्ही तुमचे चांगले करिअर कराल आणि त्यांचे बोलणे खरे ठरले. त्यावेळेसच राजेंद्रनेएम.ई. स्ट्रक्चरसाठी coep मध्ये ॲडमिशन घेतले आणि मी बी.जी.शिर्के कंपनीमध्येच होतो. राजेंद्र एम.ई.(स्ट्रक्चर). करत असतानाच एमपीएससीसाठी तयारी करित होता. १९८५ साली राजेंद्र एम.ईचे शिक्षण घेताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी परिक्षेमध्ये राज्यात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होऊन वयाच्या केवळ २३ व्या वर्षी तो महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी सेवेमध्ये रूजू झाला.

महाराष्ट्र राज्य सेवा वर्ग १ मध्ये जलसंपदा विभागात रूजू झाल्यानंतर कार्यकारी अभियंता ते मुख्य अभियंता ने महासंचालक ते सचिव (लाभक्षेत्र विकास) अशा विविध पदांवरती काम करत असताना राजेंद्रने बांधकाम संकल्पन, नियोजन, सनियंत्रण, धरण व कालवा सिंचन व्यवस्थापन, बंदिस्त पाईप लाईन, वितरण प्रणाली इ. कामे नियोजित वेळेत सर्वांच्या सहकार्यांने उत्तम गुणवत्तेसह पूर्ण केली. कुकडी प्रकल्प (पुणे), वारणा प्रकल्प (कोल्हापूर) कन्हेर जलविद्युत प्रकल्प, जिहे- कठापूर जलसिंचन योजना (सातारा)

हेटवणे धरण (रायगड), खडकपूर्णा जिगाव प्रकल्प (बुलढाणा) या ठिकाणी आपल्या सहज परंतु प्रभावी कार्य पध्दतीचा ठसा राजेंद्रने उमटविला आहे. राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध सिंचन, जल व्यवस्थापन विषयक परिषदांमध्ये, चर्चासत्रांमध्ये व नियतकालिकांमध्ये राजेंद्रचे शोधनिबंध प्रसिध्द झाले आहेत. राजेंद्रशी माझी मैत्री अभ्यासातून झाली पण पुढे नोकरीच्या दरम्यान एकाच रूममध्ये राहिल्याने राजेंद्रचा मला चांगला सहवास लाभला. तो नेहमीच माझ्यासाठी एक प्रेरणास्त्रोत बनत आला आहे. आजही आम्ही पुण्यामध्ये जवळ जवळ रहात आहोत. आमचे कौटूंबिक संबंधही अगदी जिव्हाळ्याचे आहेत. आम्ही एकमेकांच्या सुखदु:खात नेहमीच एकत्र असतो. आमचे कौटुंबिक तसेच व्यवसायिक समारंभही एकत्रित साजरे होतात.

१९८३ च्या बॅचमधील आम्ही आठ मित्रांनी ''वर्षाअखेर'' एकत्र साजरी करण्याची प्रथा खूप वर्षापासून सुरू केली आहे. ती आजतागायत आम्ही चालू ठेवली आहे. लग्नाअगोदर आम्ही एकटे-एकटे एकत्र जमून वर्षाअखेर साजरी करायचो. लग्नानंतर आम्ही सपत्नीक साजरी करू लागलो. नंतर आमची मुलंही या प्रथेमध्ये सहभागी होत गेली. जशी जशी आम्हा सर्वांची मुले आपापल्या शाळा, कॉलेजस आणि अभ्यासांमध्ये व्यस्त होत गेली, तसा त्यांचा सहभाग थोडा कमी होत गेला. परंतु आजही आम्ही नेहमीप्रमाणे सपत्नीक जमून वर्षाअखेर साजरी करतो. जणू काही पुन्हा एकदा तारूण्यातील क्षण अनुभवतो.

राजेंद्र आमच्या १९८३ चा बॅचमधील प्रथम मुख्य अभियंता झाल्याबद्दल मी स्वत: पुढाकार घेऊन माझ्या ह्या मित्राचा २५।०९।२०११ रोजी पुण्यामध्ये आमच्या १९८३ च्या बॅचच्या शिक्षकांसोबत आणि मित्रांसोबत कौतुक सोहळा साजरा केला होता. तसाच परत एकदा असा कौतुक सोहळा साजरा करण्याचा योग माझ्या वाट्याला आला होता. महाराष्ट्र

शासन सेवेतील सचिव लाभक्षेत्र विभाग जलसंपदा विभाग-महाराष्ट्र राज्य या अत्युच्च पदी विराजमान झाल्यानंतर मी असाच एक कौतुक सोहळा १२ जानेवारी २०१९ रोजी आमच्या १९८३ बॅचच्या सर्व वर्गमित्रांबरोबर पुणे येथे साजरा केला होता. ह्या सोहळ्याला आमच्या बॅचच्या ८०% विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. अगदी नागपूर, वर्ध्या वरूनही आमचे मित्र ह्या सोहळ्याला उपस्थित होते. त्यावेळेस आमच्या इंजिनियरींगच्या चारही वर्षांमधील आठवणींना उजाळा मिळाला होता. राजेंद्र एवढ्या मोठ्या पदावर विराजमान झाल्याबद्दल आम्हाला आनंद झाला होता व सार्थ अभिमान वाटत होता. प्रश्नांचा मागोवा घेण्यासाठीची अभ्यास वृत्ती, सामाजिक ज्ञान व भान उच्चपदस्थ असूनही विनम्र स्वभाव, कार्यकुशलता, साधी राहणी व उच्च विचारसरणी, संयमी, विचारी व जमिनीवरून चालणारा असा माझा मित्र राजेंद्र सच्चा लोकसेवक तर आहेच पण प्रथम तो एक गतिशील आणि कार्यकुशल,नि:स्पृह महाराष्ट्राच्या अस्मितेची जाणीव असणारा आपुलकीचे नाते जोडणारा एक लोकाभिमुख गतिशील अधिकारी आहे. सरकार दरबारी आम्हा मित्रांना काही अडचण आली तर राजेंद्र आमचे कवचकुंडल बनतो. आमच्या समस्या दूर करतो. व्यावसायिक समस्या तो लीलया पार पाडतोच पण कौटुंबिक समस्या हाताळतानाही मी त्याच्यामध्ये मातृहृदयी पिता पाहिला आहे. कामाचा मोठा व्याप आणि टेंशन असतानाही मध्येच बोलता बोलता मिश्किलपणे हसून चिमटे काढून वातावरण रिलॅक्स करणे ही राजेंद्रच्या स्वभावाची एक खासियत आहे.

राजेंद्रने ज्ञान व शासन सेवेतील अत्युच्च शिखरे पादाक्रांत केली आहेत. तरीही त्याने स्वत:ला कधीही ग ची बाधा न होऊ देता आमच्यातील मैत्रीच्या नात्याच्या रोपट्याचे वृटवृक्षांत रूपांतर केले आहे. असा हा माझा जिवाचा जिवलग मित्र राजेंद्र त्याच्या कुशल नेतृत्वाचा, कर्तृत्वाचा आणि

आमच्या जिवलग मैत्रीचा आम्हा सर्व मित्रांना सार्थ अभिमान वाटतो. तो माणुसकीच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या कार्यात अखंड वाटचाल करत राहणार यात शंका नाही. अशा अद्वितीय मित्राचे भावी आयुष्य आरोग्यमय, सुखमय जावो व त्याच्या समाजसेवेचा वसा असाच अखंड चालू राहवा, त्याला सुख-शांती लाभो व आम्हा मित्रांना त्याचा सहवास पुन्हाः पुन्हाः प्राप्त होवो हीच सदिच्छा व्यक्त करतो व त्याच्या दीर्घायुष्यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.!



राजेंद्र पवार एक दीपस्तंभ

श्री. शिवाजी इंगळे
उस्मानाबाद
इंजि. राजेंद्र पवार यांचे बालमित्र. लहानपणापासून एकत्रित राहिल्याने एकमेकांबद्दल प्रचंड प्रेम आणि आपुलकी आहे.

महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची गंगा बहूजन समाजापर्यंत पोहचवण्यात महात्मा फुलेंच्यापासून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्यापर्यंत अनेकांनी आपली हयात खर्ची घातली. महाराष्ट्राला कर्मवीरांची परंपरा आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड आणि कर्मवीर मामासाहेब जगदाळे हे तीनच कर्मवीर होऊन गेले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी बहुजनांच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. या संस्थेचे पहिले हायस्कूल येडशी येथे जनता विद्यालय स्थापन केले. या संस्थेतील आदर्श शिक्षक म्हणजे रा.ज. पवार सर!

माझे गुरूवर्य रा.ज. पवार सर यांचे चिरंजीव म्हणजे राजेंद्र पवार

साहेब होय. मी हायस्कूलमध्ये शिकत असताना माझ्या पाठीमागे दोन वर्षे राजेंद्र पवार साहेब होते. दहावीला असताना आम्ही रात्री अभ्यासासाठी शाळेत जमत होतो. त्यावेळी आमच्या सोबत लहानसा मुलगाही अभ्यासाला बसत असे. मला कुतूहल वाटायचे की हा किती शांत आहे. मनापासून वाचन करतोय. लेखन करतोय.

पवार कुटूंबियांचा अन माझा तसा जवळचा संबंध होता आणि आहे. १९७९ पासून आमच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण झालेले आहे. गुरूवर्य रा.ज. पवार सर सुभाष बोर्डिंगचे प्रमुख होते. त्यांना मदतनीस म्हणून माझी नेमणूक झाली. पवार सरांच्या हाताखाली मी घडलो. तयार झालो. त्यांच्या सानिध्यात माझे जीवन बदलून गेले. या काळात त्यांच्या कुटूंबाचा सदस्यच मी बनलो होतो. राजेंद्र, संजीव हे आमच्या बरोबर सतत असायचे. राजेंद्र पवार यांचे प्राथमिक शिक्षण येडशी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. तर ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण जनता विद्यालयात झाले. इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा त्यांनी १९७७ मध्ये दिली. या परिक्षेत ७६% मार्क मिळवून राजेंद्र पवार जनता विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

पुढील शिक्षण त्यांनी सोलापूर आणि कराड येथे घेतले. B. E. झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची तयारी पुणे येथे सुरू केली. अगदी लहानपणापासून अभ्यासाची गोडी असल्याने ते या परिक्षेत यशस्वी झाले. सहायक कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची निवड झाली.

रा.ज. पवार सरांचा चिरंजीव लोकसेवा आयोगाची परीक्षा पास झाला म्हणून खूप आनंद अख्या येडशी गावाला झाला. तत्कालीन सरपंच शरदराव सस्ते आणि उपसरपंच हरिशचंद्र पवार यांनी या गुणवान युवकाचा सत्कार करण्याचे ठरविले. उस्मानाबादचे तात्कालिन जिल्हाधिकारी रामानंद तिवारी यांच्या हस्ते राजेंद्र पवार यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार

सोहळ्याला पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी अलोट गर्दी केली होती. या सोहळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले.

कठीण प्रसंगी शांत राहून संकाटास तोंड देणे, अपयशाने खचून न जाता सतत झगडण्याची वृत्ती ठेवणे, सर्वांशी हसत बोलणे, सुख-दुःखाची चौकशी करणे, अभ्यासाची आवड, साधी राहणी व उच्च विचार सरणी, शांत स्वभाव अशा गुणांचा समुच्चय राजेंद्र पवार यांच्यात दिसून येतो.

आपल्या आवडीच्या क्षेत्रात नैपूण्य कसे मिळवावे. माणसं कसे जोडावीत, गरजूंना यथाशक्ति मदत करत समाजाच्या कायम ऋणात राहण्यात धन्याता मानणारा हा एक शिस्त प्रिय अधिकारी आहे. आपल्या कामाचा ठसा अनेक ठिकाणी उमटलेला दिसून येतोय. अनेक वर्षे जलसंपदा खात्यात सेवा करुन आता ते खात्यातील सर्वोच्च पदावर म्हणजे सचिव पदावर पोहचले आहेत. याचा मला सार्थ अभिमान वाटतो. आता ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि प्रशासकीय सेवेतील अनुभवाचा फायदा समाजाला व्हावा यासाठीही कार्यरत रहावे. त्यासाठी त्यांना उत्तम आरोग्य लाभो आणि दीर्घायु मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना!



एक सहृदयी अभियंता व प्रशासक


इंजि.विनायक लहाडे
अध्यक्ष कनिष्ठ अभियंता संघटना,
सरचिटणीस महा.राज्य राजपत्रीत अधिकारी महासंघ. तसेच श्री पवार यांचे जवळचे मित्र आहेत.

इंजि. राजेंद्र पवार हे बार्शी तालुका, जिल्हा सोलापूर या ग्रामिण भागातून शासकीय तंत्रनिकेतन सोलापूरमध्ये आमच्या आधीच्या एक वर्षे म्हणजे १९८२ मध्ये स्थापत्य पदविका उत्तीर्ण व पुढे अभियांत्रिकी पदवी प्राप्त करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अभियांत्रिकी सेवा मधून जलसंपदा विभागात वर्ग १ अभियंता म्हणून रूजू झाले. शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर मधील आम्हा मित्रांना अभिमान आहे की आमच्यातील एक अभियंता हा एका खात्याचा प्रमुख आहे.

कनिष्ठ अभियंता संघटना व राजपत्रित अधिकारी महासंघाचा पदाधिकारी म्हणून काम करत असताना माझी इंजि. राजेंद्र पवार सरांची भेट, कुकडी पाटबंधारे प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत असताना

झाली. कुकडी प्रकल्पातील शाखा अभियंत्यांच्या प्रश्नावर चर्चेदरम्यान कायमच सकारात्मक प्रतिसाद त्यांनी दिला. त्यांच्या कार्यपध्दती विषयी सांगावयाचे म्हणजे विषय मार्गी लावला पाहिजे, असा त्यांचा दृष्टीकोन होता. इंजि. पवार सर मुख्य अभियंता झाल्यावर अभियांत्रिकी सेवा महासंघाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या कार्यकाळात अभियंत्यांना त्रास देणाऱ्या समाजकंटकाच्या विरोधात कणखर व खंबीर भूमिका घेतली. मुख्य अभियंता पदी विराजमान झाल्यावर सुध्दा कनिष्ठ / शाखा अभियंता यांच्याविषयी आत्मीयता दिसून आली. आम्हा संघटनेच्या कार्यकर्त्यांना कायम त्यांचे सहकार्य मिळत राहिले. विविध प्रकल्पांवर अभियांत्रिकी कौशल्य पणाला लावत असतानाच फेरो सिमेंट इत्यादी विषयात चांगले कार्य केले. शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर मधील सर्वांचे मित्र राजा पवार, जेव्हा जलसंपदा विभागाच्या सचिव पदी विराजमान झाल्यावर आम्हा संघटना कार्यकत्यांना सर्वात जास्त आनंद झाला. इंजि. पवार सरांनी जलसंपदा (लाक्षवि) सचिव पदावर आल्यानंतर कनिष्ठ अभियंता संघटनेने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिकेवर संघटनेच्या म्हणण्याप्रमाणे निकाल मा. उच्च न्यायालयाने दिला. मात्र मा. उच्च न्यायालय निर्णय शासनाकडून (वित्त विभागाकडून) अंमलात आणणे ही अत्यंत कठिण गोष्ट होती. कनिष्ठ अभियंत्याची २४ वर्षे सेवेची दुसरी आश्वासित योजनेचा लाभ शासनाने काढून घेतला होता. कनिष्ठ/ शाखा अभियंत्यांचे सेवानिवृत्तीचे उंबरठ्यावर हजारो रूपयांचे आर्थिक नुकसान झाले होते./ होणार होते. मात्र अभियंत्यांचे कुटुंब प्रमुख इंजि. राजेंद्र पवार यांनी योग्य मार्ग काढून व सकारात्मक दृष्टीकोन ठेवून हजारो अभियंत्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. दि. २१/८/२०१९ पासून त्याचा लाभ सर्वांना मिळाला. शाखा अभियंत्यास ३०/३५ वर्षे सेवा करूनही एकही पदोन्नती प्राप्त होत नाही. ज्येष्ठता यादी अद्यावयत नसलेने, पदोन्नती प्राप्त अभियंत्यांची माहिती लवकर

उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीमध्ये विधानसभा आचारसंहितेपूर्वी २८० अभियंत्यांच्या पहिल्या पदोन्नतीसाठी सर्व सहकार्य करून, पदोन्नती आदेश निर्गमित केले. अशी कौतुकास्पद बाब इंजि. राजेंद्र पवार, सचिव, जलसंपदा (लाक्षेवि) यांनी करून दाखवली. त्याबद्दल अभिनंदन, त्यांचे शतशः आभार! अशा कर्तबगार अभियंत्यांना पुढील आयुष्य गौरवशाली व उत्तम आरोग्यदायी जावो ह्याच शुभेच्छा! कनिष्ठ अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांच्या वतीने इंजि. राजेंद्र पवार, सचिव, जलसंपदा (कडा) यांना पुढील कार्यास शुभकामना.



माझे परममित्र

श्री. विजय कारंडे
मा.सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन (म.रा.) इंजि.राजेंद्र पवार यांचे जुने व जिवलग मित्र

जीवनाच्या वाटेवर प्रवास करीत असताना असंख्य व्यक्ति दृष्टीस पडतात. त्यापैकी काही आपल्या संपर्कात येऊन चांगले वाईट अनुभव देऊन जातात. काहीजण आपल्या सोबत जीवन प्रवासामध्ये काही काळ मार्गक्रमण करतात तर काही आयुष्यात आपल्या बरेच पुढे जाऊन यश - अपयशाची शिखरे सर करून सुध्दा परत आपल्या संपर्कात वेळोवेळी येतात. यापैकी मनामध्ये कायमचे घर करून बसलेली एक व्यक्ति म्हणजेच माझे एक परममित्र श्री. राजेंद्र पवार!

माझ्या वयाच्या सुमारे २० व्या वर्षी मी गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फॉर्मसी, कराड, जिल्हा सातारा येथे सन १९७९ मध्ये बी.फॉर्मसीच्या दुसऱ्या वर्षाला सरळ प्रवेश घेतला. त्यावेळेस हॉस्टेलमध्ये निवास मिळाले

नाही. त्यामुळे शुक्रवार पेठ, कराड येथे स्वतंत्र खोली भाड्याने घेऊन रहात होतो. फॉर्मसी कॉलेजला स्वतंत्र इमारत नसल्यामुळे गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनियरींगच्या इमारतीमध्ये फॉर्मसी कॉलेजला जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे त्या कॉलेजमधील बरेच विद्यार्थी रोज दिसत असल्यामुळे त्यांची तोंड ओळख झाली होती. तसेच कॉलेज कराड गावापासून सुमारे तीन किमी दूर नदीच्या पलिकडे असून त्यावेळी रस्त्यामध्ये शेती होती.

कराड गाव त्यावेळी लहान होते. मनोरंजनाची साधने/ ठिकाणे जवळजवळ नव्हतीच. त्यात बरेचसे विद्यार्थी बाहेर गावावरून आले होते. त्यांच्या एकमेकांशी ओळखी पटकन व्हायच्या. तशात माझी ओळख सिव्हील इंजिनियरींगमध्ये सरळ दुसऱ्या वर्षाच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या संजय घळसासी यांच्याशी झाली व आम्ही दोघांनी पार्टनरशिपमध्ये शिवाजीनगर कराड येथील एका बंगल्यातील खोली भाड्याने घेतली. शेजारच्या खोलीत अविनाश केतकर हा फर्स्ट इयर सिव्हील इंजिनियरींगचा विद्यार्थी एकटाच रहात होता. पहिल्या दिवसापासून आम्हा तिघांची चांगलीच गट्टी जमली. संजय घळसासी स्वत: हुशार विद्यार्थी असल्याने त्याच्या वर्गातील पहिल्या क्रमांकाच्या चढाओढीतील विद्यार्थी म्हणजेच राजेंद्र पवार आणि गुलाब भिलारे यांची संजय घळसासी सोबत लगेच गट्टी जमली. त्यानंतर थोड्याच कालवधीतमध्ये राजेंद्र पवार व गुलाब भिलारे यांची माझ्याबरोबर ओळख होऊन त्याचे लवकरच मैत्रीत रूपांतर झाले. राजेंद्र पवार अत्यंत साधी राहणी असलेला, वडील शिक्षक असून बार्शी जि. सोलापूर येथे राहिलेला. त्यामुळे कोणताही बडेजाव नाही. पण परिस्थितीची जाण आहे असा विद्यार्थी होता. जेव्हा जेव्हा कोणाही विद्यार्थ्याला मदतीची गरज असायची, त्यावेळी त्यांना धावून जावून मदत करणारा मित्र म्हणून तो प्रथम होता. द्रवणारे हृदय असल्यामुळे दुसऱ्यांची दु:ख-संकटे पाहून त्याच्या डोळ्यात अश्रू

आल्याचे आम्ही मित्रांनी पाहिले आहे. सन १९८२ मध्ये माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर मी कराड सोडण्याची वेळ आली. त्यावेळी शिक्षण क्षेत्र भिन्न असल्यामुळे भविष्यात परत कधी भेट होईल न होईल अशी शंका आल्यामुळे मी सिव्हील इंजिनियरींगमधील माझ्याकडील नमूद मित्रांपुढे प्रस्ताव ठेवला की वर्षातून एकदा तरी आपण सर्वजण एकत्र भेटत जाऊ. त्यास सर्वांनी मान्यता दिली. सर्वानुमते तारीख निश्चित केली. त्यानुसार सन १९८२ पासून दरवर्षी पूर्वनियोजित ठिकाणी आम्ही सर्वजण मित्र सातत्याने एकत्र भेटतो. त्यांची नांवे म्हणजे- राजेंद्र पवार, संजय घळसासी, गुलाब भिलारे, अविनाश केतकर, अशोक कुलकर्णी हे सर्व सिव्हील इंजिनियर आहेत आणि संजय जैन व मी कालांतराने आम्ही सर्व विवाहबध्द झालो. आमच्या मैत्रीची दृढता पाहून आम्हा सर्व मित्रांच्या पत्नी-मुले देखील यात आनंदाने सामिल झाल्या आहेत.

पदोपदी प्रत्येक परिक्षेमध्ये राजेंद्रचे बुध्दी सामर्थ्य दिसून येत असे. अचाट स्मरणशक्तिची दैवी देणगी असल्यामुळे एकदा वाचलेले पूर्णपणे लक्षात राहून परिक्षेमध्ये त्याचे पडसाद स्पष्टपणे दिसून येत. वर्गात प्रथम क्रमांक कधी सोडलाच नाही पठ्ठयाने! वाहवा मिळवणे जणू त्याच्या पाचवीला पुजले होते. परिक्षेतील त्याच्या उतुंग यशामुळे शिक्षकांमध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये राजेंद्र हवाहवासा होता. महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यकारी अभियंता या उच्चपदावर रूजू झाल्यावर आतापर्यंत त्याने स्वत:च्या ज्ञानाचा, काम करण्याची पध्दत व चिकाटीचा पुरेपूर वापर केल्यामुळे शासनाने वेळोवेळी त्याची प्रशंसा करून त्यास पोच दिली आहे. तसेच शासनाचे प्रतिनिधीत्व करण्याकरिता त्याला देशपातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर वेळोवेळी संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याचा पुरेपूर वापर त्याने आपले ज्ञान अद्ययावत करून त्याचा शासनास मोबदला दिला आहे. रणरणत्या उन्हात चटके बसून जसे

असह्य अनुभव येतात तसे राजेंद्रच्या जीवन प्रवाहात देखील काही अनिष्ट अनुभवांना त्यास सामोरे जावे लागले. त्या परिस्थितीत देखील चेहऱ्यावरील हसू कमी होऊ न देता धीराने संकटाचा सामना करून त्यावर मात मिळवून जीवन प्रवास करणारे धीरोदत्त व्यक्तिमत्व म्हणजेच माझा परममित्र राजेंद्र पवार! यास त्रिवार अभिवादन करून त्यांच्या या पुढील जीवन प्रवासास माझ्या अनंत शुभेच्छा व्यक्त करतो.!



बाल सवंगडी ते सचिव जलसंपदा

श्री. मोहन सस्ते
मा.उपविभागीय जलसंधारण अधिकारी, उस्मानाबाद
इंजि. राजेंद्र पवार यांचे बालपणीचे शालेय मित्र आजही त्यांची मैत्री कायम आहे.

जलसंपदा सचिव (ला.क्षे.वि.) श्री. राजेंद्र पवार साहेब, जुलै २०२० मध्ये सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरवग्रंथ काढण्यात येणार आहे असा निरोप श्री. विजयकुमार मोरे, पुणे यांचेकडून मिळाल्यानंतर मला खूप आनंद झाला. बालमित्राबाबतचे माझे मनोगत त्यात समाविष्ट करण्याची इच्छा मी त्यांच्याजवळ व्यक्त केली. त्यास त्यांनी होकार दिला म्हणून मी माझे थोडक्यात मनोगत व्यक्त करीत आहे.

मनोगत व्यक्त करताना मागील ५० वर्षाचा भूतकाळ मी आठवत गेलो. राजेंद्र सर कसे घडत गेले हे आठवत गेलो. सरांच्या आई-वडीलांना ''ताई व काका''या नावाने सर्वजन ओळखत असत. ताई व काकांवर कर्मवीर जगदाळे मामांचे संस्कार झाले असल्याने त्यांची शिक्षणाविषयी खूप ओढ

होती. जगदाळे मामांनी काकांवर विश्वासाने जनता विद्यालय येडशी येथील वसतीगृह सांभाळण्याची जबाबदारी दिली व ती त्यांनी समर्थपणे पेलली. काकांनी म्हशीच्या पाठीवर उजळणी शिकली असे त्यावेळेस बोलले जायचे. काकांनी वसतीगृह सांभाळण्याबरोबर हिंदी विषयात पंडीत ही पदवी घेतली त्यामुळे त्यांच्या वर वसतीगृह सांभाळण्याबरोबरच जनता विद्यालयामध्ये हिंदी विषय शिकविण्याची जबाबदारी देण्यात आली. ताई मराठी मुलींच्या शाळेवर शिक्षिका म्हणून करीत होत्या.

काका व ताई यांना दोन मुले व दोन मुली अशी ४ अपत्ये आहेत. त्यापैकी राजेंद्र सर हे दुसरे अपत्य होत. असा त्यांचा परिवार वसतीगृहाच्या एका खोलीमध्ये राहत असत. आई-वडील शिक्षकी पेशात असल्यामुळे राजेंद्र सरांना शिक्षणाचे बाळकडू लहानपणा पासूनच मिळाले. राजेंद्र सरांसहित सर्व भावंडांना त्यांनी पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंत शिक्षण देऊन संस्कारीत केले. काकांनी राजेंद्र सरांना येडशी येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत पहिलीच्या वर्गात जून १९६७ मध्ये प्रवेश दिला व त्याच वर्गात मी देखील प्रवेश घेतला. राजेंद्र सरांसमवेत मी देखील १ ली ते ५ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यावेळेस जोशी गुरूजी, कदम गुरूजी असे उत्तम शिक्षक मिळाल्याने आमचा शिक्षणाचा पाया मुळातच पक्का झाला.

सेमी इंग्लिश वर्ग नविन सुरू झाल्यामुळे जून १९७२ मध्ये जनता विद्यालय, येडशी येथे आम्ही दोघांनी सहावीला प्रवेश घेतला. जून १९७२ ते मार्च १९७७ या वर्षात ६ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. या काळात माझी शिक्षणाची ओढ व माझी घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे काकांनी राजेंद्र सरांसोबत अभ्यासाकरिता चांगला मित्र म्हणून सरांसमवेत वसतीगृहामध्ये राहून अभ्यास करण्यास मला सांगितले. त्यामुळे मी राजेंद्र सरां समवेत परिवारातील घटक म्हणून घरी देखील वावरू लागलो. काकांनी राजेंद्र

सरांसोबत माझ्याही शिक्षणाकडे लक्ष दिले. इयत्ता नववीमध्ये मला व राजेंद्र सरांना वार्षिक परिक्षेत समसमान गुण मिळाल्याने चिठ्ठी टाकण्यात आली व त्यामध्ये माझी चिठ्ठी लागली. त्यामुळे माझा पहिला नंबर आला. नंतर दहावी(एस.एस.सी.) परिक्षेत जनता विद्यालय, येडशी येथून राजेंद्र सर प्रथम क्रमांकाने व मी द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालो. दोघांचे पुढील शिक्षणाकरिता शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथील प्रवेश देखील काकांनीच घेतला व तेथील वस्तीगृहामध्ये तीन वर्षे राजेंद्र सरांसमवेत एकाच खोलीमध्ये राहता आले. जून १९८० मध्ये शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथून आम्ही दोघेपण विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालो. मला परिस्थितीमुळे नोकरी करणे गरजेचे असल्याने मी ऑक्टोंबर १९८० रोजी शासकीय सेवेत रूजू झालो.

राजेंद्र सर यांनी विशेष प्राविण्यासह पदविका पूर्ण केल्याने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे प्रवेश घेतला व प्रथम क्रमांकाने सन १९८३ मध्ये उत्तीर्ण झाले. राजेंद्र सरांनी मास्टर ऑफ इंजिनिरींगचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एम.पी.एस.सी. च्या परिक्षेत पहिल्याच Attempt मध्ये महाराष्ट्रात पहिल्या पाचमध्ये आले. त्यावेळेस राजेंद्र सरांचे वय सर्वात कमी असल्याने राजेंद्र सरांना त्यांच्या इच्छेनुसार जलसंपदा विभागात नारायणगाव येथे सहाय्यक कार्यकारी अभियंता पदी पोस्टींग मिळाली. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात विविध पदावर कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, कार्यकारी संचालक व सध्या जलसंपदा विभागाचे सचिव ह्या मानाच्या पदावर कार्यरत आहेत. राजेंद्र सरांवर कर्मवीर जगदाळे मामांचे संस्कार झाले असल्याने संस्थेने राजेंद्र सरांना संस्थेवर मानाचे पद दिले आहे. ते देखील राजेंद्र सर व्यवस्थित सांभाळीत आहेत. राजेंद्र सरांच्या मागे कामाचा प्रचंड व्याप असताना देखील सर लहानपणीच्या सर्व बालमित्रांच्या संपर्कात असतात. याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटतो. या पुढील काळात राजेंद्रसरां

समवेत त्यांच्या नियोजनानुसार ठरवलेल्या कामात सहभागी होण्याची इच्छा आहे. आम्हा दोघांच्या मैत्रीची आजही येडशी गावातील समवयस्क मित्रांमध्ये चर्चा असते. यातच सरांचे मोठेपण दिसून येते व मूर्ती लहानपण किर्ती महान ही म्हण सरांना तंतोतंत लागू पडते.

यापुढील काळात राजेंद्र सरांचे आरोग्य निरोगी रहावे, कौटुंबिक सुख समृध्दी व आपणास उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना करून मी माझे छोटेसे मनोगत पूर्ण करतो.



सद्‌गुणांचा मिलाफ

श्री. अनंत क्षीरसागर
येडशी उस्मानाबाद
इंजि. राजेंद्र पवार यांचे बालपणीचे शालेय मित्र असून आजही त्यांची मैत्री कायम आहे. जराही खंड पडलेला नाही.

ज्यांनी देव पाहिला
ते संत झाले
पण ज्यांनी मामांना पाहिले
ते भाग्यवंत झाले.

त्या भाग्यवंतातील एक म्हणजे राजेंद्र पवार साहेब! कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या संस्कारात वाढलेले व त्यांच्या विचारांनी प्रेरीत झालेले पवार कुटूंबिय व त्या कुटूंबातील सर्व सदस्य यशाची एक एक शिखरे चढत राहिले. M.P.S.C. परीक्षा पास झाल्या नंतर कळंब जि. पुणे येथे एक्झीक्युटीव्ह इंजिनियर या पदावर नेमणूक होताच त्यावेळचे जिल्हाधिकारी श्री. रामचंद्र तिवारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व सत्कार देखील केला.

पुढे अभियंता ते मंत्रालयात सचिव पदापर्यंतचा प्रवास अतिशय थक्क करणारा होता. कारण कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे संस्कार वडील रा.ज.पवार सरांचे संस्कार व आई पवार मॅडम यांचे संस्कार खूप चांगल्याप्रकारे झाले होते.

कर्मवीर मामांच्या कृपा छत्राखाली पवार सर मराठवाड्यातील बहूजन समाजातील मुलांना सुसंस्काराने घडवित राहिले. त्यांच्या कार्याचा सुगंध त्यांच्या मुलामुलींच्या कर्तृत्वातून सर्वत्र पसरला आहे. राजेंद्र पवार साहेबांकडे आत्मविश्वास कष्टाळू वृत्ती, जिद्द, प्रामाणिकपणा, काटकसर, त्याग, शिस्त आणि चारित्र्य या गुण समुच्चयाने पवार साहेब एक आदर्श अभियंता, आदर्श पिता, आदर्श पालक, अशा विविध भूमिका यशस्वीरित्या वठवू शकतात. राजेंद्र पवार म्हणजे संस्काराची खाण! जन्मापासूनच संस्काराचे बाळकडू घेऊन जन्माला आलेले राजेंद्र पवार यांचा व माझा परिचय इ. १ ली च्या वर्गात असल्यापासूनचा आहे.

मुर्ती लहान कीर्ती महान

या उक्तीप्रमाणे मूर्ती लहान पण कीर्ती खूपच महान! लहानपणा पासून अक्षर अतिशय सुंदर होते. आई शिक्षिका असल्यामुळे अक्षर लेखनांचे धडे आई व वडील पवार सरांकडून त्यांना मिळाले. आम्ही मुले त्यांच्या लिखाणाविषयी नेहमी चर्चा करत असू. त्यांच्या सारखे अक्षर लेखनाचा सराव करत असू. जसे अक्षर सुंदर तसेच वागणे देखील सात्विक होते. ते नेहमी सर्व जाती धर्माच्या मुलांमध्ये वावरत असत. यशस्वी माणसं वेगळं काही करत नाहीत. फक्त प्रत्येक गोष्ट वेगळ्या पध्दतीने करतात. शिव खेरा यांच्या ''यश तुमच्या हाती'' या पुस्तकात वरील वाक्याचा उल्लेख सापडतो. ते वाक्य पवार साहेबांच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते.

बोले तैसा चाले त्यांची
वंदावी पाऊले
– संत तुकाराम महाराज

जसे बोलणे होते अगदी तसे राजेंद्र पवार यांचे वागणे देखील होते. १९७७ साली आम्ही १० वी परीक्षा पास झालोत. इयत्ता १० वी मध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी राजेंद्र पवार होते. मीही तिसऱ्या क्रमांकाने १० वी पास झालो. आम्ही दोघांनी मिळून अभ्यास केला. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे पवार साहेबांनी त्यावेळी पुस्तकांची खूप मदत केली हे मला कधीच विसरता येणार नाही.

पृथ्वीवर कित्येक व्यक्ति जन्मतात अन निसर्ग नियमाने आपला कार्यभाग संपवून निघून जातात. स्वत: बरोबरच आपले नाव व आयुष्यभराचे कार्य घेऊन जातात. मोजकीच माणसे पृथ्वीतलावर जन्मतात ती आगळ्या वेगळ्या तेजोवलयाने, ध्येयाने प्रेरित होऊन झपाटल्यागत आपल्या उद्दिष्टाकडे धावत राहातात. स्वत:चा स्वार्थ दूर ठेवून पावलो पावली त्यागाची शृंखला बळकट करीत समाजासाठी राबत राहातात. त्यापैकी एक म्हणजे श्री. राजेंद्र पवार साहेब होय. पवार साहेबांचे इथून पुढचे आयुष्य सुखाचे समाधानाचे भरभराटीचे आनंदाचे व शतायुषी जावो ही ईश्वर चरणी प्रार्थना!



बंध स्नेहाचे

श्री. विनायक ठकार
पुणे
इंजि. राजेंद्र पवार यांचे जवळचे मित्र आणि हितचिंतक

मला श्री. मोरे यांचा गौरवग्रंथासंदर्भात फोन आला आणि मी विचार करायला लागलो. खरंच राजेंद्र पवारांचा आणि आपला परिचय कधी झाला? आपण किती वर्षे एकत्र आहोत? भूतकाळात गेलो तेव्हा आठवला सतरा अठरा वर्षापूर्वीचा काळ!

राजेंद्र माझ्या मेव्हण्याचा मित्र! राजेंद्रची व माझी ओळख साधारण २००१/२००२ साली झाली असावी. पण फारच थोड्या दिवसातच या ओळखीचे रूपांतर चांगल्या मैत्रीत झाले. काही व्यक्तिंबरोबर आपण वर्षानुवर्षे एकत्र असूनही जवळीक निर्माण होत नाही. या उलट काही माणसांसोबत आपले भावनिक बंध पटकन जुळून जातात तसे माझे राजेंद्रच्या बाबतीत झाले. आमच्या दोघांची कार्यक्षेत्रे खरंतर खूपच भिन्न आहेत आणि त्यांच्या

कामाच्या व्यापांमुळे आणि सततच्या बदलींमुळे हल्ली भेटणेही खूप कमी होते. पण राजेंद्रसारखा मित्र असणे यासाठी मी स्वत:ला भाग्यवान समजतो. मला त्यांच्यातील काही गुण खरोखरच खूप आवडतात.

तसा तो मितभाषी आहे. त्याची दुसऱ्याचे बोलणे पुर्ण ऐकून घ्यायची पूर्ण तयारी असते. तो स्वत:चे मत पटकन व्यक्त करत नाही. पण जेव्हा तो काही सांगतो तेव्हा समर्थ रामदासांच्या उक्तिप्रमाणे स्वत: अभ्यासून काढणे असे असते. त्याची विषयाच्या खोलात जाऊन अभ्यास करायाची वृत्ती मला भावते, जर एखादी गोष्ट समजली नाही तर ती लहानात लहान माणसांकडून समजून घेण्याची त्याची तयारी असते. वर सांगितल्याप्रमाणे आम्ही दोघे वेगवेळ्या क्षेत्रात काम करत असल्या कारणाने आम्ही जेव्हा भेटतो तेव्हा ती एक मैत्रीची किंवा कौटुंबिक भेट असते. पण राजा भेटणार म्हटल्यावर काही नवीन विषयीवरती आपल्याला माहिती मिळणार याची खात्री असते. त्यावर चर्चा करायला कधी कधी वाद घालायलाही खूप मजा येते. राजाने एकदा बैठक जमविली की त्याची रंगत आणखीनच वाढते.

जलस्त्रोत, पाणी, पाणीसाठा व त्याचा वापर, पाण्याचे भविष्यातील नियोजन या विषयात त्याचा अभ्यास खूपच चांगला आहे. तो विषय समजून सांगण्याची त्याची हातोटीही विलक्षण असल्याने सर्व सामान्य माणसालाही त्याचे चांगले आकलन होते. त्यामुळेच इंजिनियरींगचे विद्यार्थी असोत किंवा इस्त्राईलमध्ये प्रेझेंटेशन असो त्याचे बोलणे नेहमीच आश्वासक आणि प्रेरणादायी ठरते. आपल्या विषयामध्ये व कामामध्ये नवनवीन तंत्रज्ञान आणण्यासाठीची त्याची धडपड खरंच कौतुकास्पद आहे. त्याच्यासारख्या समविचारी अभियंत्यामुळेच आज पाणलोट क्षेत्रात महाराष्ट्राची कामगिरी उंचावली आहे असे मला वाटते.

आपल्याकडे आलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे व रेकॉर्ड मेंटेन

करणे याकडे त्याचा कटाक्ष असतो. त्यासाठी रात्री उशिरापर्यंत तो वज्रासनात बसून टपाल तपासत असताना मी त्याला पाहिले आहे. अशा खरोखर गुणवान माणसाला सरकारी खात्यात उत्कर्ष व्हायला थोडा उशीरच झाला असे माझे वैयक्तिक मत आहे,असो.

वैयक्तिक आयुष्यातही राजेंद्रने आजपर्यंत अनेक चढ उतार पाहिले आहेत. पण या सर्व परिस्थितीत त्याने त्याचा स्थितप्रज्ञपणा बिघडू दिला नाही किंवा कामावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. यातच त्याचे यश सामावलेले आहे असे मला वाटते. धरणातील मृत पाणीसाठा म्हणजे काय?. वेगवेगळ्या ठिकाणचे पर्जन्यमान कसे मोजतात? अशा सारख्या माझ्या फालतू प्रश्नांना तत्परतेने समर्पक उत्तरे देणारा, पंढरीच्या वारीमध्ये आपल्या पदाचा/पोझिशनचा कुठलाही अभिनिवेश न बाळगता माझ्या बरोबर पायी चालणाऱ्या माझ्या मित्राला यापुढील भावी वाटचालीसाठी आमच्या सर्व कुटुंबियाकडून शुभेच्छा!



कर्तव्यदक्ष अधिकारी

श्री. रमेशभाई आगवणे
जलसंपदा व सा.बां.विभाग कर्मचारी संघटना नेते, पुणे श्री. राजेंद्र पवार यांचे सहकारी मित्र, खात्यातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांच्या संबंधाने आलेली जवळीक आणि मित्रत्व.

सन २००५ मध्ये आदरणीय इंजि. राजेंद्र पवार साहेब यांची भेट झाली. सिंचन भवन पुणे येथे अधीक्षक अभियंता म्हणून कुकडी पाटबंधारे मंडळामध्ये ते पदावर होते. त्याकाळात कृष्णा खोरे विकास महामंडळात व इतर पाचही महामंडळात वेतनासाठी आंदोलनाचे पडघम वाजत होते. त्या प्रसंगी आम्हा कर्मचारी व संघटना यांच्या कार्यावर सुयोग्य टिपणी करत आमचे पाठीशी उभे राहिलेले पवारसाहेब विसरता येणार नाहीत.

शांत आणि निर्गवी स्वभाव! छोटीसी मूर्ती आणि प्रसन्न चेहरा व अत्यंत मृदू स्वरात बोलणे. समोरच्या व्यक्तिचे, कर्मचारी, अभियंता यांचे म्हणणे प्रथम ऐकून घेणे हा उत्तम स्वभाव व संस्काराचे दर्शन यामुळे होत होते. अडचणींवर टीका न करता मार्गदर्शन करणे यामुळे अभियंता व कर्मचारी

यांच्यामध्ये लोकप्रिय व्यक्तिमत्वाचा अधिकारी असा संघटनेमध्ये प्रवाद निर्माण झाला होता. संघटनेने एकादी बाब निदर्शनास आणून दिली की संबंधीत विभाग प्रमुख यांना सुचना करून त्याचे निराकरण करणे ही बाबच त्या मंडळाविरूध्द संघटनेला आंदोलनापासून दूर ठेवण्यास परावृत्त करते. हीच बाब एक उत्तम प्रशासक म्हणून नोंदली जाते. असे अनेकदा इंजि. राजेंद्र पवार यांच्या बाबतीत घडले आहे. म्हणून ते एक उत्तम प्रशासक आहेत.

याच काळात गरजवंत कर्मचारी वृंदांच्या गुणवत्ता प्राप्त पाल्यांना महाराष्ट्र पाटबंधारे कर्मचारी कल्याण केंद्रातर्फे आर्थिक मदत करणे. यासाठी कल्याण केंद्राचा सचिव म्हणून मी कामकाज पहात होतो. त्यावेळी वेळोवेळी मार्गदर्शन व मदत केल्यामुळे सामाजिक जाणीव असलेला अभियंता ही ओळख जगासमोर झाली. इंजि. राजेंद्र पवार पदोन्नतीवर मुख्य अभियंता म्हणून जिल्हयाबाहेर गेले. परंतु सिंचन भवन येथे होणाऱ्या बैठका, लग्न समारंभामुळे माझी भेट व्हायची. त्यावेळी आस्थेने ते चौकशी करीत असत. हा त्यांचा मोठेपणा मनाला भावतो. पाटबंधारे सचिव म्हणून थोडी उशीराच नेमणूक झाली. परंतु खंत न बाळगता शांत स्वभावामुळे कार्य सुरू केले.

सचिव म्हणून पदभार स्विकारला असता आम्ही संघटनेमार्फत उच्च शिक्षित वाहन चालकांना लिपिक वर्गात सामावून घेणे बाबत ३ वर्षे लढा देऊन चर्चा करून शासनाकडून आदेश प्राप्त केले. परंतु काही परिमंडळाकडून वाहन चालक ते कनिष्ठ लिपीक या पदावर आदेश काढण्याबाबत नकारात्मक विचाराने यास चालढकल चालू होती. त्याप्रसंगी आम्ही संघटनेमार्फत मा. इंजि. राजेंद्र पवार सो. सचिव पाटबंधारे महाराष्ट्र शासन यांना पत्र घेऊन भेटलो व त्यांना विनंती केली. उच्चशिक्षित वाहन चालक कनिष्ठ लिपीक पदावर नेमण्याबाबत शासन निर्णय झालेला आहे व न्याय हक्काने यांना नेमणूक करणे क्रमप्राप्त आहे. या योगे कार्यालयांना लिपिक वर्ग प्राप्त होतील व

शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही हे सांगितले यावर मा इंजि. राजेंद्र पवार साहेबांनी आमचे समोरच संबंधित सहसचिव यांना सर्व परिमंडळांना सुचना देण्यास सांगितले. संबंधित अधीक्षक अभियंता यांना फोन करून समक्ष सुचना दिल्या. यामुळे संबंधीत योग्यता प्राप्त कर्मचारी वृंदास न्याय मिळाला.

सन २००५ पासून शासनात कार्यरत अभियंता कर्मचारी वृंदास भविष्य निर्वाह निधीसाठी जुन्या कर्मचारी वृंदाप्रमाणे महालेखाकार मुंबई व नागपूर यांच्याकडे जमा न होता. राष्ट्रीय पेन्शन योजनेमार्फत वेतनातून १०% प्रमाणे रक्कम व तेवढीच रक्कम शासनाकडून या कर्मचारी वृंदाच्या खात्यात जमा होणार असे शासन निर्णय झाला. त्याप्रमाणे कार्यवाही झाली. परंतु या पाचही महामंडळातील अधिकारी कर्मचारी यांच्या खात्यात कोणतीही रक्कम जमा झालेली नव्हती. वेतनातून कपात मात्र झाली. याबाबत संघटनेने पत्रव्यवहार आंदोलन घंटानाद असा उठाव केल्यानंतर पाचही महामंडळात कार्यवाही सुरू झाली पण ३ वर्षानंतरही फक्त बैठका व सुचना या पलिकडे काहीच कार्यवाही झाली नव्हती.

मा. इंजि. राजेंद्र पवार सचिव यांना समक्ष भेटून आणि पत्राने चर्चे द्वारे परिस्थिती सांगितली असता संघटनेचे पत्रच पाचही महामंडळ कार्यालयांना आपले खात्याचा प्रस्ताव टाकून पाठवा व त्वरित निर्णय घेण्याबाबत सुचना देण्याबाबत मा. सचिव साहेबांनी आग्रही भूमिका मंत्रालय स्तरावर मांडली. यामुळे आज मंत्रालय स्तरावरून कक्ष अधिकारी प्रत्येक महामंडळात बैठका घेऊन संघटना पदाधिकारी सह चर्चा करून निर्णय व माहिती गोळा करण्यास प्राधान्य देत आहेत. यामुळे सन २००५ पासून लढा करणारे अधिकारी कर्मचारी यांना दिलासा मिळाला याचे ऋण आम्ही विसरणार नाही.

अशा कर्तव्य परायण अधिकारी कर्मचारी वृंदाच्या पाठीशी राहणारे

इंजि. राजेंद्र पवारजी यांना दीर्घायुष्य, निरोगी स्वास्थ्य, आनंदी सुखसमाधान यापुढील काळात लाभो ही माझी संघटनेच्या आणि अधिकारी कर्मचारी वृंदाच्या हार्दिक इच्छा शुभेच्छा आहे.

पाणीदार माणूस

श्री. अनिल परदेशी
पुणे, पान व्यावसायिक व एक जिंदादिल व्यक्तिमत्त्व राजेंद्र पवार यांचे हितचिंतक मित्र, जेव्हा पवार साहेब पुण्यात असतात तेव्हा यांची भेट नक्की ठरलेली असते.

सुमारे १० ते १२ वर्षापूर्वीचा किस्सा आहे. कर्वे रोडवरील माझ्या पानाच्या दुकानात नेहमीप्रमाणे गर्दी असताना माझे एक जुने ग्राहक एका व्यक्तिला सोबत घेऊन आले आणि मला म्हणाले, ''हे पवार साहेब आहेत बरं! राज्याच्या इरिगेशन खात्यात मोठे अधिकारी आहेत!'' ते ग्राहक नेहमीचे असल्याने माझे मित्र आहेत. त्यांनी सोबत आणलेले पवार साहेब हे त्यांचे मित्र होते. त्यामुळे त्या दिवसापासून ते माझेही मित्र झाले. पान लावता-लावता त्यांच्याशी संवाद सुरू केला. त्यांच्या बोलण्यातून खूप माहिती मिळत गेली. त्यांचे सरळ साधे रहाणीमान, उच्च विचारसरणी आणि ज्ञानाचे प्रचंड भांडार यामुळे पहिल्या भेटीतच त्यांची छाप पडली. इतक्या मोठ्या पदावर कार्यरत असतानाही बोलणं, चालणं आणि वागणं अगदी साधं

होतं. त्यामुळे पहिल्या भेटीतच त्यांनी मला आपलेसे केले.

त्यानंतर आमच्या मैत्रीचा सिलसिला सुरू झाला. ते अधून मधून दुकानावर यायचे. त्यावेळी बोलण्यातून खूप माहिती मिळायची. पाण्यासंदर्भातील सखोल आणि ज्ञानपूर्ण माहिती तर मिळायचीच. याशिवाय समाजकारण, राजकारण, शिक्षण, उद्योग – व्यवसाय आणि अन्य कुठल्याही विषयावर ते अस्खलितपणे बोलायचे. त्यामुळे त्यांचे बोलणे ऐकतच रहावे असे वाटायचे. या बोलण्यातून मैत्रीला खतपाणी मिळत गेले. वास्तविक पहाता ते शासनाच्या एका खात्याचे वर्ग–१ चे अधिकारी आणि मी एक साधारणसा पानवाला. परंतु आमच्या मैत्रीमध्ये कुठेही दरी जाणवली नाही. उलट एवढ्या मोठ्या मनाचा माणूस आपल्याशी मनमोकळेपणाने बोलतो. आपल्याशी मैत्रीपूर्ण वागतो. याचेच मला राहून राहून अप्रुफ वाटायचे. त्यांच्या बोलण्यातून एकाद्या विषयातील खोली लक्षात यायची. त्यावेळी त्यांचे बोलणे संपूच नये असे वाटायचे. इतका हुशार आणि ज्ञानी आणि वरिष्ठ पातळीवर काम करणारा अधिकारी असले तरी त्यांचे पाय मात्र सदैव जमिनीवर होते. बोलण्यात, वागण्यात कुठेही मीपणा औषधालासुध्दा सापडायचा नाही. त्यामुळे आमच्यामध्ये मैत्रीचा कप्पा केव्हा तयार झाला ते कळालेच नाही. ते जेव्हा पुण्याला येतात तेव्हा अधून–मधून आमची भेट होत असते. ते आले की पान लावता–लावता गप्पांचा फड रंगतो. माझ्या ज्ञानात मौलीक भर पडते. आणि वेगळाच आनंद वाटतो.

आपल्याला फक्त एवढेच माहिती असते की महानगर पालिका आपल्याला पाणी देते आणि ते कमी जास्त झाले की आपण तक्रारी करत बसतो. परंतु हे पाणी येते कोठून? ते कुठे साठवले जाते? तेथून ते आपल्यापर्यंत कसे येते? वर्षभर पाणी आपल्याला कसे पुरते? याची काहीही माहिती सर्व सामान्य लोकांना नसते. परंतु पवार साहेब यांच्याशी मैत्री झाल्यामुळे

पाण्याचे तत्वज्ञान बसल्या बसल्या मला मिळाले. धरणात पाणी अडविणे, त्या अडवलेल्या पाण्याचे नियोजन करणे, शेतीसाठी किती टक्के, उद्योगासाठी किती टक्के आणि पिण्यासाठी किती टक्के याचे वर्षभराचे नियोजन या पाटबंधारे खात्याच्यावतीने केले जाते. हे करत असताना अधिकाऱ्यांचे कौशल्य कसे पणाला लागते. याविषयी खूप माहिती साहेबांकडून मिळाली. त्याचबरोबर समाजकारण आणि राजकारणाकडे व्यापक दृष्टीकोनातून कसे बघायचे याची व्यापक दृष्टीदेखील मला त्यांच्या विचार करण्याच्या पध्दतीमुळे कळाली. चांगल्या माणसाशी मैत्री झाली की विचारांची शिदोरीही चांगलीच मिळते हे पटले.

पाणी पुरवठ्याचे नियोजन कसे केले जाते? त्यामुळे सर्वांनाच पाण्याचा कसा फायदा होतो? हे सहज साध्या भाषेत त्यांच्याकडून मला बोलता-बोलता समजले. माझ्यासारखा सर्व सामान्य पानवाला देखील पाण्याच्या बाबतीत साक्षर झाला आहे.

काही दिवसांपूर्वी कोल्हापूर-सांगली भागात ढगफुटी झाली होती. नद्या तुडूंब भरून वाहिल्या आणि पुराचे थैमान माजले होते. लोकांची घरे-दारे वाहून गेली, गुरेढोरे बुडाली. अतिशय भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. त्या घटनेनंतर एकदा पवार साहेब माझ्या दुकानावर आले होते. मी सहज बोलता-बोलता त्यांच्याकडे हा विषय काढला! त्यांना म्हणालो, ‘‘साहेब हे काय चाललंय? हे सगळं कशामुळे घडलंय? पाण्याचे नियोजन कारणीभूत आहे का?’’ असं अगदी सर्वसामान्य माणसाला पडणारे प्रश्न मी त्यांना विचारले. आता इतक्या मोठ्या पदावर काम करणार अधिकारी आणि आपण त्यांना पाण्याच्या नियोजनावर शंका घेणारा प्रश्न विचारला त्यामुळे त्यांना राग तर आला नसेल ना. अशीच एक शंका मनात उमटून गेली. माझ्या चेहऱ्यावरचे भाव बघून साहेब किंचित स्मित करून त्यांनी माझ्या

साऱ्या प्रश्नांची उत्तरे अगदी विद्यार्थ्याला शिक्षक कसे समजावून सांगतात तशी सांगितली. माझ्या सर्व शंकांचे निरासन केले. त्यांच्या जागी दुसरा कोणी असता तर माझ्या अशा शंकेने कदाचित वादाचा मुद्दा उपस्थित झाला असता. परंतु पवार साहेबांनी राग तर सोडाच उलट अतिशय प्रेमळपणाने मला सर्व गोष्टी समजावून सांगितल्या! सांगण्याचे तात्पर्य असे की कोणी काहीही समस्या घेऊन त्यांच्याकडे गेले की ते चिडत नाहीत किंवा वेळकाढूपणा करीत नाहीत. समोरच्या व्यक्तिचे समाधान करणारे उत्तर त्यांच्याकडे असते. माणसाचा हा मोठेपणा त्यांच्याठायी खूप मोठ्या प्रमाणावर आहे. अशा स्वभावाची माणसे पाटबंधारे खात्यात आहेत म्हणून तर आपल्याला काही झाले तरी पाणी आपल्याला रोजच्या रोज मिळत असते. त्यांच्या अडचणी काय आहेत? छोट्या आहेत की मोठ्या आहेत? याची काही कल्पना आपल्याला नसते. त्या सर्व समस्या सोडवून पाणी आपल्यापर्यंत पोहचते. पाणी म्हणजे जीवन आहे. जीवन देणारी माणसं देवासारखीच मानायला हवीत. त्यातल्या त्यात पवार साहेबांशी झालेल्या मैत्रीमुळे त्याचा परिचय झाला. अत्यंत हुशार, प्रामाणिक, सरळसाधा स्वभाव आणि कामात तत्पर अशी माणसे प्रशासनात आहेत. ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. त्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे कार्य केले आहे. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा!



देव माणूस

सौ. अनुराधा घाडगे
नाशिक, जलसंपदा खात्यातील एका महिला कर्मचाऱ्यांची आई. ज्यांना श्री. राजेंद्र पवार यांची अतिशय अडचणीच्यावेळी मदत लाभली. त्यातून ओळख वाढत गेली.

श्री. राजेंद्र पवार साहेब म्हणजे आमच्या दृष्टीने माणूस नसून देव आहेत असं म्हटल तर अतिशयोक्ती ठरणार नाही. आमची प्रथम भेट झाली ती नाशिक येथे ते मेरी मध्ये असताना....

आमची मुलगी आर्या इलेक्ट्रिकल इंजिनियर असून तिची MPSC मधून जलसंपदा विभागात असिस्टंट इंजिनियर म्हणून नाशिक मेरिमध्ये फर्स्ट पोस्टींग झालेली. आम्ही तिच्या सोबत मेरि येथे गेलेलो. त्यावेळी आम्हाला सर्व काही नविन होते. आम्हाला तिथे काही अडचणी येत होत्या. म्हणून आम्ही राजेंद्र पवार साहेबांना भेटलो. तसं पाहिलं तर एवढी मोठी व्यक्ति परंतु सरकारी उच्चपदाचा किंचितही अभिमान त्यांच्या बोलण्यात जाणवला नाही. उलट प्रथम भेटीतच त्यांच्या बोलण्यात खूप नम्रता आणि जिव्हाळा होता.

त्यांनी आम्हाला योग्य मार्गदर्शन करून आमच्या अडचणी दूर केल्या आणि आर्या जलसंपदा विभागात जॉईन झाली. त्यानंतर वर्षभरात आर्याचे लग्न झाल्यामुळे तिने कोल्हापूरला ट्रान्सफर करून घेतली होती. एका नामांकित विवाह मंडळातून आर्याचे लग्न जमले होते. परंतु आमची खूप मोठी फसवणूक झाली. आर्याला सासरी खूप त्रास होता. अखेर तिच्यावर सासरच्या मंडळींकडून विषप्रयोग झाला. डॉक्टरांनी तर ती वाचणारच नाही म्हणून सांगितले होते. परंतु परमेश्वराच्या कृपेने आणि सर्वांच्या आशिर्वादाने आर्या एक महिन्यानंतर कोमामधून शुध्दीवर आली. त्या घटनेला दोन वर्षे झाली आहेत. आर्या अजून देखील पूर्ण बरी झालेली नाही. परंतू ह्या घटनेला एक वर्ष झाल्यानंतर आर्याची कोल्हापूरहून कळव्याला बदली करून घेऊन तीने पुन्हा ऑफिस जॉईन करणे म्हणजे खूप कठिण गोष्ट होती. परंतू ह्या खूप महत्वाच्या कामासाठी राजेंद्र पवार साहेबांनी आम्हाला खूप मोलाची मदत केली. शासकिय नियमांना धरून आठ दिवसात साहेबांनी आर्याची बदली कोल्हापूरहून, ठाणे (कळवा) येथे केली आणि काही दिवसातच आर्या ऑफिस जॉईन करू शकली. माणसाने कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करणे म्हणजे हुकुमत गाजवणे नसून मिळालेली जबाबदारी स्वीकारून लोकांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना सोबत घेऊन प्रगती करणे होय. ह्या ओळी श्री. राजेंद्र पवार साहेबांच्या बाबतीत अगदी सार्थ ठरतात.

साहेबांनी आपल्या कारकिर्दीत आमच्या सारख्या अनेकांना मदत केल्याचे कळाले. अशी माणसं जगाच्या कल्याणासाठीच कार्यरत असतात. आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या कार्याला सलाम आणि पुढील आयुष्य त्याला सुख समाधानाचे आणि आरोग्यदायी जावो या शुभेच्छा!



POSITIVE OUTLOOK

Anju Gaur
New Delhi

My association with Mr. Rajendra Pawar began over four years when he was serving as the Chief Engineer of the Hydrology Data center and continues in his post as Secretary. I have found him to be among the rare engineers with a positive outlook and openness to promote innovations, challenge his team and open to learning from global practice. He has full knowledge of technology as well as institutional arrangements required to implement them successfully. Under National Hydrology Project he has always been keen to share and exchange the knowledge. I congratulate him on his successful tenures in each capacity he has served.

SOLUTION ORIENTED OFFICER

Stuti Sharma
New Delhi

I congratulate Mr. Rajendra Pawar on his service for his unrelenting commitment to delivering irrigation to the people of Maharashtra. He has focused on indigenization, modernization, innovation and technological advancement leading to rapid and sustained command area expansion. During my interactions with him, I have found him calm, forward looking and solution oriented. He was always quick to respond to concerns and had meaningful engagements with our teams. I wish him success for all future endeavors.



कर्मचाऱ्यांचा आधारस्तंभ

श्री माणिकराव मोतीराम कोरे
विभागीय भांडारपाल,
सिंचनभवन पुणे यांनी श्री राजेंद्र पवार यांच्यासोबत अनेक वर्षे काम केले असून त्यांचे कौटुंबिक आणि जवळचे संबंध आहेत

इंजि. राजेंद्र पवार साहेब आणि माझी पहिली भेट पुणे येथील पाटबंधारे संशोधन विभागात ते कार्यकारी अभियंता म्हणून आल्यानंतर झाली. त्यावेळी मी तेथे सहाय्यक भांडारपाल पदावर कार्यरत होतो. सुरुवातीला साहेब थोडे कडक वाटले परंतु जेव्हा त्यांचे अंतरंग समजले तेव्हा अतिशय गोड आणि प्रेमळ स्वभाव असल्याचे जाणवले. कोकणातील फणस जसा बाहेरुन काटेरी वाटत असला तरी आतून त्यातील मधाळ गरे मन तृप्त करीत असल्याचे आढळून येते तसे झाले. साहेब आल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे कार्यालयातील वातावरणात एक सकारात्मक बदल झाला. तो म्हणजे कार्यालय म्हणजे एक कुटुंब आहे आणि साहेब त्यांचे प्रमुख आहेत

आणि बाकीचे कर्मचारी म्हणजे एकमेकांची भावंडे आहेत अशा प्रकारचे वातावरण तयार झाले होते. असे वातावरण कधी अनुभवले नव्हते आणि त्यानंतरही कधी पहायला मिळाले नाही. त्यामुळे तो कालावधी सदैव स्मरणात राहिला आहे. साहेबांची काम करण्याची हातोटीच वेगळी आहे. त्यांचा मायेचा पदर खूप दांडगा आहे. या पदराखाली अनेकांची दु:खे, अडीअडचणी आणि समस्या दूर व्हायच्या. त्यामुळे सर्व कर्मचारी अगदी बिनधास्तपणे आपल्या अडचणी साहेबांना सांगत असत आणि साहेब त्याचे निराकरण करत असत. त्यामुळे एक प्रकारचा जिव्हाळा निर्माण झाला होता. या जिव्हाळ्यातूनच कामे व्हायची. साहेब म्हणायचे की तुमच्या समस्या आधी सोडवून घ्या. त्या सोडविल्या की तुम्ही काम करायला मोकळे आणि बिनधास्त व्हाल. नेमकं तसंच व्हायचे. त्यामुळे कुणीही डोक़्यावर टेंशन घेऊन काम करीत नव्हते. सहाजिकच काम चांगले व्हायचे. हीच ती साहेबांची काम करुन घेण्याची यशस्वी पध्दत होती. त्यामुळे तेथे कार्यरत असणारे कर्मचारी आणि साहेब यांच्यामध्ये एक प्रकारचे ऋणानुबंध तयार झाले आहेत. ते आज कित्येक वर्षानंतर कायम आहेत. सद्या साहेब सर्वोच्च पदावर म्हणजे मंत्रालयात सेक्रेटरी आहेत. तरीदेखील आम्ही आमच्या वैयक्तिक अडचणीसाठी साहेबांना फोन करतो आणि ते देखील न रागावता पदांची उतरंड लक्षात न घेता तितक्याच आपुलकीने आम्हाला मार्गदर्शन करीत असतात. ही आमच्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. श्री पवार साहेब यांची आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वागणूक देण्याची पध्दत नोकर अशी न असता एक माणूस म्हणूनच ते प्रत्येकाशी वागत असतात, कुटुंबाचा एक घटक म्हणून ते वागत असतात.

साहेबांच्या कामाची पध्दत तर विचारुच नका. अतिशय आव्हानात्मक कामे त्यांनी केली आहेत. जी कामे होणे शक्य नाही

किंवा त्यात आलेल्या अडचणी दूर होणे शक्य नाही असे म्हटले जायचे. अशी कामे हाती घेतली आणि हाहा म्हणता पारदेखील पाडली. पेनूर पाटकूळ चर योजनेची कामे सुरु होती तेव्हा तेथे वारंवार मगरी निघायच्या. त्यामुळे कामगार लोक घाबरुन कामावर जायचे नाहीत. अशावेळी साहेब स्वत: तेथे उभे राहून धीर द्यायचे आणि काम करुन घ्यायचे. चर योजनांच्या कामात अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी यायच्या परंतु साहेब त्या अडचणींना तोंड देत त्यातून मार्ग काढायचे आणि ती कामे पूर्ण करायचे. बारामती गोविंदबाग येथे चर योजनेची कामे सुरु केली होती. परंतु जागेचा वाद होता म्हणून काम थांबले होते. त्यावेळी साहेबांनी आपले संपुर्ण कसब पणाला लावून विरोधकांचे मन वळविले आणि ते काम पूर्ण केले. त्यावेळी साहेबांचे वरिष्ठ पातळीवरुन फार कौतुक झाले होते. अशा प्रकारची चर योजनेची कामे दौंड, पंढरपूर आणि हवेली या तालुक्यामध्ये रखडली होती. साहेबांनी अतिशय मन लावून नियोजन करुन संकटावर मात करुन ती कामे पूर्ण केली. कार्यालयीन कामातील त्यांचा हातखंडा अगदी वाखाणण्यासारखा आहे. त्यांच्या टेबलवर फायलींचा ढिगारा पडला आहे आणि ते निवांत बसले आहेत असे कधीच झाले नाही. उलट एकाद्या कामासाठी त्यांच्याकडे कोणी गेले आणि अमुक एकाद्याला फोन करा असे सांगितले तर ती व्यक्ति त्या ठिकाणी पोहचायच्या आधी साहेबांचा फोन झालेला असायचा. काम करण्याची त्यांची पध्दतच आगळी वेगळी आहे.

साहेबांचा मोठा कालावधी नारायणगाव येथे गेला आहे. त्या ठिकाणीही त्यांनी शेकडो माणसे जोडली आहेत. त्यांच्याशी जोडलेली माणसे अद्यापही ऋणानुबंध कायम ठेवून आहेत. साहेबांना नारायणगाव सोडून फार वर्षे झालीत तरीदेखील तिथल्या लोकांना त्यांच्याबद्दल

किती आपुलकी आणि विश्वास वाटतो हे एका उदाहरणावरुन दिसले. नारायणगाव येथे त्यावेळी साहेबांसोबत काम करणारा एक कर्मचारी एकदा अचानक आजारी पडला. उपचाराचा खर्च आवाक्याबाहेरचा होता. तो आणि त्याचे कुटुंब साहेबांकडे आले. त्यावेळी साहेबांनी प्रथम त्यांना मानसिक आधार दिला आणि स्वत: आर्थिक मदत देऊन त्याच्यावर उपचार केले. कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या डोळ्यातून आनंदाच्या धाऱ्या वाहिलेल्या आम्ही पाहिल्या आहेत. कुठल्याही कर्मचाऱ्याची कुठलीही अडचण असली तरी ते पहिल्यांदा आलेल्या माणसाला धीर देतात. आता तुम्ही इकडे आलात ना मग घाबरु नका. सर्व काही ठिक होईल असा आधार पहिल्यांदा देत असतात. त्यामुळे अर्धे दु:ख कमी होते. त्यामुळेच आमच्या कार्यालयातील कर्मचारी त्यांना आधारस्तंभ असे म्हणत असत.

साहेब आज कुठेही असले तरी त्यांच्यासोबत काम केलेले अगदी शिपाई स्तरावरचा कर्मचारी असला तरी त्यांना फोन करुन आपली समस्या सांगू शकतो. साहेब कामात किंवा मिटींगमध्ये असतील आणि फोन उचलू शकले नाहीत तर जेव्हा ते फ्री होतात तेव्हा ते स्वत: फोन करुन काय काम होते म्हणून विचारतात. कारण त्यांना माहित असते की कोणी विनाकारण फोन करणार नाहीत. काहीतरी अडचण असेल म्हणून फोन केलेला असेल याची जाणिव ठेवून ते परत फोन करतात. असा अधिकारी फार क्वचित असतो. अशा अधिकाऱ्यासोबत काम करायला मिळणे हे सुध्दा भाग्य लागते.

श्री पवार साहेब हे लोकसंग्राहक आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणावर त्यांचा लोकसंग्रह आहे. नुसता संग्रहच नाही तर जीवाला जीव देणारे लोक आहेत. महसूल, पोलीस, बांधकाम विभाग, वन विभाग अशा अनेक विभागात त्यांचे मित्र आहेत. त्यामुळे कुणालाही

फोन करुन लोकांची मदत ते करत असतात. एकदा तर ते कोकणात गेले होते. येताना काहीतरी गाडीचा प्रॉब्लेम झाला. त्यामुळे मध्येच कुठेतरी अडकून पडले. त्यावेळी ही बातमी त्यांचे महाड जि. रायगड येथे कार्यरत असणारे डीवायएसपी यांना कळाली. त्यांनी रात्री आपली स्वत:ची पोलीस गाडी पाठवून दिली आणि ती गाडी घेऊन साहेब पहाटे पुण्यात पोहचले. अशा प्रकारे अनेकांना मदत करणारा माणूस स्वत: संकटात आहे म्हटल्यावर लोक स्वत:हून मदतीला येतात. अशी कितीतरी माणसं त्यांनी जोडली आहेत की आजही त्यांचा फोन आला म्हटल्यावरही आनंदून जातात. साहेबांनी एकदा माणूस जोडला की तो आयुष्यभर तुटत नाही. ते आपल्या कौटुंबिक कार्यक्रमात देखील जोडलेल्या माणसांना सामील करुन घेतात. त्यामुळे आपोआप आपुलकी वाढते. अशी हजारो माणसे त्यांनी जोडली आहेत. त्यांच्यासोबत ज्यांनी ज्यांनी काम केले आहे ते धन्य झाले असे मला म्हणावेसे वाटते. कारण त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळते. फक्त खात्यातील कामाच्या संदर्भातीलच नव्हे तर वैयक्तिक आयुष्यातील अनेक संकटातून मार्ग कसा काढावा हे त्यांच्याकडून आम्ही शिकलो आहोत. कोणतेही काम धाडसाने कसे करावे हे त्यांच्याकडून शिकायला मिळाले. अनेकांचे ते प्रेरणास्थान आहेत. कुठल्याही प्रकारची घमेंड किंवा गर्व त्यांच्याकडे औषधालाही सापडणार नाही. असा एकदम निर्मळ मनाचा हा माणूस आहे. आईवडीलांची सेवाही त्यांनी चांगल्या प्रकारे केली आहे. त्यांच्याकडून आदर्श घ्यावा असे काम त्यांनी केले आहे आहे.

आता ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे शासकीय कामातून त्यांना थोडी उसंत मिळणार आहे. माणसांमध्ये मिसळण्याचा आणि त्यांचा एकत्रित अनुभव घेण्याचा त्यांचा स्वभाव आता बहरेल.

अमृत मंथन

आयुष्यातील आनंद म्हणजे तरी काय असते हो? दुसऱ्याला आनंदी पहाण्यासारखा दुसरा आनंद नाही. साहेबांनी आयुष्यभर तेच केले. त्यामुळे त्यांच्या जीवनात तो आनंद कायम राहो आणि त्यांना दीर्घायु लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!